ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण
महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ

MA YOG (M81)

Book Code : Yog/ E /501

संस्कृतास्वाद

यशवंतराव चव्हाण
महाराष्ट्र मुक्त
विद्यापीठ

ज्ञानगंगा घरोघरी

MA YOG M81
संस्कृतास्वाद
Book code : YOG/E/501

संस्कृतास्वाद

लेखक : डॉ. गजानन वामनराव आंभोरे

घटक १	: वर्णमाला व शब्द परिचय	०१
घटक २	: धातू व क्रियापद परिचय	४३
घटक ३	: व्यावहारिक संस्कृत परिचय	६८
घटक ४	: संस्कृत वाड़्मय परिचय	९२

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

कुलगुरू : प्रा. संजीव सोनवणे

आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषद

डॉ. सौ रश्मी रानडे (अध्यक्ष)
प्र.संचालक
आरोग्य विज्ञान विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

प्रा. संजीवनी महाले
संचालक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

डॉ माधुरी सोनवणे
प्र.संचालक व सहयोगी प्राध्यापक
कृषी विज्ञान विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ सज्जन थूल
संचालक व सहयोगी प्राध्यापक
मुल्यांकन विभाग
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

डॉ. चेतना कामळस्कर
संचालक व सहयोगी प्राध्यापक
विज्ञान विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

डॉ. दत्ता गायकवाड
बी.व्ही.जी. ग्रुप,
पुणे

डॉ. गुरुनाथ पंडित
सचिव
पाटकर कॉलेज, मुंबई

डॉ. स्वरदा पिरन्नवार
डी.वाय.पाटील युनिर्व्हसिटी,
पुणे

डॉ. व्ही. ए. साठे
वात्सल्य ट्रस्ट, मुंबई

डॉ. संदीप डोंगरे
अष्टांग इन्स्टीट्युट,
मुंबई

लेखक | **अनुवादक**

डॉ. गजानन वामनराव आंभोरे

संपादक व अभ्यासक्रम संयोजक

डॉ सौ रश्मी रानडे
प्र. संचालक
आरोग्य विज्ञान विद्याशाखा
य. च. महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. मधुर गवळी
शैक्षणिक समन्वयक (योग)
आरोग्य विज्ञान विद्याशाखा
य. च. महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

श्री. किशोर राठोड
शैक्षणिक समन्वयक (योग)
आरोग्य विज्ञान विद्याशाखा
य. च. महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

निर्मिती

श्री. विलास बधान
व्यवस्थापक (प्र.), ग्रंथनिर्मिती केंद्र,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

© २०२५, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्रथम प्रकाशन : एप्रिल २०२५

प्रकाशक : दिलीप भरड, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - ४२२ २२२

B25-26-02 / Vaibhav

कुलगुरूंचे मनोगत

प्रिय विद्यार्थी,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या 'योगशास्त्र पदव्युत्तर पदवी (एम.ए.)' शिक्षणक्रमासाठी आपण प्रवेश घेतला.राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार तयार करण्यात आलेल्या अभ्यासक्रमात आपले हार्दिक स्वागत !

भारत देशाला योगविद्येची प्राचीन परंपरा आहे. योग हा केवळ शिक्षणाचाच भाग न राहता दैनंदिन जीवनाचा भाग बनावा असा विद्यापीठाचा ध्यास आहे. योगविद्येची ही प्राचीन परंपरा आणि संस्कृती तळागाळातल्या सर्वसामान्य माणसा पर्यंत पोहोचवावी अशी विद्यापीठाची अपेक्षा आहे. अवघ्या महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा योग शिक्षक पदविका शिक्षणक्रम सर्वश्रुत आहे. योगशिक्षक पदविकेच्या अनेक विद्यार्थ्यांना या शिक्षणक्रमातून रोजगार प्राप्त झाला आहे. त्याच बरोबर योग सेवा करून आपण समाजाचे देणे लागतो याद्दष्टीने त्यांच्यात समाजसेवेची भावना वृद्धिंगत झाली आहे . शिक्षकांमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये योगशिक्षक पदविका शिक्षणक्रमाची लोकप्रियता पाहता आणि त्याच्या अभ्यासक्रमाची मर्यादा पाहता विद्यापीठाने योग विषयात पदव्युत्तर पदवी (एम.ए.) सुरू करावी अशी बऱ्याच वर्षापासून मागणी होती. आपल्या विद्यापीठाने याबाबत पुढाकार घेऊन राज्यात प्रथमच पूर्णपणे दूरशिक्षण पद्धतीने योगशास्त्रात पदव्युत्तर पदवीसाठी शिक्षणक्रम सुरू केला आहे. या शिक्षणक्रमाची आखणी करताना आपण योग क्षेत्रातील योग साक्षरता वाढावी योगातील मूळ संकल्पना विद्यार्थ्यापर्यंत सहजगत्या पोहोचाव्यात अशा गरजा लक्षात घेऊन अभ्यासक्रमाचा आशय ठरवलेला आहे. पूर्व व पश्चात वैदिक कालखंडापासून ते आधुनिक काळापर्यंत योगशास्त्राची झालेली वाटचाल आणि यापुढेही त्याच्या विस्तारित जाणाऱ्या कक्षा लक्षात घेऊन या अभ्यासक्रमाची आखणी करण्यात आली आहे. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील विविध योग संस्थांचा, योग तज्ञ यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेले अभ्यास साहित्य प्रत्येक स्तरावरील विद्यार्थ्याला प्रत्यक्षपणे मार्गदर्शक ठरेल.

बदलत्या जीवनशैलीनुसार योग क्रियांचा दैनंदिन जीवनामध्ये उपयोग येणाऱ्या काळाची गरज बनलेला आहे . विविध सरकारी आस्थापना, प्रशिक्षण संस्था, संरक्षण संस्था, शैक्षणिक संस्था अशा ठिकाणी योग शिक्षकांची वाढती मागणी काळाला धरूनच आहे, अशावेळी योग्य पद्धतीने योगक्रिया शिकविणारा योग शिक्षक असणे सुद्धा अपरिहार्य आहे म्हणून सर्व पैलूंनी परिपूर्ण असा प्रमाणित योग शिक्षक घडवणे योग संशोधक घडविणे आमचा उद्देश आहे.

प्रस्तावना

'योग' शब्द जितका सरळ आणि सुलभ आहे. तितकाच त्याचा अर्थ गुढ आणि विस्तृत आहे. योग शब्दाचा उपयोग अत्यंत व्यापक स्वरुपात करण्यात येतो. त्यामुळे त्याचे क्षेत्र सुद्धा विस्तृत आहे. योग हे एक दर्शनशास्त्र असले तरी आधुनिक युगात त्याचा चिकित्साशास्त्र म्हणून सुद्धा उपयोग करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये रुजविणे तसेच योग क्षेत्रात नवनवीन संशोधन करून योगाकडे लोकांचा बघण्याचा दृष्टीकोन बदलण्यासाठी शैक्षणिक क्षेत्रात योगशास्त्राचा समावेश करून पदविका, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यात आले हे प्रशंसनीय आहे.

योग एक शाश्वत विज्ञान आहे, साधना पद्धती आहे. ब्रह्माद्वारा निर्दिष्ट, ऋषी, तपस्वी आणि दार्शनीकांनी अनुभवलेली श्रेष्ठ विद्या आहे. हे विशेष ज्ञान जीवनातील महत्वपूर्ण तथ्ये आणि भौतिक, आध्यात्मिक उन्नती उपलब्ध करुन देणारे आहे. योग असे विज्ञान आहे की ज्याच्या माध्यमातून शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक, सामाजिक आणि भावनात्मक स्तरावरील उंची गाठता येते. योगाच्या माध्यामातून मनुष्य काम, क्रोध, मद, लोभ इत्यादि दुर्गुणांपासून परावृत्त होऊन श्रेष्ठ कार्य करण्यासाठी प्रवृत्त होतो. योगातील साधना पद्धतीमुळे समाधि आणि आत्म साक्षात्कार या उच्चतम अवस्थेपर्यंत पोहचू शकतो, नव्हे तर आत्म्याला स्वरुपामध्ये स्थित करुन कैवल्यावस्थेपर्यंत पोहचविणे हाच योगाचा उद्देश आहे. याच उद्देशाने अनेक प्राचीन ग्रंथ आणि दर्शनशास्त्राची निर्मिती करण्यात आली या ग्रंथांमध्ये योगाचे विवेचन केलेले आढळून येते. आधुनिक युगात योगाकडे बघण्याच्या दृष्टीकोन बदलला असला तरी योगशास्त्राची सैधांतिक पार्श्वभूमी विद्यार्थ्यांना माहीत असणे आवश्यक आहे. त्या अनुषंगानेच एम.ए. योग या अभ्यासक्रमातील 'भारतीय दर्शनशास्त्र' हा विषय तयार करण्यात आलेला आहे. या विषयाच्या अध्ययनातून विद्यार्थ्यांना स्वामी स्वात्माराम लिखित हठयोगप्रदीपिका आणि महर्षी घेरंड द्वारा रचित घेरंड संहिता या हठयोगाच्या ग्रंथातील विविध संकल्पना आणि योगांग यांचा संक्षिप्त परिचय होईल. पातंजल योगसूत्र या ग्रंथातील काही महत्वाच्या संकल्पना विद्यार्थ्यांना जाणून घेता येईल आणि त्यांच्या आचरणाने नैतिक आणि सामाजिक मूल्यांचा विकास घडून येण्यास मदत होईल. श्रीमद भगवद्गीता, बौद्ध दर्शन, जैन दर्शन याबरोबरच इस्लाम धर्मातील योगाचे स्वरूप जाणून घेण्यास मदत होईल. महर्षी वसिष्ठ यांच्या योगवशिष्ठ या ग्रंथातील विविध संकल्पनांवर सुद्धा या विषयाच्या माध्यमातून प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. एकूणच प्राचिन वैदिक कालखंडापासून योगशास्त्र विकसित होते गेले आणि आज आधुनिक युगात केवळ भारतातच नव्हे तर वैश्विक स्तरावर विविध देशातील लोक, जाती, धर्म, पंथ, भाषा हा भेदभाव विसरून मानवी जीवनाचा स्तर उंचावण्यासाठी आणि स्व-स्वरूपाच्या अस्तित्वाची जाणीव करून घेण्यासाठी करीत आहे. अशा परिस्थितीत, योगाच्या मूळ उद्देशाला आघात पोहोचू न देण्याची जबाबदारी स्वीकारून योगाशास्त्राची सैद्धांतिक पार्श्वभूमी जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी स्तरावर 'भारतीय दर्शनशास्त्र' या विषयाचा अभ्यास निश्चितच उपयुक्त ठरणारा आहे.

घटक १ : वर्णमाला व शब्दपरिचय

अनुक्रमणिका

१.० उद्दिष्टे
१.१ प्रास्ताविक
१.२ विषय-विवेचन
  १.२.१ वर्णमाला
  १.२.२ नाम-सर्वनाम
  १.२.३ विशेषण
  १.२.४ अव्यय
१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
१.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे
१.५ सारांश
१.६ सरावासाठी स्वाध्याय
१.७ क्षेत्रीय कार्य
१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

१.० उद्दिष्टे

ह्या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला,

(१) संस्कृत वाङ्मयाचे (योगशास्त्राचे) शुद्ध व स्पष्ट उच्चारण अर्थात वाचन करता येईल.

(२) संस्कृत वाङ्मयातील (योगशास्त्रामधील) नाम, सर्वनामाच्या व त्यांच्या विभक्तीनुसार कारकार्थांचा परिचय देता येईल.

(३) संस्कृत वाङ्मयातील (योगशास्त्रातील) सामान्य अव्ययांचा व धातूसाधित अव्ययांचा अर्थबोध होईल.

(४) संस्कृत वाङ्मयातील (योगशास्त्रातील) विशेषणांचा परिचय देता येईल.

(५) वाक्याचे मुख्य घटकांचा परिचय झाला असता वाक्याचा मराठीत अर्थ समजेल.

१.१ प्रास्ताविक

संस्कृत भाषा ही मृत भाषा नसून अमृत भाषा आहे. संस्कृत भाषेच्या शिक्षणाने इतर कोणत्याही भारतीय भाषेचे ज्ञान उत्तम प्रकारे होऊ शकते. तसेच भाषिक विकासही चांगला होतो. त्यामुळे योगशास्त्राचा व पातंजल महाभाष्याचा अर्थ चांगल्या प्रकारे समजण्यास मदत होईल. त्यामुळे आत्मविश्वास वाढून विद्यार्थ्यांचा योगशास्त्रात प्रवेश होईल. अर्थात मूळ योगसूत्रे व त्यावरील भाष्यग्रंथ मुळातूनच समजण्याचा हेतू सफल होईल. त्यासाठी या

घटकातील सर्व संज्ञांच्या व उपघटकांच्या आधारे संस्कृत वाङ्मयाचा अर्थात संस्कृत भाषेचा अभ्यास कसा करावा ते येथे आपण समजावून घेणार आहोत.

१.२ विषय-विवेचन

१.२.१ वर्णमाला

मानवाला आपले विचार किंवा भावना व्यक्त करण्याचे मुख्य साधन म्हणजे भाषा होय. मनुष्य व्यवहारासाठी जी भाषा वापरतो ती ध्वनिरूपात असते व तिचे दुसरे प्रत्यक्ष रूप म्हणजे लिपी होय. माणसाच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या मूळ ध्वनीला वर्ण असे म्हणतात. कोणतीही भाषा लिहायला व वाचायला शिकताना प्रथम आपल्याला त्या भाषेची वर्णमाला शिकणे आवश्यक आहे. संस्कृतमध्ये दोन प्रकारचे वर्ण आहेत. ते म्हणजेच व्यंजन व स्वर. व्यंजनामध्ये स्वर मिळवून अक्षरे तयार होतात. अनेक अक्षरांनी मिळून संस्कृतचे शब्द बनतात. त्यात प्रामुख्याने १४ स्वर, २ स्वराश्रिते व ३४ व्यंजने असे एकूण ५० वर्ण आहेत.

संस्कृत वर्ण सामान्यतः ज्या लिपीत लिहितात तिला देवनागरी लिपी असे म्हणतात. जगातील सर्व भाषांपेक्षा संस्कृत भाषेला जे महत्त्व प्राप्त झाले आहे, ते दोन कारणांपैकी एक म्हणजे संस्कृतातील विविध विषयांवरचे विविध प्रकारचे साहित्य व दुसरे संस्कृतचे शास्त्रीय स्वरूप हे होय. संस्कृत वर्णमालेच्या रचनेवरून ही शास्त्रशुद्धता प्रत्ययास येते. संस्कृत भाषेचे वैशिष्ट्य म्हणजे वाचताना वर्णांचे उच्चार ज्या क्रमाने होतात, त्याच क्रमाने ते लिहिले जातात.

पाणिनीय व्याकरणानुसार संस्कृतची वर्णमाला खालीलप्रमाणे आहे.

संस्कृत वर्णमाला

	[illegible]		व्यंजने							
वर्ग / स्थान	**ऱ्हस्व**	**दीर्घ**	**कठोर**		मृदू		(मृदू) अनुनासिक	(मृदू) अन्तस्थ	(कठोर) उष्म	(मृदू) महाप्राण
			१	२	३	४	५	६	७	८
कंठ्य	अ	आ	क्	ख्	ग्	घ्	ङ्	:	–	ह्
तालव्य	इ	ई	च्	छ्	ज्	झ्	ञ्	य्	श्	–
मूर्धन्य	ऋ	ॠ	ट्	ठ्	ड्	ढ्	ण्	र्	ष्	–
दंत्य	लृ	–	त्	थ्	द्	ध्	न्	ल्	स्	–
ओष्ठ्य	उ	ऊ	प्	फ्	ब्	भ्	म्	–	–	–
कंठतालव्य	संयुक्त स्वर ए	ऐ	–	–	–	–	–	–	–	–
कंठौष्ठ्य	ओ	औ	–	–	–	–	–	–	–	–
दंत्यौष्ठ्य	–	–	–	–	–	–	–	व्	–	–
			अल्पप्राण	महाप्राण	अल्पप्राण	महाप्राण	अल्पप्राण	अल्पप्राण	महाप्राण	महाप्राण

वर्ण : आपल्या मुखातून बाहेर पडणाऱ्या मूळ ध्वनीस वर्ण असे म्हणतात. संस्कृतमध्ये एकूण १४ स्वर व ३४ व्यंजने असे एकूण ४८ वर्ण आहेत तसेच अनुस्वार व विसर्ग हे दोन स्वराश्रिते सुद्धास्वर मानण्यात आलेले आहेत. असे सर्व मिळून एकूण ५० वर्ण होतात.

वर्णस्थाने : (१) कंठ्य वर्ग – ज्या वर्णांचा उच्चार कंठातून होतो त्यांना कंठ्य वर्गातील वर्ण असे म्हणतात. उदा. – अ, आ, क्, ख्, ग्, घ्, ङ्, ह्.

(२) **तालव्य वर्ग :** ज्या वर्णांचा उच्चार करताना जिभेचा टाळूला स्पर्श होतो, अशा वर्णांना तालव्य वर्गातील वर्ण असे म्हणतात. उदा. - इ, ई, च्, छ्, ज्, झ्, ञ्, य, श.

(३) **मूर्धन्य वर्ग :** ज्या वर्णांचा उच्चार करताना जीभ टाळूच्या मागील मूर्धा भागाकडे वळून होतो अशा वर्णांना मूर्धन्य वर्गातील वर्ण असे म्हणतात. उदा.- ऋ, ॠ, ट्, ठ्, ड्, ढ्, ण्, ऱ्, ष्.

(४) **दंत्य वर्ग :** ज्या वर्णांचा उच्चार करताना जिभेचा दाताला स्पर्श होतो त्या वर्णांना दंत्य वर्गातील वर्ण असे म्हणतात. उदा. -लृ, त्, थ्, द्, ध्, न्, ल्, स्.

(५) **ओष्ठ्य :** ज्या वर्णांचा उच्चार करताना ओठ एकमेकांना मिटतात अशा वर्णांना ओष्ठ्य वर्गातील वर्ण असे म्हणतात. उदा.- प्, फ्, ब्, भ्, म्.

(६) **कंठतालव्य :** ज्या वर्णांचा उच्चार करताना कंठ व टाळू या दोन्ही स्थानांना जिभेचा स्पर्श होतो, अशा वर्णांना कंठतालव्य वर्गातील वर्ण असे म्हणतात. उदा.- ए, ऐ.

(७) **कंठौष्ठ्य :** ज्या वर्णांचा उच्चार करताना कंठ व ओठ या दोन्ही स्थानांचा वापर होतो अशा वर्णांना कंठांष्ठ्य वर्गातील वर्ण असे म्हणतात. उदा.- ओ, औ.

(८) **दंत्यौष्ठ्य :** ज्या वर्णांचा उच्चार करताना जीभ दाताला लागते व ओठ मिटतात त्या वर्णांना दंत्यौष्ठ्य वर्गातील वर्ण असे म्हणतात. उदा.- व्.

वर्णांचे प्रकार

वर्णांचे दोन प्रकार आहेत.

(१) **स्वर :** 'स्वयं राजन्ते इति स्वरा:' अर्थात दुसऱ्याचे साहाय्य घेतल्यावाचून ज्यांचा स्वतंत्रपणे उच्चार होतो, अशा वर्णांना स्वर असे म्हणतात. उदा.- अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, लृ, ए, अॅ, ऐ, ओ, औ, आं. असे एकूण १४ स्वर आहेत.

स्वरांचे प्रकार

(१) ऱ्हस्व स्वर, दीर्घ स्वर, संयुक्त स्वर, प्लुत स्वर

स्वर

ऱ्हस्व स्वर	**दीर्घ स्वर**	**संयुक्त स्वर**	**प्लुत स्वर**	**स्वराश्रित**
अ	आ	ए	आ$_{३}$, ए$_{३}$	अं
इ	ई	ऐ	ई$_{३}$, ऐ$_{३}$	अ:
उ	ऊ	ओ	ऊ$_{३}$, ओ$_{३}$	
ऋ	ॠ	औ	ॠ$_{३}$, औ$_{३}$	
लृ				

(२) स्वरांचे आणखी सजातीय स्वर व विजातीय स्वर असे प्रमुख दोन प्रकार पडतात.

* **सजातीय स्वर :** एकाच वर्गस्थानात असलेल्या दोन्ही स्वरांना सजातीय स्वर असे म्हणतात.

उदा.	कंठ्य	- अ, आ
	तालव्य	- इ, ई
	मूर्धन्य	- ऋ, ॠ
	ओष्ठ्य	- उ, ऊ

* **विजातीय स्वर :** दोन भिन्न वर्गस्थानातील स्वरांना विजातीय स्वर असे म्हणतात. उदा. अ-इ, ई-ऊ, अ-ऊ, इ.

* **ऱ्हस्व स्वर :** ज्या स्वरांचा उच्चार थोडक्यात व लवकर होत असून त्यांचा उच्चार एका मात्रेचा असतो, त्यांना ऱ्हस्व स्वर असे म्हणतात. उदा. अ, इ, उ, ऋ, लृ.

* **दीर्घ स्वर :** ज्या स्वरांचा उच्चार लांब होतो व ज्यांची उच्चार मात्रा दोन असते, त्यांना दीर्घ स्वर असे म्हणतात. उदा. आ, ई, ऊ, ॠ.

* **संयुक्त स्वर :** दोन स्वरांनी मिळून तयार झालेल्या स्वरांना संयुक्त स्वर असे म्हणतात.

उदा. अ+ इ = ए , आ + ए = ऐ

अ+ उ = ओ आ+ ओ = औ, इ.

* **प्लुत स्वर :** ज्या स्वरांची उच्चार मात्रा तीन असतात त्यांना प्लुत स्वर असे म्हणतात. या प्लुत स्वरांचा वापर फक्त वैदिक वाङ्मयात केलेला आढळतो. उदा. ए$_{३}$, आ$_{३}$, ओ$_{३}$, ई$_{३}$, ऊ$_{३}$, ॠ$_{३}$ इ.

* **स्वराश्रिते (अनुस्वार, विसर्ग) :** पदाच्या शेवटी येणाऱ्या परंतु वर्णमालेत ज्यांचा उल्लेख नाही, पण भाषेत ज्यांचा वापर स्वरानंतर केला जातो त्यांना अनुस्वार व विसर्ग असे म्हणतात.

उदा. विसग - देवः , कविः, भानुः, इ.

अनुस्वार - देवम् (देवं), कविम् (कविं), भानुम् (भानुं), इ.

(२) व्यंजने

स्वरांचे मागून साहाय्य घेऊन ज्या वर्णांचा उच्चार होतो, अशा वर्णांना व्यंजन असे म्हणतात.उदा. - क्, ख्, ग्, घ्,... अशी एकूण व्यंजने आहेत.

व्यंजने

वर्गीय (स्पर्श) | **अवर्गीय**

कठोर		मृदू		अनुनासिक	कठोर	मृदू
क्	ख्	ग्	घ्	ङ्	श्	य्
च्	छ्	ज्	झ्	ञ्	ष्	र्
ट्	ठ्	ड्	ढ्	ण्	स्	ल्
त्	थ्	द्	ध्	न्		व्
प्	फ्	ब्	भ्	म्		ह्

व्यंजनांचे प्रकार

* **कठोर व्यंजने :** ज्या वर्णांचा उच्चार अत्यंत कठोर व कर्कश पद्धतीने केला जातो त्यांना कठोर व्यंजने असे म्हणतात. उदा. क्, च्, ट्, त्, प्, इ.
* **मृदू व्यंजने :** ज्या वर्णांचा उच्चार अतिशय साध्या व सोप्या पद्धतीने हळूवार होतो, त्या वर्णांना मृदू व्यंजने असे म्हणतात. उदा. ग्, ज्, ड्, द्, ब्, इ.
* **अनुनासिक व्यंजने :** ज्या वर्णांचा उच्चार मुख व नाक यांच्या साहाय्याने होतो त्यांना अनुनासिक व्यंजने असे म्हणतात. उदा. ङ्, ञ्, ण्, न्, म्, इ.
* **अंतस्थ व्यंजने :** ज्या वर्णांचा उच्चार मुखातल्या मुखातच होतो त्यांना अंतस्थ व्यंजने असे म्हणतात. उदा. य्, र्, ल्, व्, इ.
* **उष्म व्यंजने :** ज्या वर्णांचा उच्चार करताना मुखातून उष्ण हवा बाहेर पडते त्यांना उष्म व्यंजने असे म्हणतात. उदा. श्, ष्, स्, इ.
* **संयुक्त व्यंजने :** जेव्हा दोन व्यंजनांनी मिळून एक संयुक्त वर्ण तयार होतो तेव्हा त्यास संयुक्त व्यंजन असे म्हणतात. उदा. क् + ष् = क्ष् ज् + ञ् = ज्ञ्, इ.

(३) अक्षर

व्यंजनांमध्ये स्वर मिळवून जो संयुक्त वर्ण तयार होतो, त्यास अक्षर असे म्हणतात. उदा.- क्+अ = क, ख्+ अ = ख, इत्यादी.

स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - १

(१) सजातीय स्वर कोणते ते सांगा.

(२) वर्ण म्हणजे काय ?

(३) कठोर वर्ण कोणते ते लिहा.

(४) संयुक्त स्वर लिहा.

(५) अंतस्थ वर्ण कोणते ते लिहा.

१.२.२ नाम, सर्वनाम

(क) शब्द

मागील वर्णमाला विभागात आपण वर्णांचा विचार केला. या वर्णांपैकी व्यंजनांमध्ये स्वर मिळविला असता अक्षर तयार होते. अक्षरांचे दोन प्रकार पडतात. एक सामान्य अक्षर व दुसरे संयुक्त अक्षर.

(१) सामान्य अक्षर - क् +अ = क, क् + आ = का, इ.

(२) संयुक्त अक्षर - क् + ष् + अ = क्ष, ज् + ञ् = ज्ञ

अशाप्रकारे सर्व विविध सामान्य व संयुक्त अक्षरांनी संस्कृतचे शब्द तयार होतात.



शब्द : विशिष्ट अर्थबोध करून देणाऱ्या दोन किंवा अधिक अक्षरांच्या समूहाला शब्द असे म्हणतात. उदा.- राम, गणेश इत्यादी.

शब्दांचे प्रकार : * **स्वरादी** - आदर

* **स्वरान्त** - नितीन * **व्यंजनादी** - राम * **व्यंजनान्त** - मरुत्

* **पुल्लिंगी** - देवः * **नपुंसकलिंगी** - वनम् * **स्त्रीलिंगी** - शाला

(१) **स्वरादी शब्द :** ज्या शब्दांच्या आरंभी स्वर असतो अशा शब्दांना स्वरादी शब्द असे म्हणतात. उदा. आदरः, आरम्भः, इ.

(२) **स्वरान्त शब्द :** ज्या शब्दांच्या शेवटी विविध स्वर येतात अशा शब्दांना स्वरान्त शब्द असे म्हणतात. उदा. रामाः, हरिः, भानुः, इ.

(३) **व्यंजनादी शब्द :** ज्या शब्दांच्या आरंभी व्यंजन असते अशा शब्दांना व्यंजनादी शब्द असे म्हणतात. उदा. नितीनः, गणेशः, इ.

(४) **व्यंजनान्त शब्द :** ज्या शब्दांच्या शेवटी व्यंजन असते अशा शब्दांना व्यंजनान्त शब्द असे म्हणतात. उदा. मरुत्, शशिन्, आत्मन्, इ.

(५) **पुल्लिंगी शब्द :** ज्या नामाला 'तो'(सः) अशा पुरुषवाचक सर्वनामाचा उपयोग करून संबोधिले जाते तेव्हा त्यास पुल्लिंगी वाचक शब्द असे म्हणतात. उदा. तो मनुष्य (सः पुरुषः), तो वृक्ष (सः वृक्षः)

(६) **नपुंसकलिंगी शब्द :** ज्या नामाला 'ते' (तत्) अशा नपुंसकलिंगी सर्वनामाचा उपयोग करून संबोधिले जाते तेव्हा त्यास नपुंसकलिंगी शब्द असे म्हणतात. उदा. ते पुस्तक (तत् पुस्तकम्), ते फुल (तत् पुष्पम्)

(७) **स्त्रीलिंगी शब्द :** ज्या नामाला 'ती'(सा) अशा स्त्रीलिंगी सर्वनामाचा उपयोग करून संबोधिले जाते तेव्हा त्यास स्त्रीलिंगी शब्द असे म्हणतात. उदा. ती शाळा (सा शाला), ती गाय (सा धेनुः)

(८) **शब्दाचा विग्रह :** शब्दामध्ये समाविष्ट असलेल्या सर्व अक्षरांचा विग्रह म्हणजेच व्यंजने व त्यात मिळालेले स्वर मिळून तयार झालेला शब्द होय. त्याचा विग्रह पुढीलप्रमाणे केला जातो.

उदा. गणेश = ग् + अ + ण् + ए + श् + अ (अकारान्त शब्द)

टीप : या शब्दाच्या विग्रहाच्या शेवटी 'अ' हा स्वर येत असल्याने या शब्दाला अकारान्त शब्द असे म्हणतात. अशीच काही आणखी उदाहरणे --

नदी = न् + अ+ द् + ई (ईकारान्त शब्द)

भानु = उकारान्त शब्द

पितृ = ऋकारान्त शब्द

मरुत् = तकारान्त (व्यंजनान्त) शब्द

आत्मन् = नकारान्त (व्यंजनान्त) शब्द

चन्द्रमस् = सकारान्त (व्यंजनान्त) शब्द

अशाप्रकारे वरील सर्व स्वरान्त व व्यंजनांत जे शब्द तयार झाले ते शब्दांच्या जातींपैकी एक आहेत. त्या सर्व शब्दांच्या जाती पुढीलप्रमाणे आहेत.



पुढे या सर्व शब्दांच्या जातींचा क्रमशः परिचय करून घेऊया.

(ख) **नाम (व्याख्या) :** प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वस्तूंना, व्यक्तींना, पदार्थांना किंवा त्यांच्या गुणांना जी नावे प्राप्त होतात त्यांना नाम असे म्हणतात. उदा. वृक्ष, शाला, राम, इ.

या सर्व नामांना त्यांच्या लिंग, वचनानुसार विभक्ती प्रत्यय लावून त्यांचे पद बनविले जाते.

पद

प्रातिपदिकास (शब्दास) विभक्ती प्रत्यय लागून जी शब्दांची रूपे बनतात त्यांना पद संज्ञा प्राप्त होते. उदा. देव-देवः , कवि - कविः , माला - मालाः, इ.

लिंग : संस्कृतमध्ये तीन लिंगे आहेत. पुल्लिंग, नपुंसकलिंग व स्त्रीलिंग. काही नामे पुल्लिंगी व नपुंसकलिंगी अशी उभयपदीसुद्धा असतात. नामांच्या लिंगांच्या बाबतीत मात्र वेगवेगळ्या भाषांमध्ये वेगवेगळ्या कल्पना आढळतात. इंग्रजीमध्ये निर्जीव वस्तूंचे लिंग नपुंसकलिंग असते, तर हिंदीमध्ये नपुंसकलिंग नसतेच. त्यामुळे एका भाषेतील एखाद्या नामाच्या लिंगावरून दुसऱ्या भाषेतील त्याच अर्थाच्या नामाच्या लिंगाची कल्पना करणे एखादेवेळेस चुकीचे ठरते.

वचन : संस्कृत भाषेचे वचन हे एक खास वैशिष्ट्य आहे. मराठीसह इतर सर्व भाषांमध्ये एकवचन व अनेकवचन अशी दोनच वचने असतात. मात्र संस्कृतमध्ये एकवचन, द्विवचन व बहुवचन अशी तीन वचने आहेत. या सर्व वचनांचा सवयीने व सरावाने परिचय होतो.

उदा.	बालः पठति।	बालौ पठतः ।	बालाः पठन्ति।
	एक मुलगा वाचतो	दोन मुले वाचतात	अनेक मुले वाचतात

या वाक्यांमधील बालः, बालौ, बालाः या विभक्ती प्रत्ययांच्या नामांच्या रूपांवरून अनेक पठति, पठतः, पठन्ति या क्रियापदांच्या रूपांवरून एक, दोन व त्यापेक्षा अधिक ही संख्या म्हणजेच वचन होय असे आपल्याला समजून येते.

विभक्ती : संस्कृतमध्ये एकूण आठ विभक्ती आहेत.

उदा. प्रथमा, द्वितीया, तृतीया, चतुर्थी, पंचमी, षष्ठी, सप्तमी व आठवी विभक्ती म्हणजेच संबोधन या नावाने ओळखली जाते.

संस्कृतमध्ये प्रत्येक नामाची ८ द ३ = २४ रूपे होतात. यामध्ये एक गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, नवीन भाषा शिकताना त्या नामांना लागणारे प्रत्यय पाठांतर केले असता एकाच गटातील सर्व नामांची रुपे साधारण एकाच पद्धतीची कशी बनतात ते ध्यानात राहते. त्याशिवाय त्या भाषेवर प्रभुत्व मिळविता येत नाही. संस्कृतमध्येसुद्धा वेगवेगळ्या गटातील प्रातिनिधिक शब्दांची रूपे पाठ करून त्यास कारकार्थ जोडले असता मराठी अर्थ तयार होतो. व त्यामुळे विशिष्ट ओळींमधील नामांच्या रूपांचा अर्थ आकलन होतो.

शब्दांची रूपे : स्वरांत शब्दांना विभक्ती प्रत्यय लावून त्यांची पदे बनविली जातात. त्यासाठी शब्दांना जोडले जाणारे प्रत्यय पुढीलप्रमाणे आहेत.

विभक्ती	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्रथमा	स् (:)	औ	अस् (:)
द्वितीया	अम्	औ	अस् (:)
तृतीया	आ	भ्याम्	भिस् (:)
चतुर्थी	ए	भ्याम्	भ्यस् (:)
पंचमी	अस् (:)	भ्याम्	भ्यस् (:)
षष्ठी	अस् (:)	ओस् (:)	आम्
सप्तमी	इ	ओस् (:)	सु
संबोधन	स्	औ	अस् (:)

टीप : या वरील प्रत्ययांच्या शेवटी आलेल्या 'स्' ऐवजी विसर्ग होतो.

वरील सर्व विभक्ती प्रत्यय विविध शब्दांना जोडले असता प्रत्येक प्रकारच्या शब्दांची जी रूपे बनतात अर्थात त्यामध्ये झालेले बदल कसे होतात हे स्पष्ट करण्याऐवजी विभक्तीप्रत्ययान्त रूपेच खाली चालवून दाखविलेली आहेत. त्या-त्या रूपांना त्यांच्या विभक्तींचा कारकार्थ जोडून त्यांचा मराठीत अर्थ तयार केला असता कोणत्याही संस्कृत वाक्याचा मराठी अर्थ करण्यास मदत होईल. प्रत्येक प्रकारातील शब्द खालीलप्रमाणे पाठ केला असता त्या त्या प्रकारातील अन्य विविध शब्दांची रूपे सहज बनविता येतील.

स्वरान्त नामे

अकारान्त पुल्लिंगी : देव – (ईश्वर, राजा)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**विभक्ती**
देव:	देवौ	देवा:	प्रथमा
देवम्	देवौ	देवान्	द्वितीया
देवेन	देवाभ्याम्	देवै:	तृतीया
देवाय	देवाभ्याम्	देवेभ्य:	चतुर्थी
देवात्	देवाभ्याम्	देवेभ्य:	पंचमी
देवस्य	देवयो:	देवानाम्	षष्ठी
देवे	देवयो:	देवेषु	सप्तमी
हे देव	हे देवौ	हे देवा:	संबोधन

'देव' प्रमाणे चालणारे शब्द – राम, गज, मेघ, कृष्ण, नृप, भूप, काक, इत्यादी.

अकारान्त नपुं. : वन – (अरण्य)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**विभक्ती**
वनम्	वने	वनानि	प्रथमा
वनम्	वने	वनानि	द्वितीया
वनेन	वनाभ्याम्	वनै:	तृतीया
वनाय	वनाभ्याम्	वनेभ्य:	चतुर्थी
वनात्	वनाभ्याम्	वनेभ्य:	पंचमी
वनस्य	वनयो:	वनानाम्	षष्ठी
वने	वनयो:	वनेषु	सप्तमी
हे वन	हे वने	हे वनानि	संबोधन

'वन' प्रमाणे चालणारे शब्द –
जल, फल, ज्ञान, नगर, धन, पुष्प, सुख इत्यादी

अकारान्त स्त्रीलिंगी : माला – (माळ, हार)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**विभक्ती**
माला	माले	माला:	प्रथमा
मालाम्	माले	माला:	द्वितीया
मालया	मालाभ्याम्	मालाभि:	तृतीया
मालायै	मालाभ्याम्	मालाभ्य:	चतुर्थी
मालाया:	मालाभ्याम्	मालाभ्य:	पंचमी
मालाया:	मालयो:	मालानाम्	षष्ठी
मालायाम्	मालयो:	मालासु	सप्तमी
हे माले	हे माले	हे माला:	संबोधन

'माला' प्रमाणे चालणारे शब्द – शाला, रमा, शाखा, भाषा, शाला, तारा, सीता इत्यादी

इकारान्त पुल्लिंगी

कवि – कवी

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
कवि:	कवी	कवय:	प्र.
कविम्	कवी	कवीन्	द्वि.
कविना	कविभ्याम्	कविभि:	तृ.
कवये	कविभ्याम्	कविभ्य:	च.
कवे:	कविभ्याम्	कविभ्य:	पं.
कवे:	कव्यो:	कवीनाम्	ष.
कवौ	कव्यो:	कविषु	स.
कवे	कवी	कवय:	सं.

'कवि' प्रमाणे चालणारे शब्द – कपि, मुनि, हरि, रवि, नृपति, इत्यादी

इकारान्त नपुंसकलिंगी –

वारि – पाणी

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
वारि	वारिणी	वारीणि	प्र.
वारि	वारिणी	वारीणि	द्वि.
वारिणा	वारिभ्याम्	वारिभि:	तृ.
वारिणे	वारिभ्याम्	वारिभ्य:	च.
वारिण:	वारिभ्याम्	वारिभ्य:	पं.
वारिण:	वारिणो:	वारीणाम्	ष.
वारिणि	वारिणो:	वारिषु	स.
वारे,वारि	वारिणी	वारीणि	सं.

'वारि' प्रमाणे चालणारे (विशेषण) शब्द

सुरभि (सुवासिक), शुचि (पवित्र), भूरि (पुष्कळ) इ.

इकारान्त स्त्रीलिंगी

मति – बुद्धी

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
मति:	मती	मतय:	प्र.
मतिम्	मती	मती:	द्वि.
मत्या	मतिभ्याम्	मतिभि:	तृ.
मत्यै,मतये	मतिभ्याम्	मतिभ्य:	च.
मत्या:,मते:	मतिभ्याम्	मतिभ्य:	पं.
मत्या:,मते:	मत्यो:	मतीनाम्	ष.
मत्याम्,मतौ	मत्यो:	मतिषु	स.
मते	मती	मतय:	सं.

'मति' प्रमाणे चालणारे शब्द – गति, भूमि, रुचि, प्रीति, भक्ति, शक्ति इत्यादी.

ईकारान्त स्त्रीलिंगी

नदी – नदी

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
नदी	नद्यौ	नद्यः	प्र.
नदीम्	नद्यौ	नदीः	द्वि.
नद्या	नदीभ्याम्	नदीभिः	तृ.
नद्यै	नदीभ्याम्	नदीभ्यः	च.
नद्याः	नदीभ्याम्	नदीभ्यः	पं.
नद्याः	नद्योः	नदीनाम्	ष.
नद्याम्	नद्योः	नदीषु	स.
नदि	नद्यौ	नद्यः	सं.

'नदी' प्रमाणे चालणारे शब्द – नारी, दासी, गोपी, युवती, वापी, नगरी, जननी, इत्यादी

उकारान्त पुल्लिंगी

भानु – सूर्य

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
भानुः	भानू	भानवः	प्र.
भानुम्	भानू	भानून्	द्वि.
भानुना	भानुभ्याम्	भानुभिः	तृ.
भानवे	भानुभ्याम्	भानुभ्यः	च.
भानोः	भानुभ्याम्	भानुभ्यः	पं.
भानोः	भान्वोः	भानूनाम्	ष.
भानौ	भान्वोः	भानुषु	स.
भानो	भानू	भानवः	सं.

'भानु' प्रमाणे चालणारे शब्द – पशु, वायु, मनु, गुरु, तरु, विष्णु, रिपु इत्यादी.

उकारान्त नपुंसकल्लिंगी –

मधु – मध

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
मधु	मधुनी	मधूनि	प्र.
मधु	मधुनी	मधूनि	द्वि.
मधुना	मधुभ्याम्	मधुभिः	तृ.
मधुने	मधुभ्याम्	मधुभ्यः	च.
मधुनः	मधुभ्याम्	मधुभ्यः	पं.
मधुनः	मधुनोः	मधूनाम्	ष.
मधुनि	मधुनोः	मधुषु	स.
मधो,मधु	मधुनी	मधूनि	सं.

'मधु' प्रमाणे चालणारे शब्द – वस्तु, अश्रु, वसु (द्रव्य), सानु (शिखर), जानु, दारु इ.

उकारान्त स्त्रीलिंगी

धेनु – गाय

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
धेनुः	धेनू	धेनवः	प्र.
धेनुम्	धेनू	धेनूः	द्वि.
धेन्वा	धेनुभ्याम्	धेनुभिः	तृ.
धेन्वै,धेनवे	धेनुभ्याम्	धेनुभ्यः	च.
धेन्वाः,धेनोः	धेनुभ्याम्	धेनुभ्यः	पं.
धेन्वाः,धेनोः	धेन्वोः	धेनूनाम्	ष.
धेन्वाम्,धेनौ	धेन्वोः	धेनुषु	स.
धेनो	धेनू	धेनवः	सं.

'धेनु' प्रमाणे चालणारे शब्द – रज्जु (दोरी), चञ्चु (चोच), तनु (शरीर), हनु, करेणु इ.

ऊकारान्त स्त्रीलिंगी

वधू – पत्नी,सून

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
वधू	वध्वौ	वध्वः	प्र.
वधूम्	वध्वौ	वधूः	द्वि.
वध्वा	वधूभ्याम्	वधूभिः	तृ.
वध्वै	वधूभ्याम्	वधूभ्यः	च.
वध्वाः	वधूभ्याम्	वधूभ्यः	पं.
वध्वाः	वध्वोः	वधूनाम्	ष.
वध्वाम्	वध्वोः	वधूषु	स.
वधु	वध्वौ	वध्वः	सं.

'वधू' प्रमाणे चालणारे शब्द –
चमू (सेना), पंङगू , चञ्चू (चोच) इ.

व्यंजनान्त शब्दांची रुपे

ऋकारान्त पुल्लिंगी –

पितृ – पिता, वडील

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
पिता	पितरौ	पितरः	प्र.
पितरम्	पितरौ	पितॄन्	द्वि.
पित्रा	पितृभ्याम्	पितृभिः	तृ.
पित्रे	पितृभ्याम्	पितृभ्यः	च.
पितुः	पितृभ्याम्	पितृभ्यः	पं.
पितुः	पित्रोः	पितॄणाम्	ष.
पितरि	पित्रोः	पितृषु	स.
पितः	पितरौ	पितरः	सं.

'पितृ' प्रमाणे चालणारे शब्द – भ्रातृ (भाऊ), देवृ (दीर), जामातृ (जावई) कर्तृ, नृ (मनुष्य) इ.

धातृ (नपुं.) – उत्पादक (विशेषण)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
धातृ	धातृणी	धातॄणि	प्र.
धातृ	धातृणी	धातॄणि	द्वि.
धातृणा, धात्रा	धातृभ्याम्	धातृभिः	तृ.
धातृणे, धात्रे	धातृभ्याम्	धातृभ्यः	च.
धातृणः, धातुः	धातृभ्याम्	धातृभ्यः	पं.
धातृणः, धातुः	धातृणोः,धात्रोः	धातॄणाम्	ष.
धातृणि, धातरि	धातृणोः,धात्रोः	धातृषु	स.
धातृ, धातः	धातृणी	धातॄणि	सं.

'धातृ' प्रमाणे चालणारी नपु.लिंगी विशेषणे – कर्तृ, वक्तृ, भोक्तृ, नेतृ इत्यादी.

ऋकारान्त

मातृ (स्त्रीलिंगी) – आई

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**विभक्ती**
माता	मातरौ	मातरः	प्र.
मातरम्	मातरौ	मातॄः	द्वि.
मात्रा	मातृभ्याम्	मातृभिः	तृ.
मात्रे	मातृभ्याम्	मातृभ्यः	च.
मातुः	मातृभ्याम्	मातृभ्यः	पं.
मातुः	मात्रोः	मातॄणाम्	ष.
मातरि	मात्रोः	मातृषु	स.
मातः	मातरौ	मातरः	सं.

'मातृ'प्रमाणे चालणारे शब्द – दुहितृ (मुलगी),
ननान्दृ (नणंद), यातृ (जाऊ), श्वसृ इ.

(तकारान्त) पुल्लिंगी – मरुत् (वारा)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
मरुत्	मरुतौ	मरुतः	प्र.
मरुतम्	मरुतौ	मरुतः	द्वि.
मरुता	मरुद्भ्याम्	मरुद्भिः	तृ.
मरुते	मरुद्भ्याम्	मरुद्भ्यः	च.
मरुतः	मरुद्भ्याम्	मरुद्भ्यः	पं.
मरुतः	मरुतोः	मरुताम्	ष.
मरुति	मरुतोः	मरुत्सु	स.
मरुत्	मरुतौ	मरुतः	सं.

स्त्रीलिंगी – सरित् (नदी)

एकवचन	द्विवचन	बहुवचन	वि.
सरित्	सरितौ	सरित:	प्र.
सरितम्	सरितौ	सरित:	द्वि.
सरिता	सरिद्भ्याम्	सरिद्भि:	तृ.
सरिते	सरिद्भ्याम्	सरिद्भ्य:	च.
सरित:	सरिद्भ्याम्	सरिद्भ्य:	पं.
सरित:	सरितो:	सरिताम्	ष.
सरिति	सरितो:	सरित्सु	स.
सरित्	सरितौ	सरित:	सं.

नपुंसकलिंगी – जगत् (जग)

एकवचन	द्विवचन	बहुवचन	वि.
जगत्	जगती	जगन्ति	प्र.
जगत्	जगती	जगन्ति	द्वि.
जगता	जगद्भ्याम्	जगद्भि:	तृ.
जगते	जगद्भ्याम्	जगद्भ्य:	च.
जगत:	जगद्भ्याम्	जगद्भ्य:	पं.
जगत:	जगतो:	जगताम्	ष.
जगति	जगतो:	जगत्सु	स.
जगत्	जगती	जगन्ति	सं.

(सकारान्त) पुल्लिंगी – चन्द्रमस् (चन्द्र)

एकवचन	द्विवचन	बहुवचन	वि.
चन्द्रमा:	चन्द्रमसौ	चन्द्रमस:	प्र.
चन्द्रमसम्	चन्द्रमसौ	चन्द्रमस:	द्वि.
चन्द्रमसा	चन्द्रमोभ्याम्	चन्द्रमोभि:	तृ.
चन्द्रमसे	चन्द्रमोभ्याम्	चन्द्रमोभ्य:	च.
चन्द्रमस:	चन्द्रमोभ्याम्	चन्द्रमोभ्य:	पं.
चन्द्रमस:	चन्द्रमसो:	चन्द्रमसाम्	ष.
चन्द्रमसि	चन्द्रमसो:	चन्द्रम:सु	स.
चन्द्रम:	चन्द्रमसौ	चन्द्रमस:	सं.

स्त्रीलिंगी – अप्सरस् (अप्सरा)

एकवचन	द्विवचन	बहुवचन	वि.
अप्सरा:	अप्सरसौ	अप्सरस:	प्र.
अप्सरसम्	अप्सरसौ	अप्सरस:	द्वि.
अप्सरसा	अप्सरोभ्याम्	अप्सरोभि:	तृ.
अप्सरसे	अप्सरोभ्याम्	अप्सरोभ्य:	च.
अप्सरस:	अप्सरोभ्याम्	अप्सरोभ्य:	पं.
अप्सरस:	अप्सरसो:	अप्सरसाम्	ष.
अप्सरसि	अप्सरसो:	अप्सर:सु	स.
अप्सर:	अप्सरसौ	अप्सरस:	सं.

नपुंसकलिंगी – पयस् (दूध, पाणी)

एकवचन	द्विवचन	बहुवचन	वि.
पय:	पयसी	पयांसि	प्र.
पय:	पयसी	पयांसि	द्वि.
पयसा	पयोभ्याम्	पयोभि:	तृ.
पयसे	पयोभ्याम्	पयोभ्य:	च.
पयस:	पयोभ्याम्	पयोभ्य:	पं.
पयस:	पयसो:	पयसाम्	ष.
पयसि	पयसो:	पय:सु	स.
पय:	पयसी	पयांसि	सं.

(अन्नन्त) पुल्लिंगी – राजन् (राजा)

एकवचन	द्विवचन	बहुवचन	वि.
राजा	राजानौ	राजान:	प्र.
राजानम्	राजानौ	राज्ञ:	द्वि.
राज्ञा	राजभ्याम्	राजभि:	तृ.
राज्ञे	राजभ्याम्	राजभ्य:	च.
राज्ञ:	राजभ्याम्	राजभ्य:	पं.
राज्ञ:	राज्ञो:	राज्ञाम्	ष.
राज्ञि–राजनि	राज्ञो:	राजसु	स.
राजन्	राजानौ	राजान:	सं.

स्त्रीलिंगी – सीमन् (मर्यादा)

एकवचन	द्विवचन	बहुवचन	वि.
सीमा	सीमानौ	सीमान:	प्र.
सीमानम्	सीमानौ	सीम्न:	द्वि.
सीम्ना	सीमभ्याम्	सीमभि:	तृ.
सीम्ने	सीमभ्याम्	सीमभ्य:	च.
सीम्न:	सीमभ्याम्	सीमभ्य:	पं.
सीम्न: सिम्नि,	सीम्नो:	सीम्नाम्	ष.
सीमनि	सीम्नो:	सीमसु	स.
सीमन्	सीनामौ	सीमान:	सं.

नपुंसकलिंगी – नामन् (नाव)

एकवचन	द्विवचन	बहुवचन	वि.
नाम	नाम्नी–नामनी	नामानि	प्र.
नाम	नाम्नी–नामनी	नामानि	द्वि.
नाम्ना	नामभ्याम्	नामभि:	तृ.
नाम्ने	नामभ्याम्	नामभ्य:	च.
नाम्न:	नामभ्याम्	नामभ्य:	पं.
नाम्न:	नाम्नो:	नाम्नाम्	ष.
नाम्नि–नामनि	नाम्नो:	नामसु	स.
नामन्–नाम	नाम्नी–नामनी	नामानि	सं.

पुल्लिंगी – आत्मन् (आत्मा, स्वत:)

एकवचन	द्विवचन	बहुवचन	वि.
आत्मा	आत्मानौ	आत्मान:	प्र.
आत्मानम्	आत्मानौ	आत्मन:	द्वि.
आत्मना	आत्मभ्याम्	आत्मभि:	तृ.
आत्मने	आत्मभ्याम्	आत्मभ्य:	च.
आत्मन:	आत्मभ्याम्	आत्मभ्य:	पं.
आत्मन:	आत्मनो:	आत्मनाम्	ष.
आत्मनि	आत्मनो:	आत्मसु	स.
आत्मन्	आत्मानौ	आत्मान:	सं.

नपुंसकलिंगी – जन्मन् (जन्म)

एकवचन	द्विवचन	बहुवचन	वि.
जन्म	जन्मनी	जन्मानि	प्र.
जन्म	जन्मनी	जन्मानि	द्वि.
जन्मना	जन्मभ्याम्	जन्मभि:	तृ.
जन्मने	जन्मभ्याम्	जन्मभ्य:	च.
जन्मन:	जन्मभ्याम्	जन्मभ्य:	पं.
जन्मन:	जन्मनो:	जन्मनाम्	ष.
जन्मनि	जन्मनो:	जन्मसु	स.
जन्मन्,जन्म	जन्मनी	जन्मानि	सं.

दकारान्त पुल्लिंगी – सुहृद् (मित्र)

एकवचन	द्विवचन	बहुवचन	वि.
सुहृद्	सुहृदौ	सुहृदः	प्र.
सुहृदम्	सुहृदौ	सुहृदः	द्वि.
सुहृदा	सुहृद्भ्याम्	सुहृद्भिः	तृ.
सुहृदे	सुहृद्भ्याम्	सुहृद्भ्य:	च.
सुहृदः	सुहृद्भ्याम्	सुहृद्भ्य:	पं.
सुहृदः	सुहृदोः	सुहृदाम्	ष.
सुहृदि	सुहृदोः	सुहृत्सु	स.
सुहृद्	सुहृदौ	सुहृदः	सं.

(वत् –प्रत्ययांत)
पुल्लिंगी –भगवत् (भगवान)

एकवचन	द्विवचन	बहुवचन	वि.
भगवान्	भगवन्तौ	भगवन्त:	प्र.
भगवन्तम्	भगवन्तौ	भगवत:	द्वि.
भगवता	भगवद्भ्याम्	भगवद्भि:	तृ.
भगवते	भगवद्भ्याम्	भगवद्भ्य:	च.
भगवत:	भगवद्भ्याम्	भगवद्भ्य:	पं.
भगवत:	भगवतो:	भगवताम्	ष.
भगवति	भगवतो:	भगवत्सु	स.
भगवन्	भगवन्तौ	भगवन्त:	सं.

स्त्रीलिंगी – भगवती (देवी) नदीप्रमाणे

एकवचन	द्विवचन	बहुवचन	वि.
भगवती	भगवत्यौ	भगवत्य:	प्र.
भगवतीम्	भगवत्यौ	भगवती:	द्वि.
भगवत्या	भगवतीभ्याम्	भगवतीभि:	तृ.
भगवत्यै	भगवतीभ्याम्	भगवतीभ्य:	च.
भगवत्या:	भगवतीभ्याम्	भगवतीभ्य:	पं.
भगवत्या:	भगवत्यो:	भगवतीनाम्	ष.
भगवत्याम्	भगवत्यो:	भगवतीषु	स.
भगवति	भगवत्यौ	भगवत्य:	सं.

नपु. – गुणवत् (गुणवान)

एकवचन	द्विवचन	बहुवचन	वि.
गुणवत्	गुणवती	गुणवन्ति	प्र.
गुणवत्	गुणवती	गुणवन्ति	द्वि.
गुणवता	गुणवद्भ्याम्	गुणवद्भि:	तृ.
गुणवते	गुणवद्भ्याम्	गुणवद्भ्य:	च.
गुणवत:	गुणवद्भ्याम्	गुणवद्भ्य:	पं.
गुणवत:	गुणवतो:	गुणवताम्	ष.
गुणवति	गुणवतो:	गुणवत्सु	स.
हे गुणवत्	हे गुणवती	हे गुणवन्ति	सं.

(इन्नन्त) पुल्लिंगी – शशिन् (चन्द्र)

एकवचन	द्विवचन	बहुवचन	वि.
शशी	शशिनौ	शशिन:	प्र.
शशिनम्	शशिनौ	शशिन:	द्वि.
शशिना	शशिभ्याम्	शशिभि:	तृ.
शशिने	शशिभ्याम्	शशिभ्य:	च.
शशिन:	शशिभ्याम्	शशिभ्य:	पं.
शशिन:	शशिनो:	शशिनाम्	ष.
शशिनि	शशिनो:	शशिषु	स.
शशिन्	शशिनौ	शशिन:	सं.

स्त्रीलिंगी – करिन् (हत्ती) नदीप्रमाणे

एकवचन	द्विवचन	बहुवचन	वि.
करिणी	करिण्यौ	करिण्य:	प्र.
करिणीम्	करिण्यौ	करिणी:	द्वि.
करिण्या	करिणीभ्याम्	करिणीभि:	तृ.
करिण्यै	करिणीभ्याम्	करिणीभ्य:	च.
करिण्या:	करिणीभ्याम्	करिणीभ्य:	पं.
करिण्या:	करिण्यो:	करिणीनाम्	ष.
करिण्याम्	करिण्यो:	करिणीषु	स.
करिणि	करिण्यौ	करिण्य:	सं.

नपुंसकलिंगी – मनोहारिन्

एकवचन	द्विवचन	बहुवचन	वि.
मनोहारि	मनोहारिणी	मनोहारीणि	प्र.
मनोहारि	मनोहारिणी	मनोहारीणि	द्वि.
मनोहारिणा	मनोहारिभ्याम्	मनोहारिभि:	तृ.
मनोहारिणे	मनोहारिभ्याम्	मनोहारिभ्य:	च.
मनोहारिण:	मनोहारिभ्याम्	मनोहारिभ्य:	पं.
मनोहारिण:	मनोहारिणो:	मनोहारिणाम्	ष.
मनोहारिणि	मनोहारिणो:	मनोहारिषु	स.
मनोहारि	मनोहारिणी	मनोहारीणि	सं.

स्त्रीलिंगी – वाच् (वाणी)

एकवचन	द्विवचन	बहुवचन	वि.
वाक्,वाग्	वाचौ	वाच:	प्र.
वाचम्	वाचौ	वाच:	द्वि.
वाचा	वाग्भ्याम्	वाग्भि:	तृ.
वाचे	वाग्भ्याम्	वाग्भ्य:	च.
वाच:	वाग्भ्याम्	वाग्भ्य:	पं.
वाच:	वाचो:	वाचाम्	ष.
वाचि	वाचो:	वाक्षु	स.
वाक्,वाग्	वाचौ	वाच:	सं.

स्त्रीलिंगी – दिश् (दिशा)

एकवचन	द्विवचन	बहुवचन	वि.
दिक्,दिग्	दिशौ	दिश:	प्र.
दिशम्	दिशौ	दिश:	द्वि.
दिशा	दिग्भ्याम्	दिग्भि:	तृ.
दिशे	दिग्भ्याम्	दिग्भ्य:	च.
दिश:	दिग्भ्याम्	दिग्भ्य:	पं.
दिश:	दिशो:	दिशाम्	ष.
दिशि	दिशो:	दिक्षु	स.
दिक्,दिग्	दिशौ	दिश:	सं.

स्त्रीलिंगी – स्रज् (माळ)

एकवचन	द्विवचन	बहुवचन	वि.
स्रक्,स्रग्	स्रजौ	स्रज:	प्र.
स्रजम्	स्रजौ	स्रज:	द्वि.
स्रजा	स्रग्भ्याम्	स्रग्भि:	तृ.
स्त्रजे	स्रग्भ्याम्	स्रग्भ्य:	च.
स्रज:	स्रग्भ्याम्	स्रग्भ्य:	पं.
स्त्रज:	स्रजो:	स्रजाम्	ष.
स्रजि	स्रजो:	स्रक्षु	स.
स्रक्,स्रग्	स्रजौ	स्त्रज:	सं.

भाषा ही माणसाचे भावना व विचार व्यक्त करण्याचे प्रमुख साधन आहे व त्यासाठी वाक्य हा महत्त्वाचा घटक ठरतो. वाक्यामधील शब्दांचा परस्परांशी येणारा संबंध व्यक्त करण्यासाठी वापराव्या लागणाऱ्या विभक्तीमध्ये वाक्यातील शब्दांचा क्रियापदांशी येणारा संबंध तसेच विशेषण विशेष भावसंबंध या सर्व गोष्टींचा अंतर्भाव होतो. वाक्यामध्ये विशेषत: ज्या विभक्तीरूपांचा विचार केला जातो, त्यात दोन प्रकारच्या विभक्ती असतात–कारक विभक्ती व उपपद विभक्ती.

(क) कारक विभक्ती : कर्तरि किंवा कर्मणि प्रयोगानुसार कर्ता प्रथमेत किंवा तृतीयेत आणि कर्म द्वितीयेत किंवा प्रथमेत असते आणि इतर कारकांच्या विभक्ती मात्र ठरलेल्या असतात. तृतीयेत करण (साधन) चतुर्थीत संप्रदान, पंचमीत अपादान आणि सप्तमीमध्ये अधिकरण (स्थान) अशी विभक्तीची व्यवस्था आहे. या कारकसंबंधावरून वापरल्या जाणाऱ्या विभक्तींना कारक विभक्ती असे म्हणतात. उदा. प्रभाते नद्यां भक्त: हस्ताभ्यां सूर्याय अर्घ्यं यच्छति।

(ख) उपपद विभक्ती : षष्ठी विभक्तीमध्ये संबंध दाखविला जातो. उदा. **वृक्षस्य फलं पतति ।** या वाक्यामध्ये पडणे या क्रियेचा फळाशी प्रत्यक्ष संबंध येतो. षष्ठ्यन्त पदाचा पडण्याशी मात्र संबंध नाही. म्हणून वृक्षस्य ही कारकविभक्ती होत नाही. अशा षष्ठीला संबंधदर्शक विभक्ती म्हणतात. अशा प्रकारच्या विभक्तींना उपपद विभक्ती म्हणून संबोधिले जाते.

वरील विभक्तीप्रत्यय प्रातिपदिक शब्दांना जोडून शब्द चालवून दाखविलेले आहेत. ह्या शब्दांची रुपे सरावाने पाठ करून त्यांच्या विशिष्ट रुपांना प्रत्येक विभक्तीचा कारकार्थ जोडला असता सर्व संस्कृत शब्दरुपांचा मराठीत अर्थ तयार होतो. त्यासाठी विभक्तीश: खालील कारक व कारकार्थ ध्यानात घेऊन कोणत्याही शब्दरुपांचा मराठीत अर्थ तयार करण्याचा प्रयत्न करावा.

कोणत्याही प्रातिनिधिक शब्दांची रुपे पाठच करावी लागतात. ती पाठ करण्यासाठी तीन पद्धतींचा अवलंब करावा. (१) शब्दांची रुपे उंच आवाजात वाचावी. (२) ती अनेक वेळा वाचावीत आणि (३) वेगाने वाचावीत. असे केले असता शब्दांची रुपे स्मरणात राहतील.

अशा प्रकारे स्मरणात राहिलेल्या शब्दरुपांना त्या त्या विभक्तींचे पुढील कारकार्थ जोडून मराठीत अर्थ तयार करावा.

● कारकार्थ ●

कर्ता कर्म च करणं संप्रदानं तथैवच । अपादानाधिकरणम् इत्याहु: कारकाणि षट् ।।

विभक्ती	कारक	कारकार्थ
प्रथमा	कर्ता	-
द्वितीया	कर्म	स, ला, ना
तृतीया	करण	ने, नी, शी,कडून, मुळे
चतुर्थी	सम्प्रदान	स, ला, ना, करिता, साठी
पंचमी	अपादान	ऊन, हून, तून, पासून, पेक्षा
षष्ठी	(सम्बन्ध)	चा, ची, चे, च्या
सप्तमी	अधिकरण	आत, मध्ये, विषयी, वर
सम्बोधन	-	हे, नो

वरील सर्व प्रकारच्या शब्दांना कारकार्थ जोडले असता मराठी अर्थ कसा तयार होतो यासाठी ‘देव’ या शब्दाला कारकार्थ जोडून मराठी अर्थ स्पष्ट करून दाखविले आहे. याप्रमाणे इतर शब्दांना कारकार्थ जोडून मराठी अर्थ करण्याचा प्रयत्न करावा. ‘देव’ शब्दाला कारकार्थ जोडून खालीलप्रमाणे मराठी अर्थ तयार केला जातो.

देव: - एक देव

देवौ - दोन देव

देवा: - अनेक देव

देवम् - एका देवास, एका देवाला

देवौ - दोन देवांस, दोन देवांना

देवान् - अनेक देवांस, अनेक देवांना

देवेन - (एका) देवाने, (एका) देवाशी
(एका) देवाकडून, (एका) देवामुळे

देवाभ्याम्- (दोन) देवांनी, (दोन) देवांशी
(दोन) देवांकडून, (दोन) देवांमुळे

देवै: - (अनेक) देवांनी, (अनेक) देवांशी
(अनेक) देवांकडून, (अनेक) देवांमुळे

देवाय - (एका) देवास, (एका) देवाला
(एका) देवाकरिता, (एका) देवासाठी

देवाभ्याम्- (दोन) देवांस, (दोन) देवांला
(दोन)देवांकरिता, (दोन) देवांसाठी

देवेभ्य:	-	(अनेक) देवांस,	(अनेक) देवांला
		(अनेक) देवांकरिता,	(अनेक) देवांसाठी
देवात्	-	(एका) देवाहून,	(एका) देवातून
		(एका) देवापासून,	(एका) देवापेक्षा
देवाभ्याम्	-	(दोन) देवांहून,	(दोन) देवांतून
		(दोन) देवांपासून,	(दोन) देवांपेक्षा
देवेभ्य:	-	(अनेक) देवांहून,	(अनेक) देवांतून
		(अनेक) देवांपासून,	(अनेक) देवांपेक्षा
देवस्य	-	(एका) देवाचा,	(एका) देवाची
		(एका) देवाचे,	(एका) देवाच्या
देवयो:	-	(दोन) देवांचा,	(दोन) देवांची
		(दोन) देवांचे,	(दोन) देवांच्या
देवानाम्	-	(अनेक) देवांचा,	(अनेक) देवांची
		(अनेक) देवांचे,	(अनेक) देवांच्या
देवे	-	(एका) देवात,	(एका) देवामध्ये
		(एका) देवाविषयी,	(एका) देवावर
देवयो:	-	(दोन) देवांत,	(दोन) देवांमध्ये
		(दोन) देवांविषयी,	(दोन) देवांवर
देवेषु	-	(अनेक) देवांत,	(अनेक) देवांमध्ये
		(अनेक) देवांविषयी,	(अनेक) देवांवर

उदा. प्रभाते नद्यां भक्त: हस्ताभ्यां सूर्याय अर्घ्यं यच्छति ।

(भक्त सकाळी नदीमध्ये दोन हातांनी सूर्याला अर्घ्य देतो.)

अशा प्रकारे कारकार्थानुसार संस्कृत वाक्यांचा मराठीत अर्थ तयार करता येतो.

(ग) सर्वनाम

मनातील आशय व्यक्त करताना वाक्यांमध्ये वेळोवेळी नामांच्या ऐवजी आपण सर्वनामांचा वापर करतो. म्हणजेच नामांच्या ऐवजी वापरल्या जाणाऱ्या शब्दांना सर्वनाम असे म्हणतात. सर्वनामांचे दोन प्रकार पडतात.

- स्वरांत सर्वनाम - उदा. 'सर्व', 'अन्य'.
- व्यजनांत सर्वनाम - उदा. किम्, यद्, तद्, एतद्, अस्मद्, युष्मद्, इदम्, भवत्,

या सर्व सर्वनामांची विभागणी पुढीलप्रमाणे करता येईल.

(१) पुरुषवाचक सर्वनाम - अस्मद्, युष्मद्, (तद्, भवत् तिन्ही लिंगी)

(२) दर्शक सर्वनाम - तद्, एतद्, इदम्, अदस् (तिन्ही लिंगी)

(३) संबंधी सर्वनाम - यद् (तिन्ही लिंगी)

(४) प्रश्नार्थक सर्वनाम - किम् (तिन्ही लिंगी)

(५) सामान्य सर्वनाम - सर्व, अन्य

या सर्व सर्वनामांना विभक्ती प्रत्यय जोडून पुढीलप्रमाणे रुपे तयार होतात. ती विद्यार्थ्यांनी कंठस्थ करावी व वरील नामांप्रमाणेच या सर्वनामांनासुद्धा कारकार्थ जोडून मराठीत अर्थ तयार करण्याचा प्रयत्न करावा. सर्वनामांची रुपे पुढीलप्रमाणे आहेत.

सर्वनामे

अस्मद् –(सर्वनाम) **– मी, आम्ही**

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
अहम्	आवाम्	वयम्	प्र.
माम्, मा	आवाम्, नौ	अस्मान्, नः	द्वि.
मया	आवाभ्याम्	अस्माभिः	तृ.
मह्यम्, मे	आवाभ्याम्, नौ	अस्मभ्यम्, नः	च.
मत्	आवाभ्याम्	अस्मत्	पं.
मम, मे	आवयोः, नौ	अस्माकम्, नः	ष.
मयि	आवयोः	अस्मासु	स.

युष्मद् –(सर्वनाम) **– तू, तुम्ही**

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
त्वम्	युवाम्	यूयम्	प्र.
त्वाम्, त्वा	युवाम्, वाम्	युष्मान्, वः	द्वि.
त्वया	युवाभ्याम्	युष्माभिः	तृ.
तुभ्यम्, ते	युवाभ्याम्, वाम्	युष्मभ्यम्, वः	च.
त्वत्	युवाभ्याम्	युष्मत्	पं.
तव, ते	युवयोः, वाम्	युष्माकम्, वः	ष.
त्वयि	युवयोः	युष्मासु	स.

प्रश्नार्थक किम् सर्वनाम **– पु.** (कोण, काय)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**विभक्ती**
कः	कौ	के	प्र.
कम्	कौ	कान्	द्वि.
केन	काभ्याम्	कैः	तृ.
कस्मै	काभ्याम्	केभ्यः	च.
कस्मात्	काभ्याम्	केभ्यः	पं.
कस्य	कयोः	केषाम्	ष.
कस्मिन्	कयोः	केषु	स.

प्रश्नार्थक किम् सर्वनाम–नपुं. (कोण, काय)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**विभक्ती**
किम्	के	कानि	प्र.
किम्	के	कानि	द्वि.
केन	काभ्याम्	कैः	तृ.
कस्मै	काभ्याम्	केभ्यः	च.
कस्मात्	काभ्याम्	केभ्यः	पं.
कस्य	कयोः	केषाम्	ष.
कस्मिन्	कयोः	केषु	स.

प्रश्नार्थक किम् सर्वनाम– स्त्री. (कोण, काय)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**विभक्ती**
का	के	काः	प्र.
काम्	के	काः	द्वि.
कया	काभ्याम्	काभिः	तृ.
कस्यै	काभ्याम्	काभ्यः	च.
कस्याः	काभ्याम्	काभ्यः	पं.
कस्याः	कयोः	कासाम्	ष.
कस्याम्	कयोः	कासु	स.

यद् – सर्वनाम – **पु.** (जो)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**विभक्ती**
यः	यौ	ये	प्र.
यम्	यौ	यान्	द्वि.
येन	याभ्याम्	यैः	तृ.
यस्मै	याभ्याम्	येभ्यः	च.
यस्मात्	याभ्याम्	येभ्यः	पं.
यस्य	ययोः	येषाम्	ष.
यस्मिन्	ययोः	येषु	स.

यद् – सर्वनाम – **नपुं.** (जे)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**विभक्ती**
यत् –यद्	ये	यानि	प्र.
यत्–यद्	ये	यानि	द्वि.
येन	याभ्याम्	यैः	तृ.
यस्मै	याभ्याम्	येभ्यः	च.
यस्मात्	याभ्याम्	येभ्यः	पं.
यस्य	ययोः	येषाम्	ष.
यस्मिन्	ययोः	येषु	स.

यद् – सर्वनाम – **स्त्री.** (जी)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**विभक्ती**
या	ये	याः	प्र.
याम्	ये	याः	द्वि.
यया	याभ्याम्	याभिः	तृ.
यस्यै	याभ्याम्	याभ्यः	च.
यस्याः	याभ्याम्	याभ्यः	पं.
यस्याः	ययोः	यासाम्	ष.
यस्याम्	ययोः	यासु	स.

तद् – सर्वनाम – **पु.** (तो)

ए.व.	**द्वि.व.**	**ब.व.**	**वि.**
सः	तौ	ते	प्र.
तम्	तौ	तान्	द्वि.
तेन	ताभ्याम्	तैः	तृ.
तस्मै	ताभ्याम्	तेभ्यः	च.
तस्मात्	ताभ्याम्	तेभ्यः	पं.
तस्य	तयोः	तेषाम्	ष.
तस्मिन्	तयोः	तेषु	स.

तद् – सर्वनाम – **नपुं.** (ते)

ए.व.	**द्वि.व.**	**ब.व.**	**वि.**
तत् –तद्	ते	तानि	प्र.
तत्–तद्	ते	तानि	द्वि.
तेन	ताभ्याम्	तैः	तृ.
तस्मै	ताभ्याम्	तेभ्यः	च.
तस्मात्	ताभ्याम्	तेभ्यः	पं.
तस्य	तयोः	तेषाम्	ष.
तस्मिन्	तयोः	तेषु	स.

तद् – सर्वनाम – **स्त्री.** (ती)

ए.व.	**द्वि.व.**	**ब.व.**	**वि.**
सा	ते	ताः	प्र.
ताम्	ते	ताः	द्वि.
तया	ताभ्याम्	ताभिः	तृ.
तस्यै	ताभ्याम्	ताभ्यः	च.
तस्याः	ताभ्याम्	ताभ्यः	पं.
तस्याः	तयोः	तासाम्	ष.
तस्याम्	तयोः	तासु	स.

एतद् – सर्वनाम – **पु.** (हा)

ए.व.	**द्वि.व.**	**ब.व.**	**वि.**
एषः	एतौ	एते	प्र.
एतम्, एनम्	एतौ,एनौ	एतान्, एनान्	द्वि.
एतेन, एनेन	एताभ्याम्	एतैः	तृ.
एतस्मै	एताभ्याम्	एतेभ्यः	च.
एतस्मात्	एताभ्याम्	एतेभ्यः	पं.
एतस्य	एतयोः, एनयोः	एतेषाम्	ष.
एतस्मिन्	एतयोः, एनयोः	एतेषु	स.

एतद् – सर्वनाम – **नपुं.** (हे)

ए.व.	**द्वि.व.**	**ब.व.**	**वि.**
एतत्	एते	एतानि	प्र.
एतत्–एनद्	एते, एने	एतानि, एनानि	द्वि.
एतेन, एनेन	एताभ्याम्	एतैः	तृ.
एतस्मै	एताभ्याम्	एतेभ्यः	च.
एतस्मात्	एताभ्याम्	एतेभ्यः	पं.
एतस्य	एतयोः, एनयोः	एतेषाम्	ष.
एतस्मिन्	एतयोः, एनयोः	एतेषु	स.

एतद् – सर्वनाम – **स्त्री.** (ही)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
एषा	एते	एताः	प्र.
एताम्, एनाम्	एते, एने	एताः, एनाः	द्वि.
एतया, एनया	एताभ्याम्	एताभिः	तृ.
एतस्यै	एताभ्याम्	एताभ्यः	च.
एतस्याः	एताभ्याम्	एताभ्यः	पं.
एतस्याः	एतयोः, एनयोः	एतासाम्	ष.
एतस्याम्	एतयोः, एनयोः	एतासु	स.

सर्व – सर्वनाम – **पु.** (सर्व, सगळे)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
सर्वः	सर्वौ	सर्वे	प्र.
सर्वम्	सर्वौ	सर्वान्	द्वि.
सर्वेण	सर्वाभ्याम्	सर्वैः	तृ.
सर्वस्मै	सर्वाभ्याम्	सर्वेभ्यः	च.
सर्वस्मात्	सर्वाभ्याम्	सर्वेभ्यः	पं.
सर्वस्य	सर्वयोः	सर्वेषाम्	ष.
सर्वस्मिन्	सर्वयोः	सर्वेषु	स.

सर्व – सर्वनाम – नपुं. (सर्व, सगळे)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
सर्वम्	सर्वे	सर्वाणि	प्र.
सर्वम्	सर्वे	सर्वाणि	द्वि.
सर्वेण	सर्वाभ्याम्	सर्वैः	तृ.
सर्वस्मै	सर्वाभ्याम्	सर्वेभ्यः	च.
सर्वस्मात्	सर्वाभ्याम्	सर्वेभ्यः	पं.
सर्वस्य	सर्वयोः	सर्वेषाम्	ष.
सर्वस्मिन्	सर्वयोः	सर्वेषु	स.

सर्व – सर्वनाम – स्त्री. (सर्व, सगळे)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
सर्वा	सर्वे	सर्वाः	प्र.
सर्वाम्	सर्वे	सर्वाः	द्वि.
सर्वया	सर्वाभ्याम्	सर्वाभिः	तृ.
सर्वस्यै	सर्वाभ्याम्	सर्वाभ्यः	च.
सर्वस्याः	सर्वाभ्याम्	सर्वाभ्यः	पं.
सर्वस्याः	सर्वयोः	सर्वासाम्	ष.
सर्वस्याम्	सर्वयोः	सर्वासु	स.

इदम् – सर्वनाम – पु. (हा)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
अयम्	इमौ	इमे	प्र.
इमम्, एनम्	इमौ,एनौ	इमान्, एनान्	द्वि.
अनेन, एनेन	आभ्याम्	एभिः	तृ.
अस्मै	आभ्याम्	एभ्यः	च.
अस्मात्	आभ्याम्	एभ्यः	पं.
अस्य	अनयोः, एनयोः	एषाम्	ष.
अस्मिन्	अनयोः, एनयोः	एषु	स.

इदम् – सर्वनाम – **नपुं.** (हे)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
इदम्	इमे	इमानि	प्र.
इदम्, एनत्	इमे,एने	इमानि, एनानि	द्वि.
अनेन, एनेन	आभ्याम्	एभि:	तृ.
अस्मै	आभ्याम्	एभ्य:	च.
अस्मात्	आभ्याम्	एभ्य:	पं.
अस्य	अनयो:, एनयो:	एषाम्	ष.
अस्मिन्	अनयो:, एनयो:	एषु	स.

इदम् – सर्वनाम – **स्त्री.** (ही)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
इयम्	इमे	इमा:	प्र.
इमाम्, एनाम्	इमे,एने	इमा:, एना:	द्वि.
अनया, एनया	आभ्याम्	आभि:	तृ.
अस्यै	आभ्याम्	आभ्य:	च.
अस्या:	आभ्याम्	आभ्य:	पं.
अस्या:	अनयो:, एनयो:	आसाम्	ष.
अस्याम्	अनयो:, एनयो:	आसु	स.

अन्यत् (दुसरा) हे विशेषण असून त्याची
रुपे मात्र सर्वनामाप्रमाणे होतात.

अन्य – (पुल्लिंगी रुपे)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
अन्य:	अन्यौ	अन्ये	प्र.
अन्यम्	अन्यौ	अन्यान्	द्वि.
अन्येन	अन्याभ्याम्	अन्यै:	तृ.
अन्यस्मै	अन्याभ्याम्	अन्येभ्य:	च.
अन्यस्मात्	अन्याभ्याम्	अन्येभ्य:	पं.
अन्यस्य	अन्ययो:	अन्येषाम्	ष.
अन्यस्मिन्	अन्ययो:	अन्येषु	स.
अन्य	अन्यौ	अन्ये	सं.

अन्य – (नपुंसकलिंगी रुपे)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
अन्यत्	अन्ये	अन्यानि	प्र.
अन्यत्	अन्ये	अन्यानि	द्वि.
अन्येन	अन्याभ्याम्	अन्यैः	तृ.
अन्यस्मै	अन्याभ्याम्	अन्येभ्यः	च.
अन्यस्मात्	अन्याभ्याम्	अन्येभ्यः	पं.
अन्यस्य	अन्ययोः	अन्येषाम्	ष.
अन्यस्मिन्	अन्ययोः	अन्येषु	स.
अन्यत्	अन्ये	अन्यानि	सं.

अन्य – (स्त्रीलिंगी रुपे)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
अन्या	अन्ये	अन्याः	प्र.
अन्याम्	अन्ये	अन्याः	द्वि.
अन्यया	अन्याभ्याम्	अन्याभिः	तृ.
अन्यस्यै	अन्याभ्याम्	अन्याभ्यः	च.
अन्यस्याः	अन्याभ्याम्	अन्याभ्यः	पं.
अन्यस्याः	अन्ययोः	अन्यासाम्	ष.
अन्यस्याम्	अन्ययोः	अन्यासु	स.
अन्ये	अन्ये	अन्याः	सं.

भवत् – सर्वनाम – **पु.** (आपण)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
भवान्	भवन्तौ	भवन्तः	प्र.
भवन्तम्	भवन्तौ	भवतः	द्वि.
भवता	भवद्भ्याम्	भवद्भिः	तृ.
भवते	भवद्भ्याम्	भवद्भ्यः	च.
भवतः	भवद्भ्याम्	भवद्भ्यः	पं.
भवतः	भवतोः	भवताम्	ष.
भवति	भवतोः	भवत्सु	स.

भवत् – सर्वनाम – **नपुं.** (आपण)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
भवत्	भवती	भवन्ति	प्र.
भवत्	भवती	भवन्ति	द्वि.
भवता	भवद्भ्याम्	भवद्भि:	तृ.
भवते	भवद्भ्याम्	भवद्भ्य:	च.
भवत:	भवद्भ्याम्	भवद्भ्य:	पं.
भवत:	भवतो:	भवताम्	ष.
भवति	भवतो:	भवत्सु	स.

भवत् – सर्वनाम – **स्त्री.** (आपण)

एकवचन	**द्विवचन**	**बहुवचन**	**वि.**
भवती	भवत्यौ	भवत्य:	प्र.
भवतीम्	भवत्यौ	भवती:	द्वि.
भवत्या	भवतीभ्याम्	भवतीभि:	तृ.
भवत्यै	भवतीभ्याम्	भवतीभ्य:	च.
भवत्या:	भवतीभ्याम्	भवतीभ्य:	पं.
भवत्या:	भवत्यो:	भवतीनाम्	ष.
भवत्याम्	भवत्यो:	भवतीषु	स.

स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न – २

(१) चतुर्थीचे कारकार्थ लिहा.
(२) पाच स्वरांत शब्द लिहा.
(३) परीक्षा या शब्दाचा विग्रह लिहा
(४) उत्तम पुरुषी सर्वनाम कोणते ते लिहा.
(५) सर्वनाम कशाला म्हणतात?

१.२.३ विशेषण

संस्कृतमध्ये केवळ विशेषणांचा वापर केला जात नाही, त्यांच्या जोडीला नाम किंवा सर्वनाम असावे लागते. या नाम किंवा सर्वनामांच्या म्हणजेच विशेषच्या लिंग, वचन व विभक्तीनुसार विशेषणाचे लिंग, वचन, विभक्ती बदलत असते.

यल्लिङ्गं, यद्वचनं, या च विभक्तिर्विशेष्यस्य ।
तल्लिङ्गं तद्वचनं सा च विभक्तीर्विशेषणस्यापि ।।

अर्थ : विशेष्याचे जे लिंग, जे वचन आणि जी विभक्ती असते, तेच लिंग, तेच वचन आणि तीच विभक्ती विशेषणाचीसुद्धा होते.

उदा. विशालं भवनम् ।
विशालः वृक्षः ।
विशाला नदी।

अशाप्रकारे विशाल या विशेषणाचे लिंग हे पुल्लिंग, नपुंसकलिंग व स्त्रीलिंग शब्दाप्रमाणे बदललेले दिसून येते. या विशेषणाचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात.



सामान्य विशेषणे ही तीन प्रकारची आहेत, तर धातूंपासून बनलेली धातुसाधित विशेषणे ही पाच प्रकारची आहेत.

यावर्षी आपण यापैकी फक्त सामान्य विशेषणांचाच अभ्यास करणार आहोत. या विशेषणांचा सातत्याने वाक्यात उपयोग होत असतो. त्यासाठी क्रमशः त्यांच्या उपयोग वाक्यात कसा होतो ते पाहुया.

(क) गुणविशेषण : एखादी व्यक्ती किंवा वस्तू किंवा पदार्थ यांची वैशिष्ट्ये सांगणाऱ्या शब्दांना गुणविशेषण असे म्हणतात.

उदा. (१) मधुरा शर्करा। (गोड साखर)
(२) स्थूलः बालकः । (लठ्ठ मुलगा)
(३) नूतनं वाहनम् । (नवीन वाहन)
(४) उन्नतः वृक्षः । (उंच वृक्ष)
(५) शूरः अर्जुनः । (शूर अर्जुन)
(६) चतुरा बालिका। (चतुर मुलगी)

या सर्व वाक्यांमध्ये विशेषणांचे लिंग, वचन व विभक्ती विशेष्ट्याप्रमाणे बदललेली दिसते. नमुनादाखल काही विशेषणे पुढीलप्रमाणे,

विशेषण		अर्थ	विशेषण		अर्थ
यावत्	-	जेवढे, जोपर्यंत	अधीन	-	आश्रित
अग्र	-	पुढे	अनुकूल	-	अनुरुप
अतिरमणीय	-	खूप सुंदर	अनृत	-	खोटे
अत्यन्त	-	खूप	अन्त	-	शेवट
अद्यतन	-	आजचा	अन्ध	-	आंधळा
अधन	-	गरीब	अपर्याप्त	-	असंख्य
अधिक	-	पुष्कळ	अम्ल	-	आंबट

विशेषण		अर्थ	विशेषण		अर्थ
अर्चक	–	पुजारी	उन्मत्त	–	पागल, वेडा
अल्प	–	थोडा	उपस्थित	–	हजर
असाध्य	–	असाध्य	उष्ण	–	गरम
आकुल	–	व्याकुळ, बेचैन	एक	–	एक
आगन्तुक:	–	अतिथी	एकाकिन्	–	एकटा
आढ्य	–	श्रीमंत	एकीकृत	–	एकत्रित
आदरणीय	–	आदरणीय	एतादृश	–	असा
आदि	–	पहिला, पूर्वीचा	एतावत्	–	एवढे
आर्य	–	आदरणीय	कटु	–	कडू (तिखट)
आश्चर्य	–	आश्चर्यकारक	कठिण	–	कठीण
उग्र	–	प्रचंड	कठोर	–	कठोर
उचित	–	ठीक	कषाय	–	तुरट
उत्कण्ठा	–	उत्सुकता	किञ्चित्	–	थोडे
उत्कीर्ण	–	पसरलेला, खोदलेला	कीदृश:	–	कसा
उदण्ड	–	असभ्य	कुशल	–	निपुण, चतुर
गभीर	–	खोल, गंभीर	कुशलिन्	–	स्वस्थ
चतुर	–	चलाख	कृत्रिम	–	बनवलेला
तरुण	–	तरुण (युवक)	कृपण	–	कंजूष
तिक्त	–	तिखट	कृश	–	पतला (बारीक), दुबळा
दरिद्र	–	गरीब	कृष्ण	–	काळा
दर्शनीय	–	पाहण्यायोग्य (चांगला)	कोमल	–	नरम, मऊ
ज्येष्ठ	–	सर्वांत मोठा	मधुर	–	गोड
दुर्लभ	–	दुर्मीळ	मुख्य	–	प्रमुख / मुख्य
निश्चल	–	स्थिर	यावत्	–	जेवढे
नील	–	निळा	लघु	–	लहान / छोटा
नूतन	–	नवा	वन्दनीय	–	वन्दन करण्यायोग्य
पण्डित	–	बुद्धिमान	वयस्य	–	मित्र
पवित्र	–	शुद्ध	व्याकुल	–	व्याकुळ
पाटल	–	गुलाबी	शेष	–	शिल्लक
प्रवीण	–	चतुर, निपुण	श्रान्त	–	थकलेला
प्रसिद्ध	–	प्रख्यात	सकल	–	सर्व
प्राचीन	–	जुना	सज्ज	–	तयार / तत्पर/ सिद्ध
प्रिय	–	आवडता	सत्य	–	खरे
बधिर	–	बहिरा	सफल	–	उत्तीर्ण
बहु	–	अनेक	समर्थ	–	शक्तिशाली
बृहत्	–	मोठा	समान	–	बरोबरीचा
भक्त	–	भक्त	समीचीन	–	छान, उचित
			सम्बन्धित	–	संबंध
			सर्व	–	सर्व, प्रत्येक
			स्थूल	–	मोठा / जाड / लठ्ठ
			हरित	–	हिरवा
			ऱ्हस्व	–	लहान/अल्प /आखूड

(ख) तरतमभाववाचक विशेषण : तरतमभाववाचक विशेषणाचे दोन प्रकार पडतात.

(१) **तरभाववाचक विशेषण :** एकाच गुणाने युक्त असलेल्या दोन वस्तू, व्यक्ती किंवा पदार्थांमध्ये तुलना करावयाची असल्यास विशेषणाला तर प्रत्यय जोडला जातो. तरभाववाचक प्रत्यय जोडताना ज्याच्यापेक्षा अधिक दाखवायचे त्या शब्दाची पंचमी विभक्ती करावी. उदा. तृणात् तुलः लघुतरः ।

जेव्हा एकापेक्षा एकास श्रेष्ठत्व असते तेव्हा विशेषणास तर प्रत्यय जोडला जातो.

(२) **तमभाववाचक विशेषण :** जेव्हा अनेकांमध्ये एकास श्रेष्ठत्व दाखवावयाचे असते तेव्हा विशेषणास 'तम' प्रत्यय जोडला जातो.

जेव्हा विशेषणास 'तम' भाववाचक प्रत्यय जोडला जातो, तेव्हा ज्यांच्यामध्ये श्रेष्ठत्व दाखवावयाचे असते, त्याची षष्ठी किंवा सप्तमी विभक्ती वापरावी लागते. उदा. (१) पर्वतानाम् / पर्वतेषु हिमालयः उच्चतमः। (२) नदीनाम् / नदीषु गङ्गा दीर्घतमा।

तर आणि तम भाववाचक विशेषणे अकारान्त असल्यामुळे ते पुल्लिंगात 'देव', नपुंसकलिंगात 'वन', व स्त्रीलिंगात 'माला' प्रमाणे चालतात.

(३) **संख्या विशेषण :** जेव्हा विशेषणावरून एखाद्या विशेष्याची संख्या कळून येते तेव्हा त्यास संख्या विशेषण असे म्हणतात. संख्या विशेषणाचे प्रामुख्याने पुढीलप्रमाणे तीन प्रकार पडतात.

संख्या विशेषणे

संख्यावाचक　　क्रमवाचक　　आवृत्तिवाचक

(क) **संख्यावाचक :** जेव्हा संख्यावाचक विशेषणाने केवळ संख्या निर्दिष्ट केलेली असते तेव्हा त्यास सामान्यतः संख्यावाचक विशेषण असे म्हणतात.

(१) १ ते १९ पर्यंतचे संख्यावाचक शब्द कायम विशेषणे म्हणून वापरली जातात. १ हे संख्याविशेषण नित्य एकवचनी असून तीनही लिंगात चालते. एक हा शब्द नेहमी 'सर्व' सर्वनामाप्रमाणे चालतो.

(२) २ ही संख्या नित्य द्विवचनात, परंतु तीनही लिंगात चालते.

(३) ३ व ४ ही संख्या नेहमी बहुवचनात, परंतु तीनही लिंगात चालते.

(४) पुढील ५ पासून १० पर्यंतची सर्व संख्यावाचक विशेषणे नित्य बहुवचनात परंतु तीनही लिंगात समान चालतात.

काही संख्यावाचक विशेषणांची रुपे पुढे चालवून दाखविलेली आहेत. विद्यार्थ्यांनी ती कंठस्थ करून त्यांचा वाक्यात उपयोग करण्याचा प्रयत्न करावा.

काही संख्यावाचक विशेषणे पुढीलप्रमाणे चालतात,

(१) एक-एक (नित्य एकवचनी)

पुल्लिंगी	**नपुं.**	**स्त्री.**	**वि.**
ए.व.	**ए.व.**	**ए.व.**	प्र.
एकः	एकम्	एका	द्वि.
एकम्	एकम्	एकाम्	तृ.
एकेन	एकेन	एकया	च.
एकस्मै	एकस्मै	एकस्यै	पं.
एकस्मात्	एकस्मात्	एकस्याः	ष.
एकस्य	एकस्य	एकस्याः	स.
एकस्मिन्	एकस्मिन्	एकस्याम्	सं.
एक	एक	एके	

(२) द्वि – दोन (नित्य द्विवचनी)

पुलिंगी	**नपुं.**	**स्त्री.**	
द्वि.व.	**द्वि.व.**	**द्वि.व.**	**वि.**
द्वौ	द्वे	द्वे	प्र.
द्वौ	द्वे	द्वे	द्वि.
द्वाभ्याम्	द्वाभ्याम्	द्वाभ्याम्	तृ.
द्वाभ्याम्	द्वाभ्याम्	द्वाभ्याम्	च.
द्वाभ्याम्	द्वाभ्याम्	द्वाभ्याम्	पं.
द्वयो:	द्वयो:	द्वयो:	ष.
द्वयो:	द्वयो:	द्वयो:	स.
द्वौ	द्वे	द्वे	सं.

(३) त्रि–तीन (नित्य बहुवचनी)

पुल्लिंगी	**नपुं.**	**स्त्री.**	
बहु व.	**बहु व.**	**बहु व.**	**वि.**
त्रय:	त्रीणि	तिस्त्र:	प्र.
त्रीन्	त्रीणि	तिस्त्र:	द्वि.
त्रिभि:	त्रिभि:	तिसृभि:	तृ.
त्रिभ्य:	त्रिभ्य:	तिसृभ्य:	च.
त्रिभ्य:	त्रिभ्य:	तिसृभ्य:	पं.
त्रयाणाम्	त्रयाणाम्	तिसृणाम्	ष.
त्रिषु	त्रिषु	तिसृषु	स.
त्रय:	त्रय:	तिस्त्र:	सं.

(४) चतुर् – चार (नित्य बहुवचनी)

पुल्लिंगी	**नपुं.**	**स्त्री.**	**वि.**
बहु व.	**बहु व.**	**बहु व.**	
चत्वार:	चत्वारि	चतस्त्र:	प्र.
चतुर:	चत्वारि	चतस्त्र:	द्वि.
चतुर्भि:	चतुर्भि:	चतसृभि:	तृ.
चतुर्भ्य:	चतुर्भ्य:	चतसृभ्य:	च.
चतुर्भ्य:	चतुर्भ्य:	चतसृभ्य:	पं.
चतुर्णाम्	चतुर्णाम्	चतसृणाम्	ष.
चतुर्षु	चतुर्षु	चतसृषु	स.
चत्वार:	चत्वारि	चतस्त्र:	सं.

(५) पञ्चन् ब.व.	(६) षष् ब.व.	(७) सप्तन् ब.व.	वि.
पञ्च	षट् -ड्	सप्त	प्र.
पञ्च	षट् -ड्	सप्त	द्वि.
पञ्चभि:	षड्भि:	सप्तभि:	तृ.
पञ्चभ्य:	षड्भ्य:	सप्तभ्य:	च.
पञ्चभ्य:	षड्भ्य:	सप्तभ्य:	पं.
पञ्चानाम्	षण्णाम्	सप्तानाम्	ष.
पञ्चसु	षटसु	सप्तसु	स.
पञ्च	षट् - ड्	सप्त	सं.

(८) अष्टन् ब.व.	(९) नवन् ब.व.	(१०) दशन् ब.व.	वि.
अष्ट-अष्टौ	नव	दश	प्र.
अष्ट-अष्टौ	नव	दश	द्वि.
अष्टभि:-अष्टाभि:	नवभि:	दशभि:	तृ.
अष्टभ्य:-अष्टाभ्य:	नवभ्य:	दशभ्य:	च.
अष्टभ्य:-अष्टाभ्य:	नवभ्य:	दशभ्य:	पं.
अष्टानाम्	नवानाम्	दशानाम्	ष.
अष्टसु - अष्टासु	नवसु	दशसु	स.
अष्ट - अष्टौ	नव	दश	सं.

(२) **क्रमवाचक :** जेव्हा एखाद्या संख्येवरून वस्तूचा, पदार्थाचा किंवा व्यक्तीचा क्रम कळतो तेव्हा त्यास क्रमवाचक संख्याविशेषण असे म्हणतात.

१ ते १० पर्यंतची क्रमवाचक विशेषणे पुढीलप्रमाणे बनतात.

१	-	प्रथम
२	-	द्वितीय
३	-	तृतीय
४	-	चतुर्थ
५	-	पंचम
६	-	षष्ठ
७	-	सप्तम
८	-	अष्टम
९	-	नवम
१०	-	दशम

ही क्रमवाचके पुल्लिंगात 'देव' शब्दाप्रमाणे चालतात, तर नपुंसकलिंगात 'वन' शब्दाप्रमाणे चालतात. स्त्रीलिंगात मात्र १ ते ३ पर्यंत मालाप्रमाणे व ४ पासून पुढील क्रमवाचके दीर्घ ईकारान्त 'नदी' शब्दाप्रमाणे चालतात.

उदा. प्रथम: पाठ: ।

बालकस्य द्वितीय: क्रमाङ्क: अस्ति।

(३) **आवृत्तिवाचक संख्याविशेषण :** जेव्हा एखाद्या संख्यावाचक विशेषणावरून एखादी क्रिया किती वेळा घडली याचा बोध होतो तेव्हा त्यास आवृत्तिवाचक संख्याविशेषण म्हणतात. ही आवृत्तिवाचके संस्कृतमध्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१	-	एकवारम् / सकृत
२	-	द्विवारम् / द्विः
३	-	त्रिवारम् / त्रिः
४	-	चतुर्वारम् /चतुः
५	-	पंचवारम् / पञ्चकृत्वः
६	-	षड्वारम् /षड्कृत्वः
७	-	सप्तवारम् / सप्तकृत्वः
८	-	अष्टवारम् / अष्टकृत्वः
९	-	नववारम् / नवकृत्वः
१०	-	दशवारम्/दशकृत्वः

ही संख्याविशेषणे वाक्यामध्ये वापरली असता कालवाचक शब्दाची षष्ठी विभक्ती करावी लागते. उदा. दिनस्य द्विवारं भोजनं करोमि।

स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ३

(१) विशेषण म्हणजे काय?

(२) विशेषणाचे प्रकार किती व कोणते?

(३) एक हे संख्याविशेषण कसे चालते?

(४) आवृत्तिवाचक संख्याविशेषणास कोणत्या विभक्तीची अपेक्षा असते?

(५) क्रमवाचकांची व्याख्या लिहा.

१.२.४ अव्यय

संस्कृत भाषेचा वापर करताना वाक्यामध्ये इतर घटकांप्रमाणेच महत्त्वाचा घटक म्हणजेच अव्यय होय. काहीवेळा अव्ययांचा वापर केल्याशिवाय वाक्यरचना पूर्ण होऊच शकत नाही. म्हणूनच अव्ययांना संस्कृत भाषेमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्या अव्ययांचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

शब्दांच्या जातींपैकी अविकारक शब्द म्हणजेच अव्यय होय. संस्कृतमध्ये अव्ययाची व्याख्या एका श्लोकातून केलेली आहे.

सदृशं त्रिषु लिङ्गेषु सर्वासु च विभक्तीषु ।
वचनेषु च सर्वेषु यन्न व्येति तद् अव्ययम् ।।

याचा अर्थ असा की जे तिन्ही लिंगात सर्व विभक्तींमध्ये आणि सर्व वचनांमध्ये बदलत नाही त्यास अव्यय असे म्हणतात. याचाच अर्थ असा की अव्ययात लिंग, वचन, विभक्तीमुळे बदल संभवत नाही. त्यामुळे अव्यय हे सर्व लिंगी, सर्व वचनात व सर्व विभक्तीत समान असते. अव्यय हे लिंग, वचन विभक्तीविरहित शब्द असतात. त्यांचे रूप अचल, अपरिवर्तनीय म्हणजेच अविकारी असते.

विभक्तीर्वचनं लिङ्गं कालार्थौ पुरुषस्तथा ।
एतादृशां विकाराणामभावात् सार्थमव्ययम् ।।

यावरुन विभक्ती, वचन, लिंग, काळ, अर्थ व पुरुष यासारख्या उपाधींच्या परिणामापासून पूर्णतः मुक्त असल्यामुळे अव्यय हा शब्द सार्थ ठरतो.

अव्ययाचे दोन प्रकार पडतात.

अव्यये

- **सामान्य अव्यये**
  - उभयान्वयी
  - केवलप्रयोगी
  - क्रियाविशेषण
- **धातुसाधित अव्यये**
  - त्वान्त
  - ल्यबन्त
  - तुमन्त

वरील अव्ययांपैकी आपण यावर्षी फक्त सामान्य अव्ययांचाच अभ्यास करणार आहोत. काही सामान्य अव्यये व त्यांचे मराठीत अर्थ पुढीलप्रमाणे आहेत.

सामान्य अव्यये

अव्यय	–	अर्थ	अव्यय	–	अर्थ
अग्रे	–	पुढे	एकदा	–	एकवेळ
अचिरात्	–	लगेच	एकवारम्	–	एकवेळ
अत:	–	म्हणून	एकैकश:	–	एक एक करून
अतीव	–	अतिशय	एव	–	च
अत्र	–	येथे	एवम्	–	असे, अशा प्रकारे
अथ	–	यानंतर, यापुढे	ओम्	–	हाँ, जी
अथवा	–	किंवा	कथम्	–	कसे, कशाप्रकारे
अद्य	–	आज	कदा	–	केव्हा
अद्यप्रभृती	–	आजपासून	कदाचित्	–	केव्हातरी
अद्यापि	–	आजसुद्धा	कदापि	–	केव्हाही
अद्यारभ्य	–	आजपासून	दूरात्	–	दुरून
अध:	–	खाली	दूरे	–	दूर
अधस्तात्	–	खाली	न	–	नाही
अधुना	–	आता	ननु	–	खरोखर
अनंतरम्	–	यानंतर	नम:	–	नमस्कार:
अग्रत:	–	समोर, पुढे	नूनम्	–	खरेच
अभित:	–	चारही बाजूस	नैव	–	नाहीच
अलम्	–	पुरे	नो चेत्	–	नाहीतर
अर्थम्	–	साठी	परस्परम्	–	आपापसात
अन्त:	–	आत	परित:	–	चहुबाजूने
अनुसृज्य	–	न सोडता	पुन:	–	परत, पुन्हा
अन्यत्र	–	दुसरीकडे, कुठेतरी	पुरत:	–	पुढे
अन्यथा	–	नाही तर	पृष्टत:	–	मागे
अपि	–	सुद्धा	प्राक्	–	पूर्वी, अगोदर
अवश्यम्	–	अवश्य	प्रात:	–	पहाटे
आम्	–	होय	प्रायश:	–	बहुतेक
आहत्य	–	एकूण	बहि:	–	बाहेर
इत:	–	येथून	बहुश:	–	बहुतेक
इतस्तत:	–	इकडे तिकडे	भो:	–	हे!, अरे!, अहो!
इति	–	असे	मा	–	नको
इत्थम्	–	असे	यत्	–	की

इदानीम्	– आता	यत:	– कारण
इव	– प्रमाणे	यत्र	– जेथे
उच्चै:	– मोठ्याने (उंच आवाजात)	यथा	– जसे
उपरि	– वर	यदा	– जेव्हा
उपरिष्टात्	– वर	यदि	– जर
एकत्र	– एका ठिकाणी		

अव्यय	**– अर्थ**	**अव्यय**	**– अर्थ**
यद्यपि	– जरी	सर्वत्र	– सर्व ठिकाणी
वस्तुत:	– वास्तविकत:	सर्वथा	– सर्व तऱ्हेने
विना	– शिवाय	सह	– बरोबर
शनै:	– हळू	सहसा	– अचानक / एकाएकी
शीघ्रम्	– ताबडतोब	साकम्	– बरोबर
सकृत	– एकवेळ	सायम्	– संध्याकाळ
सत्वरम्	– ताबडतोब	स्म	– होता
सदा	– नेहमी	हा!	– होय
सम्प्रति	– ह्या वेळेस	हि	– च
सर्वत:	– चहुबाजूस		

महत्त्वाची अव्यये

अत्र	– येथे	इत्थम्	– याप्रमाणे
तत्र	– तेथे	कथम्	– कसे, कशाप्रमाणे
यत्र	– जेथे	तथा	– तसे, त्याप्रमाणे
कुत्र	– कोठे	यथा	– जसे, ज्याप्रमाणे
इदानिम्	– आता	अभित:	– चहुबाजूस
यदा	– जेव्हा	उभयत:	– दोन्ही बाजूस
तदा	– तेव्हा	परित:	– चारही बाजूस
कदा	– केव्हा	सर्वत:	– सर्व बाजूस
इत:	– येथून	प्रति	– बाजूला - कडे
तत:	– तेथून	अलम्	– पुरे
यत:	– जेथून	किम्	– कोण? / काय?
कुत:	– कोठून	अर्थम्	– साठी
शोभनम्	– छान / चांगला	यावत्	– जेवढे, जोपर्यंत
समीचीनम्	– छान / चांगले	तावत्	– तेवढे, तोपर्यंत
अत:	– म्हणून	इयत्	– एवढे
अन्यत्र	– दुसऱ्या ठिकाणी	कति	– किती
अवश्यम्	– अवश्य	अन्त:	– आत
चेत्	– जर	सायम्	– सायंकाळ
नोचेत्	– नाहीतर	नक्तम्	– रात्र
पटुतम्	– चतुर	सकृत	– एकवेळा
दूरम्	– दूर	पुन:	– पुन्हा
समीपम्	– जवळ	अन्यथा	– नाहीतर

पार्श्वम्	–	जवळ	सहसा	–	एकदम
निकटम्	–	जवळ	प्रणति:	–	प्रणाम
उपरि	–	वर	त्वदीय	–	तुझा
अध:	–	खाली	मदीय:	–	माझा
नीचै:	–	खाली	परह्य:	–	परवा (मागील)
पुर:	–	पुढे	ह्य:	–	काल
पश्चात्	–	मागे	अद्य	–	आज
अग्रे	–	समोर, पुढे	श्व:	–	उद्या
अग्रत:	–	समोर, पुढे	परश्व:	–	परवा (पुढील)

संस्कृतमध्ये सामान्य अव्ययांचा वापर वेळोवेळी केलेला आढळतो. वाक्यामध्ये अव्ययांचा वापर करताना त्या अव्ययांना विशिष्ट विभक्तीची अपेक्षा असते, ते खाली दिलेल्या तक्त्यांमधील उदाहरणांवरुन लक्षात येईल.

अव्यय	अर्थ	विभक्ती	उदा.
धिक्	धिक्कार	द्वितीया / संबो.	धिक् मूर्ख / धिक् तान् ।
अभित:	भोवताली	द्वितीया	तडागम् अभित: अरण्यम् अस्ति।
परित:	भोवताली	द्वितीया	आश्रमं परित: अरण्यम् अस्ति।
प्रति	च्याकडे	द्वितीया	नृप: राजधानीं प्रति आगच्छति ।
विना	शिवाय	द्वितीया	विद्यां विना जीवनं व्यर्थम्।
विना	शिवाय	तृतीया	अन्नेन विना कथं जीवाम: ।
विना	शिवाय	पंचमी	जलात् विना मीन: न जीवति ।
सह, साकं, सार्धं	बरोबर	तृतीया	शिक्षकेन सह / साकं / सार्धं छात्र: शालां गच्छति ।
अलम्	पुरेसा असणे	तृतीया	राम: राक्षसाय अलम् ।
किम्	काय उपयोग	तृतीया	अन्धस्य दीपेन किम् ?
नम:	नमस्कार	चतुर्थी	श्री गणेशाय नम: / सरस्वत्यै नम:
आरभ्य	पासून	पंचमी	शैशवात् आरभ्य स: क्रीडालु: अस्ति।
आ	पासून	पंचमी	आ बाल्यात् सा स्थूला ।
दूरम्	दूर	पंचमी	नदी ग्रामात् दूरम् अस्ति ।
अन्तिकं	जवळ	पंचमी	विद्यालय: ग्रामात् अन्तिकम् अस्ति ।
बहि:	बाहेर	पंचमी	मूषक: बिलात् बहि: न आगच्छति ।
समीपे	जवळ	षष्ठी	मंदिरं मम गृहस्य समीपे अस्ति ।
पुरत:	पुढे	षष्ठी	शिवमंदिरस्य पुरत: नन्दि: अस्ति ।
कृते	च्यासाठी	षष्ठी	माता भिक्षुकस्य कृते धनं ददाति ।
उपरि	वर	षष्ठी	वृक्षस्य उपरि फलानि सन्ति ।

स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न – ४

(१) अव्यय म्हणजे काय?

(२) अव्ययाचे दोन प्रकार कोणते?

(३) पाच सामान्य अव्यये अर्थासह लिहा.

(४) ‘नम:’ व ‘सह’ अव्ययाला कोणत्या विभक्तीची अपेक्षा असते?

(५) ‘कृते’ आणि ‘परित:’ या अव्ययांचा वापर करून संस्कृत वाक्य बनवा.

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

(१) **सवर्ण (सजातीय) :** सवर्ण म्हणजे कण्ठ्य, तालव्य, मूर्धा, दन्त्य, ओष्ठ्य या मुखातील उच्चार स्थानांपैकी एकाच स्थानातून उत्पन्न होणारे वर्ण (स्वर, व्यंजन) म्हणजेच, एकाच वर्गातील स्वर आणि व्यंजने या वर्णांना सवर्ण असे म्हणतात. तसेच एकाच वर्गातील स्वरांना सवर्ण स्वर किंवा सजातीय स्वर असे म्हणतात. उदा. अ-आ, इ-ई, उ-ऊ यांना सजातीय स्वर म्हणतात.

(२) **असवर्ण (विजातीय) :** भिन्न वर्गातील स्वरांना असवर्ण स्वर किंवा विजातीय स्वर असे म्हणतात. उदा. अ-ई, आ-उ यांना विजातीय स्वर असे म्हणतात.

(३) **पद :** विशिष्ट प्रातिपदिकास विभक्तीप्रत्यय किंवा धातू प्रत्यय जोडले असता त्यास पद संज्ञा प्राप्त होते. उदा. देव-देव:, कवि- कवि:, भानु-भानु:, इ.

(४) **अल्पप्राण :** ज्या व्यंजनांच्या उच्चारासाठी मुखातून अल्पप्रमाणात हवा बाहेर टाकावी लागते, त्या व्यंजनांना अल्पप्राण असे म्हणतात. उदा. प्रत्येक वर्गातील पहिले, तिसरे, पाचवे व्यंजन य, र, ल, व यांना अल्पप्राण असे म्हणतात.

(५) **महाप्राण :** ज्या व्यंजनांच्या उच्चार करताना मुखातून अधिक हवा बाहेर टाकावी लागते, त्यास महाप्राण असे म्हणतात. उदा. प्रत्येक वर्गातील दुसरे व चौथे, व्यंजन आणि श, ष, स, ह यांना महाप्राण असे म्हणतात.

१.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं-अध्ययन प्रश्न - १

(१) अ-आ, इ-ई, उ-ऊ यांना सजातीय स्वर म्हणतात.

(२) मुखातून बाहेर पडणाऱ्या मूळ ध्वनीस वर्ण म्हणतात.

(३) क्, च्, ट्, त्, प् आणि ख्, छ्, ठ्, थ्, फ्, हे कठोर वर्ण आहेत.

(४) अ+ इ = ए, आ + ए = ऐ, अ+ उ = ओ , आ+ ओ = औ यांना संयुक्त स्वर म्हणतात.

(५) य्, र्, ल्, व् यांना अंतस्थ वर्ण म्हणतात.

स्वयं-अध्ययन प्रश्न - २

(१) स, ला, ना, करिता, साठी हे चतुर्थीचे कारकार्थ आहेत.

(२) देव, कवि, मति, नदी, भानु, पितृ हे स्वरान्त शब्द आहेत.

(३) प् + अ + र् + ई + क् + ष् + आ = परीक्षा

(४) अस्मद् हे उत्तम पुरुषी सर्वनाम आहे.

(५) नामाबद्दल वापरल्या जाणाऱ्या शब्दास सर्वनाम असे म्हणतात.

स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ३

(१) नामाबद्दल विशेष माहिती सांगणाऱ्या शब्दाला विशेषण असे म्हणतात.

(२) विशेषणाचे तीन प्रकार पडतात. (१) संख्याविशेषण (२) आवृत्तिवाचक संख्याविशेषण व (३) क्रमवाचक संख्याविशेषण

(३) ‘एक’ हे संख्याविशेषण सर्वनामाप्रमाणे तिन्ही लिंगात परंतु एकवचनात चालतात.

(४) आवृत्तिवाचक संख्याविशेषण वाक्यात आले असता कालवाचक शब्दाची षष्ठी विभक्ती होते.

(५) जेव्हा एखाद्या संख्येवरून क्रियेचा क्रम कळतो तेव्हा त्यास क्रमवाचक संख्याविशेषण असे म्हणतात.

स्वयं–अध्ययन प्रश्न – ४

(१) जो शब्द तीनही लिंगात, वचनात व कोणत्याही विभक्तीप्रत्ययामुळे बदलत नाही, त्यास अव्यय असे म्हणतात.

(२) अव्ययाचे सामान्य अव्यय व धातुसाधित अव्यये असे दोन प्रकार पडतात.

(३) पाच अव्यये – अत्र, तत्र, तदा, नमः, उभयतः, इ.

(४) नम: अव्ययाला चतुर्थी विभक्तीची अपेक्षा असते, तर ‘सह’ अव्ययाला तृतीयेची अपेक्षा असते.

(५) माता पुत्रेण सह शालां गच्छति। अहं ईश्वरस्य कृते पुष्पं ददामि।

१.५ सारांश

अशा प्रकारे या प्रकरणात संस्कृत भाषेतील वाक्यांमध्ये असलेले जे मूळ घटक–नाम, सर्वनाम, विशेषण व अव्यये यांचा विचार केला, तसेच शब्दांचे मूळ घटक असलेल्या वर्णांचा परिचयसुद्धा या प्रकरणामध्ये झालेला आहे. वाक्य बनविताना त्यातील नाम, सर्वनामांच्या विभक्तीरूपांना विभक्तीनुसार कारकार्थ जोडून त्या वाक्यांचा मराठीत अर्थ कसा करावा याचाही विचार या प्रकरणात केलेला आहे.

१.६ सरावासाठी स्वाध्याय

(०१) वर्ण म्हणजे काय ते सांगून त्यापासून शब्द कसे बनतात ते लिहा.

(०२) शब्दांचे प्रकार सांगून त्यांचा स्वरांत ओळखा

(०३) कठोर वर्ण म्हणजे काय ते सांगून प्रत्येक वर्गातील कठोर वर्ण कोणते ते वर्गशः लिहा.

(०५) मृदू वर्ण म्हणजे काय ते सांगून प्रत्येक वर्गातील मृदू वर्ण कोणते ते लिहा.

(०६) प, फ, ब, भ, म यांना ओष्ठ्य वर्गातील वर्ण का म्हणतात?

(०७) अनुनासिक कशाला म्हणतात? प्रत्येक वर्गातील अनुनासिके लिहा.

(०८) पुल्लिंगी ‘देव’प्रमाणे पुल्लिंगी ‘गज’, नपुंसकलिंगी ‘वन’ प्रमाणे‘फल’ शब्द व स्त्रीलिंगी ‘माला’ शब्दाप्रमाणे ‘ शाला’ शब्द चालवा.

(०९) पुल्लिंगी ‘गज’, नपुं. ‘फल’ व स्त्रीलिंगी ‘शाला’ शब्द या शब्दांच्या सर्व रूपांना सर्व विभक्तींचे कारकार्थ जोडून मराठीत अर्थ लिहा.

(१०) किम् सर्वनामास कारकार्थ जोडून मराठीत अर्थ लिहा.

(११) सामान्य विशेषणांचा उपयोग करून किमान प्रत्येक विभक्तीतील दोन वाक्ये लिहा.

(१२) कोणत्या अव्ययांना द्वितीया, तृतीया व पंचमीची अपेक्षा असते ते उदाहरणासह स्पष्ट करा.

(१३) सामान्य अव्ययांचा उपयोग करून १० वाक्ये लिहा.

१.७ क्षेत्रीय कार्य

(१) आपल्या परिसरातील शाळेला भेट देऊन शालेय संस्कृत पुस्तकांच्या पाठांमध्ये असलेल्या नाम, सर्वनामांच्या रुपांचा परिचय लिहा.

(२) नित्य व्यवहारात वापरली जाणारी संस्कृतमधून १० वाक्ये लिहा.

१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) आंभोरे ग.वा., *संस्कृत सरिता*

(२) पेंडके प्रतिभा, *संस्कृत अध्यापन पद्धती*

(३) दातार सी.भा., *संस्कृतचे सोपे व्याकरण*

(४) जोशी प्र.शं., *सुगम संस्कृत व्याकरण*

घटक २ : धातू व क्रियापद परिचय

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्टे
२.१ प्रास्ताविक
२.२ विषय-विवेचन
  २.२.१ वर्तमानकाळ
  २.२.२ भूतकाळ
  २.२.३ भविष्यकाळ
  २.२.४ आज्ञार्थ, विध्यर्थ
२.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
२.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
२.५ सारांश
२.६ सरावासाठी स्वाध्याय
२.७ क्षेत्रीय कार्य
२.८ अधिक वाचनासाठी पुस्तक

२.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला,

- क्रियापदामध्ये धातूंचे गण व पद ओळखता येईल.
- वर्तमानकाळी परस्मैपदी व आत्मनेपदी क्रियापदे ओळखता येतील.
- भूतकाळी परस्मैपदी व आत्मनेपदी क्रियापदांचा परिचय देता येईल.
- भविष्यकाळी क्रियापदांचा परिचय देता येईल.
- आज्ञार्थी व विध्यर्थी क्रियापदे ओळखता येतील.

२.१ प्रास्ताविक

आपण जे संस्कृतमधून वाचतो, लिहितो किंवा बोलतो त्याचा लहानात लहान घटक म्हणजे वाक्य होय. असे हे वाक्य क्रियापदाने पूर्ण होते. तेव्हा क्रियापद हे वाक्यातील अतिशय महत्त्वाचा घटक आहे. त्या क्रियापदाचे काळानुरूप प्रकार कोणते व ती क्रियापदे कशी बनतात त्या क्रियापदांचे घटक कोणते आणि त्यांना सर्वनामे जोडून त्यांचा मराठीत अर्थ कसा बनतो याचा अभ्यास आपण या प्रकरणात समजावून घेणार आहोत.

२.२ विषय-विवेचन

२.२.१ वर्तमानकाळ

कोणतीही भाषा जेव्हा बोलली जाते, तेव्हा त्या भाषेच्या प्रत्येक वाक्यामध्ये क्रियापदाची नितांत गरज भासते. तेव्हा भाषेमधून वाक्यांचा उपयोग करताना विविध काळांचाही उपयोग केला जातो. अर्थात त्या-त्या काळांच्या क्रियापदांचा वापर करून वाक्य पूर्ण केले जाते. क्रिया घडत असते त्यावेळेला वर्तमानकाळ असे म्हणतात.

उदा. बालक: भोजनं करोति ।
छात्र: पुस्तकं पठति ।
अतिथि: गृहम् आगच्छति ।

या वाक्यांमध्ये करोति, पठति, आगच्छति ही वर्तमानकालवाचक क्रियापदे आलेली आहेत. या क्रियापदांशिवाय कोणत्याही वाक्याचा अर्थबोध होत नाही. म्हणजेच क्रियापदाशिवाय कोणतेही वाक्य पूर्ण होत नाही. तेव्हा शब्दांच्या अनेक जातींपैकी क्रियापद ही एक मुख्य जात आहे. या क्रियापदांचा विचार येथे आपण करणार आहोत. कोणतेही क्रियापद तयार करताना ते विशिष्ट घटकांनी मिळून बनते. त्या घटकांचा परिचय पुढीलप्रमाणे आहे.

क्रियापद

(१) वाक्याचा अर्थ पूर्ण करणाऱ्या क्रियावाचक शब्दास क्रियापद असे म्हणतात.
(२) धातूंना गण, विकरणे व काळ किंवा अर्थांचे प्रत्यय जोडून विशिष्ट नियमाने क्रियापदे बनविली जातात.
(३) धातूविकरण, प्रत्यय व आगम या सर्व घटकांनी मिळून क्रियापद तयार होते.
तेव्हा या सर्व घटकांचा थोडक्यात परिचय असा

धातू

(१) क्रियापदाच्या मूळ रूपास धातू असे म्हणतात.
(२) धातूंचे एकूण दोन गटात विभाजन होते.
गट क्र.१ मध्ये - प्रथम, चतुर्थ, षष्ठ व दशम् गणातील धातू येतात, तर
गट क्र.२ मध्ये - द्वितीय, तृतीय, पंचम, सप्तम, अष्टम व नवम गणाचे धातू येतात. तर
(३) प्रत्येक गणांमध्ये परस्मैपदी व आत्मनेपदी असे दोन प्रकारचे धातू यांचा समावेश होतो.

विकरण

(१) धातू कोणत्या गणाचा आहे, हे ओळखण्याची खूण म्हणजेच विकरण होय.
(२) एकूण दहा गणांची विकरणे पुढीलप्रमाणे आहेत.

गट क्र. १			गट क्र. २		
गण क्र.		**विकरण**	**गण क्र.**		**विकरण**
१	-	अ	२	-	--
४	-	य	३	-	द्वित्व
६	-	अ	५	-	नु
१०	-	अय	७	-	न
			८	-	उ
			९	-	ना

(१) प्रत्येक गणाचे जे विकरण असते ते त्या त्या गणाच्या दोन्ही पदांच्या धातूंसाठी समान असते.

(२) प्रथम व षष्ठ या दोन्ही गणांचे विकरण 'अ' असे समान असले तरी प्रथम गणाचे 'अ ' विकरण समोर आले असता धातूच्या अन्त्य स्वरास व उपांत्य ऱ्हस्व स्वरास गुण होतो. उदा. नी – नयति, शुभ् – शोभते परंतु षष्ट गणातील धातूंपुढे 'अ' विकरण आले असता गुण होत नाही. उदा. लिख् – लिखति, स्फुर् – स्फुरति

(३) प्रत्यय क्रियापदाचे रूप कोणत्या काळाचे आहे हे ओळखण्याची खूण म्हणजेच प्रत्यय होय.

(४) **प्रत्ययाचे प्रकार :** (१) परस्मैपदी प्रत्यय (२) आत्मनेपदी प्रत्यय

(५) परस्मैपदी प्रत्यय परस्मैपदी धातूंनाच जोडले जातात व आत्मनेपदी प्रत्यय आत्मनेपदी धातूंनाच जोडले जातात, परंतु उ. प. धातूंना मात्र दोन्ही प्रकारचे प्रत्यय जोडले जातात. प्रथम गटातील १, ४, ६, १० गणातील धातूंना गणविकरणे व प्रत्यय जोडून क्रियापदे बनविली जातात. ती क्रियापदे बनविताना पुढील नियमांचा उपयोग केला जातो.

नियम क्र.

(१) प्रत्ययाचा आदिवर्ण 'व' किंवा 'म' असल्यास त्यापूर्वीचा 'अ' स्वर दीर्घ होतो.

(२) प्रत्ययाचा आदिवर्ण 'अ' किंवा 'आ' असल्यास त्यापूर्वीच्या 'अ' स्वराचा लोप होतो.

(३) 'अ' किंवा 'आ' पुढे 'इ' किंवा 'ई' आल्यास त्या दोहोंबद्दल 'ए' असा गुण होतो.

या नियमांचा उपयोग करून धातूंच्या अंगास प्रत्यय जोडले असता पद तयार होते. म्हणजेच क्रियापद बनते. या सर्व क्रियापदांचा उपयोग वाक्यांमध्ये केला असता वाक्य पूर्ण होऊन अर्थबोध होतो. तेव्हा या क्रियापदांसाठी क्रियापदाचा मूळ घटक म्हणजेच धातू होय. दोन्ही गटांचे धातू पुढीलप्रमाणे आहेत.

प्रथम गण– परस्मैपदी धातू

अट्	अटति	भटकणे, हिंडणे
अर्च्	अर्चति	पूजा करणे
कृष्	कर्षति	खेचणे, नांगरणे
क्रीड्	क्रीडति	खेळणे
खाद्	खाद्ति	खाणे
खेल्	खेलति	खेळणे
गर्ज्	गर्जति	गर्जना करणे
गल्	गलति	गळणे
गै	गायति	गायन करणे
घ्रा	जिघ्रति	वास घेणे
जीव्	जीवति	जगणे
दंश्	दशति	चावणे
दह्	दहति	जाळणे
निन्द्	निन्दति	निंदा करणे
पठ्	पठति	वाचणे, शिकणे
पत्	पतति	पडणे
पा	पिबति	पिणे
नी	नयति	नेणे
बुध्	बोधति	जाणणे
रक्ष्	रक्षति	रक्षण करणे
वम्	वमति	ओकणे
वृ	वरति	निवडणे
वृष्	वर्षति	पाऊस पडणे
हिंस्	हिंसति	ठार मारणे
नम्	नमति	नमस्कार करणे
वस्	वसति	राहणे
हस्	हसति	हसणे
पच्	पचति	शिजविणे, शिजणे
वप्	वपति	पेरणे
वह्	वहति	वाहणे
चल्	चलति	चालणे
त्यज्	त्यजति	टाकणे
नन्द्	नन्दति	आनंदित होणे
गम्	गच्छति	जाणे
दा	यच्छति	देणे
स्था	तिष्टति	राहणे
दृश्	पश्यति	पाहणे
स्मृ	स्मरति	स्मरण करणे
भू	भवति	होणे, असणे
सृ	सरति	सरणे
हृ	हरति	हरण करणे
खन्	खनति	खणणे
धाव्	धावति	धावणे
वद्	वदति	बोलणे
अव्	अवति	रक्षण करणे
गद्	गदति	बोलणे
मिल्	मिलति	मिळणे
तृ	तरति	तरणे, पोहून जाणे
धृ	धरति	धरणे

प्रथम गण– आत्मनेपदी धातू

राज् - राजते - शोभणे
नी - नयते - नेणे
मिल् - मिलते - मिळणे
लभ् - लभते - मिळविणे
रम् - रमते - रमणे, रममाण होणे
सेव् - सेवते - सेवा करणे
कम्प् - कम्पते - कंप पावणे
शिक्ष् - शिक्षते - शिकणे
रभ् - रभते - सुरुवात करणे
ईक्ष् - ईक्षते - पाहणे
भाष् - भाषते - बोलणे
यत् - यतते - प्रयत्न करणे
याच् - याचते - मागणे, याचना करणे
वन्द् - वन्दते - नमस्कार करणे
क्षम् - क्षमते - क्षमा करणे
बाध् - बाधते - त्रास देणे
वृत् - वर्तते - असणे
मुद् - मोदते - आनंदित होणे
शुभ् - शोभते - शोभणे
डी - डयते - उडणे
रुच् - रोचते - आवडणे
द्युत् - द्योतते - प्रकाशणे
खण्ड् - खण्डते - तोडणे
सह् - सहते - सहन करणे
कम्प् - कम्पते - कंप पावणे, थरथरणे
त्वर् - त्वरते - घाई करणे
बुध् - बोधते - जाणणे
यज् - यजते - होम पूजा करणे
वेप् - वेपते - कापणे, थरथरणे
शप् - शपते - शपथ घेणे, शाप देणे
स्मि - स्मयते - स्मित करणे
स्वाद् - स्वादते - चव घेणे
काश् - काशते - प्रकाशणे
धृ - धरते - धरणे

चतुर्थ गण– परस्मैपदी धातू

कुप् - कुप्यति - रागावणे
क्रुध् - क्रुध्यति - रागावणे
क्षम् - क्षाम्यति - क्षमा करणे
द्रुह् - द्रुह्यति - द्वेष करणे
नश् - नश्यति - नाश पावणे
नृत् - नृत्यति - नाचणे
भ्रम् - भ्राम्यति - भटकणे, फिरणे
मुह् - मुह्यति - मोहित होणे
शम् - शाम्यति - शांत होणे
श्रम् - श्राम्यति - श्रमणे, दमणे, थकणे
स्निह् - स्निह्यति - प्रेम करणे
लुभ् - लुभ्यति - लोभ करणे
तुष् - तुष्यति - संतुष्ट होणे
दुष् - दुष्यति - दुषित होणे
क्लिद् - क्लिद्यति - ओले होणे, भिजणे

चतुर्थ गण – आत्मनेपदी धातू

प्री - प्रीयते - आनंदित करणे
युध् - युध्यते - युद्ध करणे
युज् - युज्यते - जोडणे, जुळणे
विद् - विद्यते - असणे
बुध् - बुध्यते - जाणणे
मन् - मन्यते - मानणे, समजणे
दीप् - दीप्यते - प्रकाशणे
खिद् - खिद्यते - खेद करणे
पूर् - पूर्यते - भरणे
जन् - जायते - जन्माला येणे
काश् - काश्यते - प्रकाशणे

षष्ट गण – परस्मैपदी धातू

कृष् - कृषति - नांगरणे
कृ - किरति - विखुरणे
कृत् - कृंतति - कापणे
क्षिप् - क्षिपति - टाकणे,फेकणे
दिश् - दिशति - दाखविणे
प्रच्छ् - पृच्छति - विचारणे
मिल् - मिलति - मिळणे
मुच् - मुञ्चति - सोडणे
लिख् - लिखति - लिहिणे
विद् - विन्दति - मिळणे / मिळविणे
सिच् - सिञ्चति - शिंपडणे
सृज् - सृजति - उत्पन्न करणे
स्पृश् - स्पृशति - स्पर्श करणे
स्फुर् - स्फुरति - स्फुरण पावणे
इष् - इच्छति - इच्छा करणे
विश् - विशति - शिरणे, प्रवेश करणे
सद् - सीदति - बसणे
गुम्फ् - गुम्फति - गुंफणे

षष्ट गण – आत्मनेपदी धातू

क्षिप्	-	क्षिपते	-	टाकणे, फेकणे
दिश्	-	दिशते	-	दाखविणे, सांगणे
जुष्	-	जुषते	-	आवडणे / हर्ष पावणे
मृ	-	म्रियते	-	मरणे
विद्	-	विन्दते	-	मिळणे / मिळविणे
मुच्	-	मुञ्चते	-	सोडणे

दशम गण– उभयपदी धातू

अर्ज्	-	अर्जयति/ते	-	मिळविणे
कथ्	-	कथयति/ते	-	सांगणे
क्षल्	-	क्षालयति/ते	-	धुणे
गण्	-	गणयति/ते	-	मोजणे, पर्वा करणे
घुष्	-	घोषयति/ते	-	घोषणा करणे
चिन्त्	-	चिन्तयति/ते	-	विचार करणे
चुर्	-	चोरयति/ते	-	चोरणे
तड्	-	ताडयति /ते	-	ठोकणे, मारणे
तुल्	-	तोलयति/ते	-	तोलणे, मोजणे
दण्ड	-	दण्डयति /ते	-	शिक्षा करणे
पीड्	-	पीडयति /ते	-	पिडा देणे
पूज्	-	पूजयति/ते	-	पूजा करणे
भक्ष्	-	भक्षयति/ते	-	भक्षण करणे
भुष्	-	भूषयति/ते	-	सुशोभित करणे
रच्	-	रचयति/ते	-	रचणे, बांधणे
लक्ष्	-	लक्षयति/ते	-	निरीक्षण करणे
वर्	-	वरयति/ते	-	मागणे, पसंत करणे
वर्ण्	-	वर्णयति/ते	-	वर्णन करणे
लाल्	-	लालयति/ते	-	लाड करणे
सान्त्व	-	सन्त्वयति/ते	-	सांत्वन करणे
वृ	-	वारयति/ते	-	अडविणे, रोखणे
सुच्	-	सूचयति/ते	-	सुचवणे
कृत्	-	कीर्तयति/ते	-	सांगणे, वर्णन करणे
धृ	-	धारयति/ते	-	धारण करणे
दृ	-	दारयति/ते	-	फाडणे
वृ	-	वारयति/ते	-	अडविणे / रोखणे
वञ्च्	-	वञ्चयति/ते	-	फसविणे
वृज्	-	वर्जयति/ते	-	वर्ज्य करणे/ टाळणे

दशम गण – परस्मैपदी धातू

कर्ण्	-	कर्णयति	-	ऐकणे
चूर्ण्	-	चूर्णयति	-	चिरडणे, पूड करणे
पाल्	-	पालयति	-	पालन करणे
मान्	-	मानयति	-	मान देणे
वच्	-	वाचयति	-	वाचणे, बोलणे

दशम गण – आत्मनेपदी धातू

अर्थ्	-	अर्थयते	-	मागणे
मृग्	-	मृगयते	-	शोधणे
मन्त्र्	-	मन्त्रयते	-	सल्लामसलत करणे

द्वितीय गट – (२, ३, ५, ७, ८, ९)

द्वितीय गण – परस्मैपदी धातू

अस्	-	अस्ति	-	असणे
या	-	याति	-	जाणे
पा	-	पाति	-	रक्षण करणे
ख्या	-	ख्याति	-	सांगणे
स्ना	-	स्नाति	-	स्नान करणे
इ	-	एति	-	जाणे
हन्	-	हन्ति	-	ठार मारणे
अद्	-	अत्ति	-	खाणे
भा	-	भाति	-	शोभणे, चकाकणे
रुद्	-	रोदिति	-	रडणे
विद्	-	वेत्ति	-	जाणणे
स्वप्	-	स्वपिति	-	झोपणे
स्तु	-	स्तौति	-	स्तुती करणे
ब्रू	-	ब्रवीति	-	बोलणे
दा	-	दाति	-	कापणे
वा	-	वाति	-	वाहणे
स्वस्	-	स्वसिति	-	श्वास घेणे

द्वितीय गण – आत्मनेपदी धातू

ब्रू	-	ब्रूते	-	बोलणे
दुह्	-	दुग्धे	-	दूध काढणे
द्विष्	-	द्विष्टे	-	द्वेष करणे
शी	-	शेते	-	पहुडणे
सू	-	सूते	-	जन्म देणे, उत्पन्न करणे
आस्	-	आस्ते	-	बसणे
वस्	-	वस्ते	-	नेसणे

तृतीय गण– परस्मैपदी धातू

भी - बिभेति - भिणे
भृ - बिभर्ति - पोसणे, धारण करणे
हा - जहाति - टाकणे, सोडून देणे
हु - जुहोति - हवन करणे
दा - ददाति - देणे
धा - दधाति - ठेवणे
ह्री - जिन्हेति - लाजणे

तृतीय गण– आत्मनेपदी धातू

भ्रृ - बिभ्रुते - धारणे करणे, पोसणे
हा - जिहीते - टाकणे
धा - धत्ते - ठेवणे
दा - दत्ते - देणे

पंचम गण – परस्मैपदी धातू

सु - सुनोति - रस काढणे
धु - धुनोति - हलविणे
दु - दुनोति - दुखविणे
श्रु - श्रृणोति - ऐकणे
वृ - वृणोति - निवडणे, पसंत करणे
हि - हिणोति - पाठविणे
क्षि - क्षिणोति - क्षीण होणे, क्षय होणे
चि - चिनोति - गोळा करणे
साध् - साध्नोति - साधने, साध्य करणे
धृष् - धृष्णोति - धजणे
आप् - आप्नोति - मिळविणे
शक् - शक्नोति - समर्थ होणे

पंचम गण – आत्मनेपदी धातू

अश् - अश्नुते - खाणे
वृ - वृणुते - निवडणे, पसंत करणे
धु - धुनुते - हलविणे
सु - सुनुते - रस काढणे

सप्तम गण – परस्मैपदी धातू

पिष् - पिनष्टि - पीठ करणे
युज् - युनक्ति - जोडणे, योजना करणे
भुज् - भुनक्ति - रक्षण करणे
भञ्ज् - भनक्ति - मोडणे
भिद् - भिनत्ति - फोडणे
छिद् - छिनत्ति - तोडणे, कापणे
रुध् - रुणद्धि - अडविणे

सप्तम गण – आत्मनेपदी धातू

भुज् - भुङ्क्ते - खाणे, उपभोग घेणे
युज् - युङ्क्ते - जोडणे
भिद् - भिनत्ते - फोडणे
रुध् - रुन्धे - अडविणे

अष्टम गण – परस्मैपदी धातू

तन् - तनोति - पसरविणे
कृ - करोति - करणे
क्षण् - क्षणोति - इजा करणे

अष्टम गण – आत्मनेपदी धातू

मन् - मनुते - मानणे, विचार करणे
वन् - वनुते - मागणे
तन् - तनुते - पसरविणे

नवम गण – परस्मैपदी धातू

पू - पुनाति - पवित्र करणे
वृ - वृणाति - वरणे, निवडणे
ज्ञा - जानाति - जाणणे
क्री - क्रीणाति - विकत घेणे
ली - लीनाति - वितळणे
प्री - प्रीणाति - संतुष्ट करणे
गृ - गृणाति - बोलणे
ग्रन्थ् - ग्रथ्नाति - रचणे
मन्थ् - मथ्नाति - घुसळणे
बन्ध् - बध्नाति - बांधणे
ग्रह् - गृण्हाति - घेणे
मुष् - मुष्णाति - चोरणे
पुष् - पुष्णाति - पोसणे
क्लिश्- क्लिश्नाति - क्लेश देणे
अश् - अश्नाति - खाणे

नवम गण – आत्मनेपदी धातू

ग्रह् - गृण्हीते - घेणे
ज्ञा - जानीते - जाणणे
वृ - वृणीते - वरणे, निवडणे
पू - पुनीते - पवित्र करणे
स्तृ - स्तृणीते - आच्छादिणे
क्री - क्रीणीते - विकत घेणे
प्री - प्रीणीते - संतुष्ट करणे

या सर्व धातूंना वर दिलेली त्या त्या गणांची गण विकरणे जोडून त्या पुढे विशिष्ट काळांचे प्रत्यय जोडले असता त्या त्या काळांची क्रियापदे तयार होतात त्यासाठी धातूंच्या अंगास लागणारे प्रत्यय पुढीलप्रमाणे –

प्रत्यय : गट क्र. १ ● (गण क्र.१, ४, ६, १०)

वर्तमानकाळी परस्मैपदी प्रत्यये

ए.व.	द्वि.व.	ब.व.	पुरुष
ति	तः	अन्ति	प्र.पुरुष
सि	थः	थ	म.पुरुष
मि	वः	मः	उ.पुरुष

वर दिलेल्या परस्मैपदी धातूंना गण विकरण व परस्मैपदी प्रत्यय जोडून परस्मैपदी क्रियापद तयार होते. ते क्रियापद तयार करण्याची पद्धती पुढीलप्रमाणे आहे.

प्रथम गणाच्या धातूंची परस्मैपदी क्रियापदे तयार करताना खालील नियमांचा वापर केला जातो.

नियम क्र.

(१) प्रत्ययाचा आदिवर्ण 'व' किंवा 'म' असल्यास त्यापूर्वीचा 'अ' स्वर दीर्घ होतो.

(२) प्रत्ययाचा आदिवर्ण 'अ' किंवा 'आ' असल्यास त्यापूर्वीच्या 'अ' स्वराचा लोप होतो.

(३) 'अ' किंवा 'आ' पुढे 'इ' किंवा 'ई' आल्यास त्या दोहोंबद्दल 'ए' असा गुण होतो.

वर्तमानकाळ – १ गण परस्मैपद 'धाव्' धातू (धावणे)

धातू	+ विकरण	+ प्रत्यय	= क्रियापद
धाव्	+ अ	+ ति	= धावति ।
धाव्	+ अ	+ तः	= धावतः ।
धाव्	+ अ	+ अन्ति	= धावन्ति ।
धाव्	+ अ	+ सि	= धावसि ।
धाव्	+ अ	+ थः	= धावथः।
धाव्	+ अ	+ थ	= धावथ ।
धाव्	+ अ	+ मि	= धावामि।
धाव्	+ अ	+ वः	= धावावः।
धाव्	+ अ	+ मः	= धावामः ।

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	धावति	धावतः	धावन्ति
म.पुरुष	धावसि	धावथः	धावथ
उ.पुरुष	धावामि	धावावः	धावामः

या परस्मैपदी क्रियापदांना सर्वनामांची रूपे जोडली असता मराठीमध्ये अर्थ तयार होतो.

✻ सः धावति	– तो धावतो	(पुल्लिंगी)	दूरच्या व्यक्तीसाठी
✻ तौ धावतः	– ते दोघे धावतात	(पुल्लिंगी)	
✻ ते धावन्ति	– ते सर्व धावतात	(पुल्लिंगी)	
✻ सा धावति	– ती धावते	(स्त्रीलिंगी)	
✻ ते धावतः	– त्या दोघी धावतात	(स्त्रीलिंगी)	
✻ ताः धावन्ति	– त्या सर्व धावतात	(स्त्रीलिंगी)	
✻ तत् धावति	– ते धावते	(नपुंसकलिंगी)	

* ते धावत: – ते दोघे धावतात (नपुंसकलिंगी)
* तानि धावन्ति – ते सर्व धावतात (नपुंसकलिंगी)
* त्वम् धावसि – तू धावतोस
* युवाम् धावथ: – तुम्ही दोघे धावतात } (समोरच्या व्यक्तीसाठी)
* यूयं धावथ: – तुम्ही सर्व धावतात
* अहं धावामि – मी धावतो
* आवां धावाव: – आम्ही दोघे धावतो } (स्वत:साठी)
* वयं धावाम: – आम्ही सर्व धावतो

वर तयार केलेल्या वर्तमानकाळी क्रियापदांचा वापर करून खालीलप्रमाणे वाक्य बनतात.

(०१) माता आनन्देन कार्यं करोति ।
(०२) अहं विश्वासेन भाषणं करोमि।
(०३) सा श्रद्धया पाठं पठति ।
(०४) युष्माभि: सह संस्कृतं पठाम: ।
(०५) वृक्षात् पत्रं पतति।
(०६) वर्षाकाले नदी वेगेन धावति।
(०७) धनिकानां गृहाणि उन्नतानि भवन्ति।
(०८) जना: उदासीनं पुरुषं निन्दन्ति।
(०९) स: शीतलं जलं पिबति।
(१०) वयं गृहं गच्छाम: ।
(११) अहं मन्दिरं गच्छामि।
(१२) बालका: शालां गच्छति।
(१३) गज: मन्दं चलति ।
(१४) त्वं गृहं गच्छसि।
(१५) यूयं क्रीडाङ्गणं गच्छथ।

अशाप्रकारे वर्तमानकाळी क्रियापदांचा वापर करून संस्कृतमधून वाक्यरचना तयार करावी. या सर्व वाक्यांमध्ये प्रथम गणाच्या धातूंची क्रियापदे वापरलेली आहेत तसेच षष्ठ गण, चतुर्थ गण व दशम गणातील धातूंची वर्तमानकाळी क्रियापदे वापरून त्यांचा वाक्यात उपयोग करावा. चतुर्थ, षष्ठ व दशम गणातील धातूंची क्रियापदे पुढीलप्रमाणे बनतात.

नश् (४ गण, परस्पैपद) वर्तमानकाळी क्रियापदे

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	नश्यति	नश्यत:	नश्यन्ति
म.पुरुष	नश्यसि	नश्यथ:	नश्यथ
उ.पुरुष	नश्यामि	नश्याव:	नश्याम:

टीप : वरील 'नश्' धातूच्या वर्तमानकाळी क्रियापदांप्रमाणेच चतुर्थ गणाच्या इतर धातूंची रूपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करून त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

लिख् (६ गण, परस्पैपद) वर्तमानकाळी क्रियापदे

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	लिखति	लिखत:	लिखन्ति
म.पुरुष	लिखसि	लिखथ:	लिखथ
उ.पुरुष	लिखामि	लिखाव:	लिखाम:

टीप : वरील 'लिख्' धातूच्या वर्तमानकाळी क्रियापदांप्रमाणेच षष्ठ गणाच्या इतर धातूंची रूपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करून त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

पूज् (१० गण, परस्पैपद) वर्तमानकाळी क्रियापदे

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	पूजयति	पूजयत:	पूजयन्ति
म.पुरुष	पूजयसि	पूजयथ:	पूजयथ
उ.पुरुष	पूजयामि	पूजयाव:	पूजयाम:

टीप : वरील 'पूज्' धातूच्या वर्तमानकाळी क्रियापदांप्रमाणेच दशम् गणाच्या इतर धातूंची रूपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करून त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

(अ) धातूंचे दोन गटांपैकी वर प्रथम गटातील १, ४, ६, व १० या गणांतील परस्मैपदी धातूंना वर्तमानकाळी प्रत्यय जोडून त्यांची क्रियापदे कशी बनवावीत ते आपण पाहिले, तसेच द्वितीय गटातील धातूंनासुद्धा हेच प्रत्यय जोडून वर्तमानकाळी क्रियापदे बनवावीत.

(ब) धातूंचे दोन गटांपैकी वर प्रथम गटातील १, ४, ६, व १० या गणांतील आत्मनेपदी धातूंना वर्तमानकाळी आ.प. प्रत्यय जोडून त्यांची वरील नियमांप्रमाणेच त्यांची क्रियापदे बनवावीत.

प्रत्यय : गट क्र.१ ● (गण क्र.१, ४, ६, १०)

वर्तमानकाळी आत्मनेपदी प्रत्यय

पुरुष	ए.व.	द्वि.व.	ब.व.
प्र.पुरुष	ते	इते	अन्ते
म.पुरुष	से	इथे	ध्वे
उ.पुरुष	इ	वहे	महे

वर दिलेल्या आत्मनेपदी धातूंना विकरण व आत्मनेपदी प्रत्यय जोडून आत्मनेपदी क्रियापद तयार होते. ते क्रियापद तयार करण्याची पद्धती पुढीलप्रमाणे आहे.

वर्तमानकाळ – १ गण आत्मनेपदी 'लभ्' धातू (मिळविणे)

धातू	+ विकरण	+ प्रत्यय =	क्रियापद
लभ्	+ अ	+ ते	= लभते ।
लभ्	+ अ	+ इते	= लभेते ।
लभ्	+ अ	+ अन्ते	= लभन्ते ।
लभ्	+ अ	+ से	= लभसे ।
लभ्	+ अ	+ इथे	= लभेथे।
लभ्	+ अ	+ ध्वे	= लभध्वे ।
लभ्	+ अ	+ इ	= लभे।
लभ्	+ अ	+ वहे	= लभावहे।
लभ्	+ अ	+ महे	= लभामहे ।

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	लभते	लभेते	लभन्ते
म.पुरुष	लभसे	लभेथे	लभध्वे
उ.पुरुष	लभे	लभावहे	लभामहे

या परस्मैपदी क्रियापदांना सर्वनामांची रूपे जोडली असता मराठीमध्ये अर्थ तयार होतो.

✻ सः लभते	– तो मिळवितो	(पुल्लिंगी)	दूरच्या व्यक्तीसाठी
✻ तौ लभेते	– ते दोघे मिळवितात	(पुल्लिंगी)	
✻ ते लभन्ते	– ते सर्व मिळवितात	(पुल्लिंगी)	
✻ सा लभते	– ती मिळविते	(स्त्रीलिंगी)	
✻ ते लभेते	– त्या दोघी मिळवितात	(स्त्रीलिंगी)	
✻ ताः लभन्ते	– त्या सर्व मिळवितात	(स्त्रीलिंगी)	
✻ तत् लभते	– ते मिळविते	(नपुंसकलिंगी)	
✻ ते लभेते	– ते दोघे मिळवितात	(नपुंसकलिंगी)	
✻ तानि लभन्ते	– ते सर्व मिळवितात	(नपुंसकलिंगी)	

✻ त्वम् लभसे – तू मिळवितोस

* युवाम् लभेथे - तुम्ही दोघे मिळविता
* यूयं लभध्वे - तुम्ही सर्व मिळविता
} (समोरच्या व्यक्तीसाठी)

* अहं लभे - मी मिळवितो
* आवां लभावहे - आम्ही दोघे मिळवितो
* वयं लभामहे - आम्ही सर्व मिळवितो.
} (स्वत:साठी)

याप्रमाणे प्रथम गणाची आत्मनेपदी वर्तमानकाळी क्रियापदे बनतात. अशाचप्रकारे चतुर्थ गण, षष्ठगण व दशम गणातील आत्मनेपदी धातूंना आ.प. प्रत्यय जोडून आ. प. वर्तमानकाळी क्रियापदे बनविली जातात.

उदा. वर्तमानकाळ चतुर्थ गण आत्मनेपदी 'मन्'(मानणे)

पुरुष	**एकवचन**	**द्विवचन**	**बहुवचन**
प्र.पुरुष	मन्यते	मन्यते	मन्यन्ते
म.पुरुष	मन्यसे	मन्येथे	मन्यध्वे
उ.पुरुष	मन्ये	मन्यावहे	मन्यामहे

टीप : वरील 'मन्' धातूच्या वर्तमानकाळी आत्मनेपदी क्रियापदांप्रमाणेच चतुर्थ गणाच्या इतर धातूंची रुपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करावा व त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

वर्तमानकाळ षष्ठ गण आत्मनेपदी 'क्षिप्'(टाकणे)

पुरुष	**एकवचन**	**द्विवचन**	**बहुवचन**
प्र.पुरुष	क्षिपते	क्षिपेते	क्षिपन्ते
म.पुरुष	क्षिपसे	क्षिपेथे	क्षिपध्वे
उ.पुरुष	क्षिपे	क्षिपावहे	क्षिपामहे

टीप : वरील 'क्षिप्' धातूच्या वर्तमानकाळी आत्मनेपदी क्रियापदांप्रमाणेच षष्ठ गणाच्या इतर धातूंची रूपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करावा व त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

वर्तमानकाळ दशम गण आत्मनेपदी 'पूज्' (पूजा करणे)

पुरुष	**एकवचन**	**द्विवचन**	**बहुवचन**
प्र.पुरुष	पूजयते	पूजयेते	पूजयन्ते
म.पुरुष	पूजयसे	पूजयेथे	पूजयध्वे
उ.पुरुष	पूजये	पूजयावहे	पूजयामहे

टीप : वरील 'पूज्' धातूच्या वर्तमानकाळी आत्मनेपदी क्रियापदांप्रमाणेच दशम गणाच्या इतर धातूंची रूपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करावा व त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

(अ) धातूंचे दोन गटांपैकी वर प्रथम गटातील १, ४, ६ व १० या गणांतील आत्मनेपदी धातूंना वर्तमानकाळी प्रत्यय जोडून त्यांची क्रियापदे कशी बनवावीत ते आपण पाहिले.

स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - १

वर्तमानकाळी क्रियापदांचा उपयोग करून पुढील वाक्ये पूर्ण करा.

(१) जनक: पुत्रं .... । (पृच्छति, पृच्छत:, पृच्छन्ति)

(२) बालका: पुस्तकं .... । (पठामि, पठाव:, पठन्ति)

(३) अहं मोदकं ....। (खादति, खादामि, खादाव:)

(४) त्वं गीतं ....। (गायति, गायसि, गायामि)

(५) सा पत्रं ....। (लिखामि, लिखन्ति, लिखति)

२.२.२ भूतकाळ

काळ म्हणजेच वेळ होय. जी वेळ होऊन गेलेली असते तिला भूतकाळ असे म्हणतात. व ती भूतकालीन क्रिया असे म्हणतात. ही भूतकाळी क्रिया दाखविण्यासाठी धातूंना त्यांच्या गणविकरणांपुढे भूतकाळी प्रत्यय जोडले असता, भूतकाळी क्रियापद तयार होते. ही क्रियापदे तयार करताना त्या त्या गणाच्या प. प. धातूंना प. प. भूतकाळी प्रत्यय जोडून व आत्मनेपदी धातूंना आ. प. प्रत्यय जोडून भूतकाळी क्रियापदे बनविली जातात. भूतकाळी क्रियापदे बनविताना सर्वप्रथम 'अ' आगम जोडून त्यापुढे धातूचे गणविकरण व भूतकाळी प्रत्यय क्रमश: जोडून भूतकाळी क्रियापदे बनविली जातात. क्रियापद बनविण्याची प्रक्रिया ही मागील वर्तमानकाळ क्रियापदाप्रमाणेच आहे. त्यांची तयार केलेली रुपे उदाहरण म्हणून खाली दिलेली आहेत. त्या त्या गणातील क्रियापदांप्रमाणेच इतर धातूंची क्रियापदे बनविण्याचा सराव करावा.

प्रत्यय : गट क्र. १ ● (गण क्र.१, ४, ६, १०)

भूतकाळी परस्मैपदी प्रत्यये

ए.व.	**द्वि.व.**	**ब.व.**	**पुरुष**
त्	ताम्	अन्	प्र.पुरुष
स् (:)	तम्	त	म.पुरुष
अम्	व	म	उ.पुरुष

वर दिलेल्या परस्मैपदी धातूंना विकरण व भूतकाळी परस्मैपदी प्रत्यय जोडून परस्मैपदी क्रियापद तयार होते.

भूतकाळ – १ गण परस्मैपद 'धाव्' धातू (धावणे)

पुरुष	**एकवचन**	**द्विवचन**	**बहुवचन**
प्र.पुरुष	अधावत्	अधावताम्	अधावन्
म.पुरुष	अधाव:	अधावतम्	अधावत
उ.पुरुष	अधावम्	अधावाव	अधावाम

अशाप्रकारे प्रथम गण प. प. धातूंना भूतकाळी प्रत्यय जोडून वरील प्रमाणे भूतकाळी क्रियापदे बनवावीत व त्यापासून भूतकाळी वाक्यरचना तयार कराव्यात.

नश् (४ गण, परस्मैपद) भूतकाळी क्रियापदे

पुरुष	**एकवचन**	**द्विवचन**	**बहुवचन**
प्र.पुरुष	अनश्यत्	अनश्यताम्	अनश्यन्
म.पुरुष	अनश्य:	अनश्यतम्	अनश्यत
उ.पुरुष	अनश्यम्	अनश्याव	अनश्याम

अशाप्रकारे चतुर्थ गण प. प. धातूंना भूतकाळी प्रत्यय जोडून वरीलप्रमाणे भूतकाळी क्रियापदे बनवावीत व त्यांपासून भूतकाळी वाक्यरचना तयार कराव्यात.

लिख् (६ गण, परस्पैपद) भूतकाळी क्रियापदे

पुरुष	**एकवचन**	**द्विवचन**	**बहुवचन**
प्र.पुरुष	अलिखत्	अलिखताम्	अलिखन्
म.पुरुष	अलिख:	अलिखतम्	अलिखत
उ.पुरुष	अलिखम्	अलिखाव	अलिखाम

टीप : वरील 'लिख्' धातूच्या भूतकाळी क्रियापदांप्रमाणेच षष्ठ गणाच्या इतर धातूंची रूपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करून त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

पूज् (१० गण, परस्पैपद) भूतकाळी क्रियापदे

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	अपूजयत्	अपूजयताम्	अपूजयन्
म.पुरुष	अपूजय:	अपूजयतम्	अपूजयत
उ.पुरुष	अपूजयम्	अपूजयाव	अपूजयाम

टीप : वरील 'पूज्' दशम् गण प.प. धातूच्या भूतकाळी क्रियापदांप्रमाणेच दशम् गणाच्या इतर धातूंची रूपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करुन त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

वर तयार केलेल्या भूतकाळी क्रियापदांचा वापर करून खालीलप्रमाणे वाक्ये बनतात.

(०१) माता आनन्देन कार्यं अकरोत् ।
(०२) अहं विश्वासेन भाषणं अकरवम्।
(०३) सा श्रद्धया पाठं अपठत् ।
(०४) युष्माभि: सह संस्कृतं अपठाम ।
(०५) वृक्षात् पत्रं अपतत्।
(०६) वर्षाकाले नदी वेगेन अधावत्।
(०७) धनिकानां गृहाणि उन्नतानि अभवन्।
(०८) जना: उदासीनं पुरुषं अनिन्दन्।
(०९) स: शीतलं जलं अपिबत्।
(१०) वयं गृहं अगच्छाम ।
(११) अहं मन्दिरं अगच्छम्।
(१२) बालका: शालां अगच्छन्।
(१३) गज: मन्दं अचलत् ।
(१४) त्वं गृहं अगच्छ: ।
(१५) यूयं क्रीडाङ्गणं अगच्छत।

अशाप्रकारे भूतकाळी क्रियापदांचा वापर करून संस्कृतमधून वाक्यरचना तयार करावी. या सर्व वाक्यांमध्ये प्रथम गणाच्या धातूंची क्रियापदे वापरलेली आहेत. तसेच षष्ठ गण, चतुर्थ गण व दशम गणातील धातूंची भूतकाळी क्रियापदे वापरून त्यांचा वाक्यात उपयोग करावा.

भूतकाळी आत्मनेपदी क्रियापदे

प्रत्यय : गट क्र. १ ● (गण क्र. १, ४, ६, १०)
भूतकाळी आत्मनेपदी प्रत्यये

ए.व.	द्वि.व.	ब.व.	पुरुष
त	इताम्	अन्त	प्र.पुरुष
थास् (:)	इथाम्	ध्वम्	म.पुरुष
इ	वहि	महि	उ.पुरुष

प्रथम गटातील १, ४, ६, १० या गणांमधील सर्व आत्मनेपदी धातूंना वरील आत्मनेपदी प्रत्यय जोडून आत्मनेपदी क्रियापदे तयार केली जातात. उदा.

भूतकाळ – १ गण आत्मनेपद 'लभ्' धातू (मिळविणे)

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	अलभत	अलभेताम्	अलभन्त
म.पुरुष	अलभथा:	अलभेथाम्	अलभध्वम्
उ.पुरुष	अलभे	अलभावहि	अलभामहि

अशाप्रकारे प्रथम गण आ.प.धातूंना भूतकाळी आ.प.प्रत्यय जोडून वरील प्रमाणे भूतकाळी क्रियापदे बनवावीत व त्यांपासून भूतकाळी वाक्यरचना तयार कराव्यात. उदा.

भूतकाळ चतुर्थगण आत्मनेपदी 'मन्' (मानणे)

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	अमन्यत	अमन्येताम्	अमन्यन्त
म.पुरुष	अमन्यथा:	अमन्येथाम्	अमन्यध्वम्
उ.पुरुष	अमन्ये	अमन्यावहि	अमन्यामहि

टीप : वरील चतुर्थ गणाच्या 'मन्' धातूच्या भूतकाळी आत्मनेपदी क्रियापदांप्रमाणेच चतुर्थ गणाच्या इतर धातूंची रूपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करावा व त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

भूतकाळ षष्ठ गण आत्मनेपदी 'क्षिप्' (टाकणे)

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	अक्षिपत	अक्षिपेताम्	अक्षिपन्त
म.पुरुष	अक्षिपथा:	अक्षिपेथाम्	अक्षिपध्वम्
उ.पुरुष	अक्षिपे	अक्षिपावहि	अक्षिपामहि

टीप : वरील षष्ठ गण 'क्षिप्' धातूच्या भूतकाळी आत्मनेपदी क्रियापदांप्रमाणेच षष्ठ गणाच्या इतर धातूंची रुपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करावा व त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

भूतकाळ दशम गण आत्मनेपदी 'पूज्' (पूजा करणे)

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	अपूजयत	अपूजयेताम्	अपूजयन्त
म.पुरुष	अपूजयथा:	अपूजयेथाम्	अपूजयध्वम्
उ.पुरुष	अपूजये	अपूजयावहि	अपूजयामहि

टीप : वरील दशम गण 'पूज्' धातूच्या भूतकाळी आत्मनेपदी क्रियापदांप्रमाणेच दशम गणाच्या इतर धातूंची रूपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करावा व त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

(अ) धातूंचे दोन गटांपैकी वर प्रथम गटातील १, ४, ६ व १० या गणांतील आत्मनेपदी धातूंना भूतकाळी प्रत्यय जोडून त्यांची क्रियापदे कशी बनवावीत ते आपण पाहिले.

स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न – २

भूतकाळी क्रियापदांचा उपयोग करून पुढील वाक्ये पूर्ण करा.

(१) अहम् आम्रफलम् .... । (अखाद:, अखादम्, अखादाव)

(२) वयं पाठं .... । (अपठत्, अपठत, अपठाम)

(३) त्वं मन्त्रं .... । (अपठत, अपठ:, अपठम्)

(४) स: गीताम् .... । (अपठत्, अपठ:, अपठम्)

(५) ता: गीतम् .... । (अगायत्, अगायताम्, अगायन्)

२.२.३ भविष्यकाळ

जेव्हा क्रियापदाने व्यक्त होणारी क्रिया पुढे होणार आहे असा बोध होतो तेव्हा त्यास भविष्यकाळ असे म्हणतात. भविष्यकाळी क्रियापद तयार करताना त्या त्या गणांची विकरणे धातूंपुढे न जोडता मूळ धातूस भविष्यकाळी प्रत्यय जोडले असता भविष्यकाळी क्रियापद तयार होते.

उदा. पा + स्यति = पास्यति।

काही धातूंना भविष्यकाळी प्रत्यय जोडण्यापूर्वी 'इ' आगम होतो.

उदा. पठ् + इ + स्यति = पठिस्यति।

नियम - 'स् ' पूर्वी अ, आ शिवाय इतर स्वर आला असता स् चा ष् होतो.

पठ् + इ + स्यति = पठिष्यति।

भविष्यकाळी परस्मैपदी प्रत्यय

प्रत्यय : गट क्र. १ ● (गण क्र.१, ४, ६, १०)

भविष्यकाळी परस्मैपदी प्रत्यये

ए.व.	द्वि.व.	ब.व.	पुरुष
स्यति	स्यत:	स्यन्ति	प्र.पुरुष
स्यसि	स्यथ:	स्यथ	म.पुरुष
स्यामि	स्याव:	स्याम:	उ.पुरुष

उदा. : धाव् (धावणे) १ गण प.प. भविष्यकाळी क्रियापदे

पुरुष	**एकवचन**	**द्विवचन**	**बहुवचन**
प्र.पुरुष	धाविष्यति	धाविष्यत:	धाविष्यन्ति
म.पुरुष	धाविष्यसि	धाविष्यथ:	धाविष्यथ
उ.पुरुष	धाविष्यामि	धाविष्याव:	धाविष्याम:

याप्रमाणे प्रथम गणाची परस्मैपदी भविष्यकाळी क्रियापदे बनतात. प्रथम गणाच्या परस्मैपदी धातूंना प.प.प्रत्यय जोडून प. प. भविष्यकाळी क्रियापदे बनविली जातात.

नश् (नाश पावणे) ४ गण, परस्मैपद भविष्यकाळी क्रियापदे

पुरुष	**एकवचन**	**द्विवचन**	**बहुवचन**
प्र.पुरुष	नङ्क्ष्यति	नङ्क्ष्यत:	नङ्क्ष्यन्ति
म.पुरुष	नङ्क्ष्यसि	नङ्क्ष्यथ:	नङ्क्ष्यथ
उ.पुरुष	नङ्क्ष्यामि	नङ्क्ष्याव:	नङ्क्ष्याम:

अशाप्रकारे चतुर्थ गण प.प. धातूंना भविष्यकाळी प्रत्यय जोडून वरीलप्रमाणे भविष्यकाळी क्रियापदे बनवावीत व त्यांपासून भविष्यकाळी वाक्यरचना तयार कराव्यात.

लिख् (६ गण, परस्पैपद) भविष्यकाळी क्रियापदे

पुरुष	**एकवचन**	**द्विवचन**	**बहुवचन**
प्र.पुरुष	लेखिष्यति	लेखिष्यत:	लेखिष्यन्ति
म.पुरुष	लेखिष्यसि	लेखिष्यथ:	लेखिष्यथ
उ.पुरुष	लेखिष्यामि	लेखिष्याव:	लेखिष्याम:

टीप : अशाप्रकारे वरील 'लिख्' धातूच्या भविष्यकाळी क्रियापदांप्रमाणेच षष्ठ गणाच्या इतर धातूंची रुपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करून त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

पूज् (पूजा करणे) १० गण, परस्मैपद भविष्यकाळी क्रियापदे

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	पूजयिष्यति	पूजयिष्यत:	पूजयिष्यन्ति
म.पुरुष	पूजयिष्यसि	पूजयिष्यथ:	पूजयिष्यथ
उ.पुरुष	पूजयिष्यामि	पूजयिष्याव:	पूजयिष्याम:

टीप : वरील 'पूज्' १० गण प. प. धातूच्या भविष्यकाळी क्रियापदांप्रमाणेच दशम गणाच्या इतर धातूंची रूपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करून त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

वर तयार केलेल्या भविष्यकाळी प. प. क्रियापदांचा वापर करून खालीलप्रमाणे वाक्य बनतात.

(०१) माता आनन्देन कार्यं करिष्यति।

(०२) अहं विश्वासेन भाषणं करिष्यामि ।

(०३) सा श्रद्धया पाठं पठिष्यति ।

(०४) युष्माभि: सह संस्कृतं पठिष्याम: ।

(०५) वृक्षात् पत्रं पतिष्यति ।

(०६) वर्षाकाले नदी वेगेन धाविष्यति ।

(०७) भक्ता मन्दिरं गमिष्यन्ति ।

(०८) जना: उदासीनं पुरुषं निन्दिष्यन्ति।

(०९) स: शीतलं जलं पास्यति

(१०) वयं गृहं गमिष्याम: ।

(११) अहं मन्दिरं गमिष्यामि।

(१२) बालका: शालां गमिष्यन्ति।

(१३) गज: मन्दं चलिष्यति।

(१४) त्वं गृहं गमिष्यसि ।

(१५) यूयं क्रीडाङ्गणं गमिष्यथ।

अशाप्रकारे भविष्यकाळी क्रियापदांचा वापर करून संस्कृतमधून वाक्यरचना तयार करावी. या सर्व वाक्यांमध्ये प्रथम गणाच्या धातूंची क्रियापदे वापरलेली आहेत. तसेच षष्ठ गण, चतुर्थ गण व दशम गणातील धातूंची भविष्यकाळी क्रियापदे वापरून त्यांचा वाक्यात उपयोग करावा.

द्वितीय भविष्यकाळ आत्मनेपदी क्रियापदे

प्रथम गटातील सर्व आत्मनेपदी धातूंना भविष्यकाळी आत्मनेपदी प्रत्यय जोडून खालीलप्रमाणे भविष्यकाळी आ. प. क्रियापदे तयार केली जातात.

प्रत्यय : गट क्र.१ ● (गण क्र.१, ४, ६, १०)

भविष्यकाळी आत्मनेपदी प्रत्यय

पुरुष	ए.व.	द्वि.व.	ब.व.
प्र.पुरुष	स्यते	स्येते	स्यन्ते
म.पुरुष	स्यसे	स्येथे	स्यध्वे
उ.पुरुष	स्ये	स्यावहे	स्यामहे

लभ् (मिळविणे) १ गण आ.प.भविष्यकाळी क्रियापदे

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	लप्स्यते	लप्स्येते	लप्स्यन्ते
म.पुरुष	लप्स्यसे	लप्स्येथे	लप्स्यध्वे
उ.पुरुष	लप्स्ये	लप्स्यावहे	लप्स्यामहे

याप्रमाणे प्रथम गणाची आत्मनेपदी भविष्यकाळी क्रियापदे बनतात. अशाच प्रकारे चतुर्थ गण, षष्ठगण व दशमगणातील आत्मनेपदी धातूंना आ. प. प्रत्यय जोडून आ. प. भविष्यकाळी क्रियापदे बनविली जातात.

उदा. भविष्यकाळ चतुर्थगण आत्मनेपदी ‘मन्’(मानणे)

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	मन्स्यते	मन्स्येते	मन्स्यन्ते
म.पुरुष	मन्स्यसे	मन्स्येथे	मन्स्यध्वे
उ.पुरुष	मन्स्ये	मन्स्यावहे	मन्स्यामहे

टीप : वरील ‘मन्’ धातूच्या भविष्यकाळी आत्मनेपदी क्रियापदांप्रमाणेच चतुर्थ गणाच्या इतर धातूंची रूपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करावा व त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

भविष्यकाळ षष्ठ गण आत्मनेपदी ‘क्षिप्’(टाकणे)

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	क्षिप्स्यते	क्षिप्स्येते	क्षिप्स्यन्ते
म.पुरुष	क्षिप्स्यसे	क्षिप्स्येथे	क्षिप्स्यध्वे
उ.पुरुष	क्षिप्स्ये	क्षिप्स्यावहे	क्षिप्स्यामहे

टीप : वरील ‘क्षिप्’ धातूच्या भविष्यकाळी आत्मनेपदी क्रियापदांप्रमाणेच षष्ठगणाच्या इतर धातूंची रुपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करावा व त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

भविष्यकाळ दशम गण आत्मनेपदी ‘पूज्’(पूजा करणे)

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	पूजयिष्यते	पूजयिष्येते	पूजयिष्यन्ते
म.पुरुष	पूजयिष्यसे	पूजयिष्येथे	पूजयिष्यध्वे
उ.पुरुष	पूजयिष्ये	पूजयिष्यावहे	पूजयिष्यामहे

टीप : वरील ‘पूज्’ धातूच्या भविष्यकाळी आत्मनेपदी क्रियापदांप्रमाणेच दशम गणाच्या इतर धातूंची रूपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करावा व त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

(अ) धातूंचे दोन गटांपैकी वर प्रथम गटातील १, ४, ६ व १० या गणांतील आत्मनेपदी धातूंना भविष्यकाळी प्रत्यय जोडून त्यांची क्रियापदे कशी बनवावीत ते आपण पाहिले.

स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न – ३

भविष्यकाळी क्रियापदांचा उपयोग करून पुढील वाक्ये पूर्ण करा.

(१) पिता कार्यालयम् .... । (गमिष्यति, गमिष्यत:, गमिष्यन्ति)

(२) अहं ग्रामं .... । (गमिष्यामि, गमिष्यति, गमिष्याव:)

(३) त्वं पुस्तकं .... । (पठिष्यसि, पठिष्यति, पठिष्यामि)

(४) ते फलं .... । (खादिष्यसि, खादिष्यन्ति, खादिष्यामि)

(५) सा मन्त्रं .... । (वदिष्यति, वदिष्यामि, वदिष्याव:)

२.२.४ आज्ञार्थ, विध्यर्थ

आज्ञार्थ

आज्ञार्थ क्रियापदांचा वाक्यात उपयोग करून आज्ञा करणे किंवा विनंती करणे अशा दोन प्रकारच्या छटा प्रकट केल्या जातात. जेव्हा मोठी व्यक्ती एखाद्या वाक्यातून आज्ञार्थक क्रियापदाचा वापर लहान व्यक्तीसाठी करते तेव्हा त्यातून आज्ञा व्यक्त होते. जेव्हा एखादी व्यक्ती आपल्यापेक्षा मोठ्या व्यक्तींसाठी वापरलेल्या वाक्यांमध्ये आज्ञार्थ क्रियापदांचा वापर करते तेव्हा त्या वाक्यामधून विनंती असा अर्थ प्रकट होतो. त्या त्या परिस्थितीला अनुसरून आज्ञार्थी वाक्यांचा अर्थ गृहीत धरावा व अर्थबोध करून घ्यावा.

प्रत्यय : गट क्र. १ ● (गण क्र. १, ४, ६, १०)

आज्ञार्थी परस्मैपदी प्रत्यये

ए.व.	द्वि.व.	ब.व.	पुरुष
तु	ताम्	अन्तु	प्र.पुरुष
-	तम्	त	म.पुरुष
आनि	आव	आम	उ.पुरुष

ही सर्व आज्ञार्थक क्रियापदे वापरण्यासाठी धातूच्या अंगास आज्ञार्थ प्रत्यय जोडून पुढीलप्रमाणे क्रियापदे बनविली जातात.

परस्मैपदी धातूंना गणविकरण व आज्ञार्थी परस्मैपदी प्रत्यय जोडून परस्मैपदी क्रियापद तयार होते.
उदा.

आज्ञार्थ - १ गण परस्मैपद 'धाव्' धातू (धावणे)

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	धावतु	धावताम्	धावन्तु
म.पुरुष	धाव	धावतम्	धावत
उ.पुरुष	धावानि	धावाव	धावाम

अशाप्रकारे प्रथम गण प. प. धातूंना आज्ञार्थी प. प. प्रत्यय जोडून वरीलप्रमाणे आज्ञार्थी क्रियापदे बनवावीत व त्यांपासून आज्ञार्थी वाक्यरचना तयार कराव्यात.

नश् (४ गण, परस्मैपद) आज्ञार्थी क्रियापदे

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	नश्यतु	नश्यताम्	नश्यन्तु
म.पुरुष	नश्य	नश्यतम्	नश्यत
उ.पुरुष	नश्यानि	नश्याव	नश्याम

अशाप्रकारे चतुर्थ गण प. प. धातूंना आज्ञार्थी प. प. प्रत्यय जोडून वरीलप्रमाणे आज्ञार्थी क्रियापदे बनवावीत व त्यांपासून आज्ञार्थी वाक्यरचना तयार कराव्यात.

लिख् (६ गण, परस्पैपद) आज्ञार्थी क्रियापदे

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	लिखतु	लिखताम्	लिखन्तु
म.पुरुष	लिख	लिखतम्	लिखत
उ.पुरुष	लिखानि	लिखाव	लिखाम

टीप : वरील 'लिख्' धातूच्या आज्ञार्थी क्रियापदांप्रमाणेच षष्ठगणाच्या इतर प. प. धातूंची रुपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करून त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

पूज् (१० गण, परस्मैपद) आज्ञार्थी क्रियापदे

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	पूजयतु	पूजयताम्	पूजयन्तु
म.पुरुष	पूजय	पूजयतम्	पूजयत
उ.पुरुष	पूजयानि	पूजयाव	पूजयाम

टीप : वरील 'पूज्' १० गण प. प. धातूच्या आज्ञार्थी क्रियापदांप्रमाणेच दशम् गणाच्या इतर प. प. धातूंची रूपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करून त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

वर तयार केलेल्या आज्ञार्थी क्रियापदांचा वापर करून खालीलप्रमाणे वाक्य बनतात.

(१) अहं देवं नमानि । (२) शिष्य, त्वं पाठं पठ ।

(३) अध्यापक:, आसने उपविशतु । (४) छात्रौ, युवां पाठं पठतम् ।

(५) वयं देवं नमाम । (६) आवां सरस्वतिं नमाव ।

अशाप्रकारे आज्ञार्थी क्रियापदांचा वापर करून संस्कृतमधून वाक्यरचना तयार करावी. या सर्व वाक्यांमध्ये प्रथम गणाच्या प. प. धातूंची क्रियापदे वापरलेली आहेत तसेच षष्ठ गण, चतुर्थ गण व दशम गणातील प. प. धातूंची आज्ञार्थी क्रियापदे वापरून त्यांचा वाक्यात उपयोग करावा.

आज्ञार्थ आत्मनेपदी क्रियापदे

प्रथम गटातील सर्व आत्मनेपदी धातूंना आज्ञार्थ आत्मनेपदी प्रत्यय जोडून खालीलप्रमाणे आज्ञार्थ क्रियापदे तयार केली जातात. त्यासाठी लागणारे आज्ञार्थ आ. प. प्रत्यय पुढीलप्रमाणे आहेत.

प्रत्यय : गट क्र. १ ● (गण क्र. १, ४, ६, १०)			
आज्ञार्थी आत्मनेपदी प्रत्यये			
ए.व.	**द्वि.व.**	**ब.व.**	**पुरुष**
ताम्	इताम्	अन्ताम्	प्र.पुरुष
स्व	इथाम्	ध्वम्	म.पुरुष
ऐ	आवहै	आमहै	उ.पुरुष

प्रथम गटातील १, ४, ६, १० या गणांमधील सर्व आत्मनेपदी धातूंना वरील आत्मनेपदी प्रत्यय जोडून आत्मनेपदी क्रियापदे तयार केली जातात.

उदा.

आज्ञार्थ – १ गण आत्मनेपद 'लभ्' धातू (मिळविणे)

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	लभताम्	लभेताम्	लभन्ताम्
म.पुरुष	लभस्व	लभेथाम्	लभध्वम्
उ.पुरुष	लभै	लभावहै	लभामहै

अशाप्रकारे प्रथम गण आ.प.धातूंना आज्ञार्थी आ. प. प्रत्यय जोडून वरीलप्रमाणे आज्ञार्थी क्रियापदे बनवावीत व त्यांपासून आज्ञार्थी वाक्यरचना तयार कराव्यात.

उदा.

आज्ञार्थी चतुर्थ गण आत्मनेपदी 'मन्'(मानणे)

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र. पुरुष	मन्यताम्	मन्येताम्	मन्यन्ताम्
म. पुरुष	मन्यस्व	मन्येथाम्	मन्यध्वम्
उ. पुरुष	मन्यै	मन्यावहै	मन्यामहै

टीप : वरील चतुर्थ गणाच्या 'मन्' धातूच्या आज्ञार्थी आत्मनेपदी क्रियापदांप्रमाणेच चतुर्थगणाच्या इतर आ. प. धातूंची रूपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करावा व त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

आज्ञार्थ षष्ठगण आत्मनेपदी 'क्षिप्'(टाकणे)

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	क्षिपताम्	क्षिपेताम्	क्षिपन्ताम्
म.पुरुष	क्षिपस्व	क्षिपेथाम्	क्षिपध्वम्
उ.पुरुष	क्षिपै	क्षिपावहै	क्षिपामहै

टीप : वरील षष्ठ गण 'क्षिप्' धातूच्या आज्ञार्थी आत्मनेपदी क्रियापदांप्रमाणेच षष्ठ गणाच्या इतर धातूंची रुपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करावा व त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

आज्ञार्थ दशमगण आत्मनेपदी 'पूज्'(पूजा करणे)

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	पूजयताम्	पूजयेताम्	पूजयन्ताम्
म.पुरुष	पूजयस्व	पूजयेथाम्	पूजयध्वम्
उ.पुरुष	पूजयै	पूजयावहै	पूजयामहै

टीप : वरील दशम गण 'पूज्' १० गण धातूच्या आज्ञार्थी आत्मनेपदी क्रियापदांप्रमाणेच दशम्‌गणाच्या इतर आ. प. धातूंची रूपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करावा व त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

(अ) धातूंचे दोन गटांपैकी वर प्रथम गटातील १, ४, ६ व १० या गणांतील आत्मनेपदी धातूंना आ. प. आज्ञार्थी प्रत्यय जोडून त्यांची क्रियापदे कशी बनवावीत ते आपण पाहिले.

स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न – ४

आज्ञार्थी क्रियापदांचा उपयोग करून पुढील वाक्ये पूर्ण करा.

(१) भवान् एतत् फलम् .... । (स्वीकुरु, स्वीकरोतु, स्वीकुर्वन्तु)

(२) त्वं शालां .... । (गच्छत, गच्छ, गच्छतम्)

(३) किं अहं मन्दिरं .... । (प्रविशानि, प्रविशतु, प्रविश)

(४) अहं देवं .... । (वन्दावहे, वन्दे, वन्द्यस्व)

(५) छात्र: विद्यां .... । (लभताम्, लभेताम्, लभन्ताम्)

(६) बालक: त्वं स्वदेशं .... । (लभै,लभस्व, लभताम्)

(ब) विध्यर्थ

वाक्यामधून जेव्हा आज्ञा, उपदेश, अपेक्षा, इच्छा, योग्यता, शक्यता किंवा संभव अशा अर्थाचे बोलणे व्यक्त करावयाचे असते तेव्हा वाक्यामध्ये विध्यर्थक क्रियापदांचा वापर केला जातो. विध्यर्थक क्रियापदे बनविताना परस्मैपदी धातूच्या अंगास प. प. विध्यर्थक प्रत्यय जोडून विध्यर्थक क्रियापदे बनविली जातात. त्यासाठी लागणारे प. प. प्रत्यय असे –

प्रत्यय : गट क्र. १ ● (गण क्र.१, ४, ६, १०)

विध्यर्थ परस्मैपदी प्रत्यये

ए.व.	द्वि.व.	ब.व.	पुरुष
इत्	इताम्	इयुः	प्र.पुरुष
इस् (:)	इतम्	इत	म.पुरुष
इयम्	इव	इम	उ.पुरुष

परस्मैपदी धातूंना विकरण व विध्यर्थी परस्मैपदी प्रत्यय जोडून परस्मैपदी क्रियापद तयार होते.
उदा.

आज्ञार्थ – १ गण परस्मैपद 'धाव्' धातू (धावणे)

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	धावेत्	धावेताम्	धावेयुः
म.पुरुष	धावेः	धावेतम्	धावेत
उ.पुरुष	धावेयम्	धावेव	धावेम

अशाप्रकारे प्रथम गण प. प. धातूंना विध्यर्थी प. प. प्रत्यय जोडून वरीलप्रमाणे विध्यर्थी क्रियापदे बनवावीत व त्यांपासून विध्यर्थी वाक्यरचना तयार कराव्यात.

नश् (४ गण, परस्मैपद) विध्यर्थी क्रियापदे

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	नश्येत्	नश्येताम्	नश्येयुः
म.पुरुष	नश्येः	नश्येतम्	नश्येत
उ.पुरुष	नश्येयम्	नश्येव	नश्येम

अशाप्रकारे चतुर्थ गण प. प. धातूंना विध्यर्थी प. प. प्रत्यय जोडून वरील प्रमाणे विध्यर्थी क्रियापदे बनवावीत व त्यांपासून विध्यर्थी वाक्यरचना तयार कराव्यात.

लिख् (६ गण, परस्पैपद) विध्यर्थी क्रियापदे

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	लिखेत्	लिखेताम्	लिखेयुः
म.पुरुष	लिखेः	लिखेतम्	लिखेत
उ.पुरुष	लिखेयम्	लिखेव	लिखेम

टीप : वरील 'लिख्' धातूच्या विध्यर्थी क्रियापदांप्रमाणेच षष्ठ गणाच्या इतर धातूंची रूपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करून त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

पूज् (१० गण, परस्मैपद) विध्यर्थी क्रियापदे

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	पूजयेत्	पूजयेताम्	पूजयेयुः
म.पुरुष	पूजयेः	पूजयेतम्	पूजयेत
उ.पुरुष	पूजयेयम्	पूजयेव	पूजयेम

टीप : वरील 'पूज्' १० गण प.प.धातूच्या विध्यर्थी क्रियापदांप्रमाणेच दशम गणाच्या इतर धातूंची रूपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करून त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

वर तयार केलेल्या विध्यर्थी क्रियापदांचा वापर करुन खालीलप्रमाणे वाक्य बनतात.

(१) अहं विद्यावान् भवेयम् ।
(२) त्वं स्वस्थानं रक्षेयम् ।
(३) छात्रः स्वहितं चिन्तयेत् ।
(४) जनाः स्वहितं चिन्तयेयुः।
(५) वयं विद्यावन्तः भवेम।
(६) युवां स्वस्थानं रक्षेतम् ।

अशाप्रकारे विध्यर्थी क्रियापदांचा वापर करुन संस्कृतमधून वाक्यरचना तयार करावी. या सर्व वाक्यांमध्ये प्रथम गणाच्या प. प. धातूंची क्रियापदे वापरलेली आहेत तसेच षष्ठ गण, चतुर्थ गण व दशम गणातील धातूंची विध्यर्थी क्रियापदे वापरून त्यांचा वाक्यात उपयोग करावा.

विध्यर्थ आत्मनेपदी क्रियापदे

प्रथम गटातील सर्व आत्मनेपदी धातूंना विध्यर्थ आत्मनेपदी प्रत्यय जोडून खालीलप्रमाणे विध्यर्थ क्रियापदे तयार केली जातात.

प्रत्यय : गट क्र. १ ● (गण क्र.१, ४, ६, १०)

विध्यर्थी आत्मनेपदी प्रत्यये

ए.व.	द्वि.व.	ब.व.	पुरुष
ईत	ईयाताम्	ईरन्	प्र.पुरुष
ईथाः	ईयाथाम्	ईध्वम्	म.पुरुष
ईय	ईवहि	ईमहि	उ.पुरुष

प्रथम गटातील १, ४, ६, १० या गणांमधील सर्व आत्मनेपदी धातूंना वरील आत्मनेपदी प्रत्यय जोडून आत्मनेपदी क्रियापदे तयार केली जातात.

उदा.

विध्यर्थ – १ गण आत्मनेपद 'लभ्' धातू (मिळविणे)

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	लभेत	लभेयाताम्	लभेरन्
म.पुरुष	लभेथाः	लभेयाथाम्	लभेध्वम्
उ.पुरुष	लभेय	लभेवहि	लभेमहि

अशाप्रकारे प्रथम गण आ. प. धातूंना विध्यर्थी आ. प. प्रत्यय जोडून वरीलप्रमाणे विध्यर्थी क्रियापदे बनवावीत व त्यांपासून विध्यर्थी वाक्यरचना तयार कराव्यात.

उदा. **विध्यर्थी चतुर्थगण आत्मनेपदी 'मन्'(मानणे)**

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	मन्येत	मन्येयाताम्	मन्येरन्
म.पुरुष	मन्येथाः	मन्येयाथाम्	मन्येध्वम्
उ.पुरुष	मन्येय	मन्येवहि	मन्येमहि

टीप : वरील चतुर्थ गणाच्या 'मन्' ४ गण आ. प. धातूच्या विध्यर्थी आत्मनेपदी क्रियापदांप्रमाणेच चतुर्थगणाच्या इतर आ. प. धातूंची रूपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करावा व त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

विध्यर्थ षष्ठगण आत्मनेपदी 'क्षिप्' (टाकणे)

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	क्षिपेत	क्षिपेयाताम्	क्षिपेरन्
म.पुरुष	क्षिपेथा:	क्षिपेयाथाम्	क्षिपेध्वम्
उ.पुरुष	क्षिपेय	क्षिपेवहि	क्षिपेमहि

टीप : वरील षष्ठ गण 'क्षिप्' धातूच्या विध्यर्थी आत्मनेपदी क्रियापदांप्रमाणेच षष्ठगणाच्या इतर धातूंची रूपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करावा व त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

विध्यर्थ दशमगण आत्मनेपदी 'पूज्' (पूजा करणे)

पुरुष	एकवचन	द्विवचन	बहुवचन
प्र.पुरुष	पूजयेत	पूजयेयाताम्	पूजयेरन्
म.पुरुष	पूजयेथा:	पूजयेयाथाम्	पूजयेध्वम्
उ.पुरुष	पूजयेय	पूजयेवहि	पूजयेमहि

टीप : वरील दशम् गण 'पूज्' धातूच्या विध्यर्थी आत्मनेपदी क्रियापदांप्रमाणेच दशम गणाच्या इतर धातूंची रूपे बनवून त्यांना सर्वनामे जोडून मराठीत अर्थ तयार करावा व त्यांच्यापासून संस्कृत वाक्ये तयार करावीत.

(अ) धातूंचे दोन गटांपैकी वर प्रथम गटातील १, ४, ६ व १० या गणांतील आत्मनेपदी धातूंना विध्यर्थी प्रत्यय जोडून त्यांची क्रियापदे कशी बनवावीत ते आपण पाहिले.

स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न – ५

आज्ञार्थी क्रियापदांचा उपयोग करुन पुढील वाक्ये पूर्ण करा.

(१) अहं भारतं .... । (वन्देय, वन्देवहि, वन्देमहि)

(२) वयं भारतमातरं .... । (वन्देत्, वन्देवहि, वन्देमहि)

(३) त्वं स्वाध्यायं .... । (आरभेथा:, आरभेयाथाम्, आरभेध्वम्)

(४) जना: मधुरं .... । (भाषेत, भाषेयाताम्, भाषेरन्)

(५) आवां पितरं .... । (वन्देय, वन्देवहि, वन्देमहि)

२.३ पारिभाषिक शब्द

(०१) **काळ :** एखादी क्रिया होऊन गेली आहे असे कळते, तेव्हा त्या क्रियेला भूतकाळ असे म्हणतात. यावरून काळ म्हणजेच वेळ असा अर्थ स्पष्ट होतो.

(०२) **क्रियापद :** वाक्यामधील कर्ता जी क्रिया करतो ती ज्या शब्दाने प्रकट होते त्यास क्रियापद असे म्हणतात.

(०३) **अङ्ग :** धातूंना त्यांच्या गणांप्रमाणे विकरणे जोडली असता अंग तयार होते.

(०४) **पद :** धातूच्या अंगास जेव्हा क्रियापद तयार करण्यासाठी काळांचे प्रत्यय जोडले जातात तेव्हा त्यास पद संज्ञा प्राप्त होते. उदा. गम–गच्छ् + अ + ति = गच्छति

(०५) **आदेश :** एखाद्या वर्णाच्या किंवा शब्दाच्या जागी दुसराच वर्ण किंवा शब्द येतो तेव्हा त्यास आदेश असे म्हणतात. उदा. गति + अंतर = गत्यंतर या ठिकाणी 'गति'मधील, 'इ' ऐवजी 'य' होऊन गत्यंतर असे होते. याशब्दातील 'इ' ऐवजी होणाऱ्या 'य'ला आदेश असे म्हणतात.

(०६) **आगम :** रूपसिद्ध करण्यासाठी मूळ धातूला किंवा शब्दाला अवयव म्हणून मागे किंवा पुढे एखादा वर्ण जोडला जातो. तेव्हा त्यास आगम असे म्हणतात. उदा. अ + गच्छ् + अ + अम् = अगच्छम् । येथे सुरुवातीचा 'अ' हा आगम आहे. किंवा देव + आम् = देवानाम् या रूपामध्ये मध्यभागी आलेला 'न' हा आगम आहे.

(०७) **गुण :** संस्कृत भाषेमध्ये ए, ओ आणि अर् यांचा गुणसंज्ञा प्राप्त झालेली आहे. उदा. गण + ईश = गणेश

(०८) **सकर्मक धातू :** ज्या धातूंपासून व्यक्त होणारी क्रिया ही स्वत:च्या शरीराबाहेर घडते तेव्हा त्यास सकर्मक धातू म्हणतात. कर्त्याच्या क्रियेचा परिणाम ज्याच्यावर होतो त्याला कर्म म्हणतात व ज्या धातूंना कर्म असते त्या धातूंना सकर्मक धातू असे म्हणतात. आणि त्यांच्यापासून बनणाऱ्या क्रियापदांच्या रूपांना सकर्मक क्रियापदे असे म्हणतात.

(०९) **अकर्मक धातू :** ज्या धातूंपासून व्यक्त होणारी क्रिया ही स्वत:मध्येच घडते तेव्हा त्यास अकर्मक धातू म्हणतात. उदा. जीवति, प्रीयते, चिन्तयति इ.

(१०) **पुरुष :** अहं ईश्वरं नमामि । (मी देवाला नमस्कार करतो) जेव्हा वाक्यातील अस्मद् सर्वनामाच्या अहं या रूपावरून व नमामि या क्रियापदावरून बोलणारा स्वत:बद्दल विधान करतो असे कळून येते तेव्हा त्यास उत्तम पुरुषी वाक्य असे म्हणतात.

त्वं ईश्वरं नमसि। (तू देवाला नमस्कार करतोस) जेव्हा वाक्यातील युष्मद् सर्वनामाच्या त्वं या रूपावरून आणि नमसि या क्रियापदावरून बोलणाऱ्या व्यक्तीच्या समोरील ऐकणाऱ्यास विधान केले आहे असे दिसते तेव्हा त्यास मध्यमपुरुषी वाक्य रचना असे म्हणतात.

स: ईश्वरं नमति। (तो देवाला नमस्कार करतो) जेव्हा वाक्यामध्ये तत् सर्वनामाच्या रूपावरून व नमति या क्रियापदावरून बोलाणारा स्वत:खेरीज किंवा समोरील ऐकणाऱ्याखेरीज अन्य इतरांबद्दल (तिसऱ्या व्यक्तीबद्दल) जेव्हा विधान करतो असा बोध होतो तेव्हा त्या वाक्यरचनेस प्रथमपुरुषी वाक्यरचना असे म्हणतात.

२.४ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं–अध्ययन प्रश्न – १

(१) पृच्छति । (२) पठन्ति । (३) खादामि । (४) गायसि । (५) लिखति ।

स्वयं–अध्ययन प्रश्न – २

(१) अखादम्। (२) अपठाम । (३) अपठ: । (४) अपठत् । (५) अगायन् ।

स्वयं-अध्ययन प्रश्न - ३

(१) गमिष्यति । (२) गमिष्यामि। (३) पठिस्यसि । (४) खादिष्यन्ति । (५) वदिष्यति।

स्वयं-अध्ययन प्रश्न - ४

(१) स्वीकरोतु। (२) गच्छ। (३) प्रविशानि। (४) वन्दे। (५) लभताम् ।

स्वयं-अध्ययन प्रश्न - ५

(१) वन्देय। (२) वन्देमहि । (३) आरभेथाः । (४) भाषेरन्। (५) वन्देवहि।

२.५ सारांश

अशाप्रकारे संस्कृत भाषेचा मूळ घटक म्हणजेच वाक्य होय व त्या वाक्याला ज्याने पूर्णत्व येते त्याला क्रियापद असे म्हणतात. त्या क्रियापदाचे घटक कोणते व त्यापासून विशिष्ट नियमानुसार प्रत्येक धातूच्या अंगास काळांचे प्रत्यय जोडून क्रियापदे कशी बनतात ते येथे स्पष्ट करून दाखविले आहे. तसेच त्या क्रियापदांच्या रूपांना (पदांना) सर्वनामांची रूपे जोडून त्यांचा मराठीत अर्थ कसा बनवावा व त्यापासून वाक्यरचना कशी तयार करावी याचा अभ्यास या प्रकरणात केलेला आहे.

२.६ सरावासाठी स्वाध्याय

(१) प्रथमगण परस्मैपद गम्-गच्छ् (जाणे) या धातूच्या वर्तमानकाळी रूपास सर्वनामाची रूपे जोडून मराठीत अर्थ लिहा.

(२) ६ गण. प. प. लिख धातूची भूतकाळी क्रियापदे लिहा.

(३) ४ गण आ. प. मन् धातूची आत्मनेपदी आज्ञार्थ व आ. प. विध्यर्थाची रूपे लिहा.

(४) १० गण प. प. पूज् धातूची भविष्यकाळी रूपे बनवा व त्यांचा मराठीत अर्थ लिहा.

(५) सर्व काळांचे व अर्थांचे प्रत्यय लिहून कंठस्थ करा.

२.७ क्षेत्रीय कार्य

(१) इ. दहावीच्या संस्कृत पुस्तकातील सर्व क्रियापदांचे गण, पद काळ ओळखून त्यांचा मराठीत अर्थ लिहा.

(२) प्रत्येक गणातील एका प. प. व एका आ. प. धातूची रूपे पाचही काळात चालवा व त्यांना पुरुषवाचक सर्वनामे जोडून मराठीत अर्थ लिहा.

२.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) झा रामचन्द्र, *संस्कृत व्याकरण*, चौखम्बा विद्याभवन, वाराणसी

(२) नाटेकर राजाराम, *संस्कृत शब्दधातुरुपावली*, नवनीत पब्लिकेशन्स, मुंबई

(३) अंभोरे ग. वा., *संस्कृतसरिता*, एम्परर पब्लिकेशन्स, नाशिक

(४) दातार सि. भा., *संस्कृतचे सोपे व्याकरण*, केशव भिकाजी ढवळे, मुंबई

(५) जोशी प्र. शं., *सुगम संस्कृत व्याकरण*, नितीन प्रकाशन, पुणे

(६) व्यम्पटीकुटुम्बशास्त्री, *वाक्यव्यवहार:*, राष्ट्रीय संस्कृत संस्थान, नई दिल्ली

घटक ३ : व्यावहारिक संस्कृत परिचय

अनुक्रमणिका

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय-विवेचन

    ३.२.१ व्यावहारिक शब्दसंचय-१

    ३.२.२ व्यावहारिक शब्दसंचय-२

    ३.२.३ सुभाषिते (श्लोक)

    ३.२.४ कथा

३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ क्षेत्रीय कार्य

३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

३.० उद्दिष्टे

ह्या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला

* व्यवहारात संस्कृतमधून बोलता येण्यासाठी गृहोपयोगी शब्दांना संस्कृत शब्द सांगता येईल.
* व्यवहारातील पशू, पक्षी, फळे, भाज्या व वस्त्रादी वस्तूंना संस्कृत शब्द सांगता येईल.
* संस्कृतमधून श्लोकांचा मराठीत अर्थ सांगता येईल.
* संस्कृतमधून कथाकथन करता येईल.
* संस्कृत कथांचे मराठीत भाषांतर करता येईल.

३.१ प्रास्ताविक

संस्कृत भाषेबद्दल आजही सर्वसामान्यांमध्ये काही गैरसमज दृढ झालेले आहेत. जसे की संस्कृत भाषा ही अतिशय कठीण भाषा आहे. संस्कृत भाषा मला समजणार नाही, संस्कृत भाषेचा व्यवहारात उपयोग नाही.संस्कृत भाषा ही विशिष्ट जनसमूहाची भाषा आहे इ. तेव्हा या प्रकरणातून संस्कृत भाषा व्यवहारात आणण्यासाठी अर्थात संस्कृतमधून बोलण्यास प्रवृत्त करण्यासाठी उपयुक्त असा संस्कृत शब्दसंग्रह देऊन त्या शब्दसंग्रहाच्या साहाय्याने

सोप्या कथांचे व श्लोकांचे आकलन कसे होते व त्या कथांमधून नीतितत्त्वांचा कोणता बोध होतो ते या प्रकरणात आपण समजावून घेणार आहोत.

३.२ विषय-विवेचन

३.२.१ व्यावहारिक शब्दसंचय – १

व्यवहारामध्ये नेहमी संस्कृतमधून बोलण्यासाठी नित्याच्या व्यवहारातील काही वस्तू, व्यक्ती व पदार्थ यांना संस्कृतमधून प्रतिशब्द माहिती करून देण्यासाठी काही शब्द पुढे दिलेले आहेत. त्यांचा उपयोग करून संस्कृतमधून बोलण्यास, लिहिण्यास, वाचण्यास व संस्कृत समजण्यास निश्चितच मदत होईल.

शरीरस्य अवयवा:

संस्कृत		मराठी	संस्कृत		मराठी
मस्तकम्	–	डोके	करतल:	–	पंजा, तळहात
केश:	–	केस	अङ्गुली	–	बोट
ललाटम्	–	कपाळ	मणिबन्ध:	–	मनगट
नयनम्, नेत्रम्	–	डोळा	कूर्पर:	–	कोपर
नासिका	–	नाक	उरस्, वक्ष:	–	छाती
मुखम्	–	तोंड	उदरम्	–	पोट
कर्ण:	–	कान	नाभि:	–	बेंबी
ओष्ठ:, अधर:	–	ओठ	कटि:	–	कंबर
जिव्हा	–	जीभ	अङ्क:, ऊरु:	–	मांडी
दन्त:	–	दात	जानु:	–	गुडघा
कपोल:	–	गाल	पिंडिका	–	पोटरी
कण्ठ:, गल:	–	गळा	पदम्	–	पाऊल
ग्रीवा	–	मान	पार्ष्णि	–	टाच
स्कन्ध:	–	खांदा	अंगुष्ठ:	–	अंगठा
बाहू:, भुज:	–	दण्ड	पदतल:	–	तळपाय
हस्त:	–	हात	चुबुकम्/हनु:	–	हनवटी
			स्मश्रु :	–	दाढी

शिष्टाचारा:

संस्कृत	मराठी	इंग्रजी
हरिओम् ।	– रामराम	– हॅलो
नमस्ते /नमस्कार:	– नमस्ते / नमस्कार	– हॅलो
सुप्रभातम्	– शुभ प्रभात	– गुड मॉर्निंग
शुभरात्रि: ।	– शुभरात्री	– गुड नाईट
धन्यवाद:	– धन्यवाद	– थँक यू / थँक्स
स्वागतम्	– स्वागत असो	– वेलकम्
चिन्ता माऽस्तु	– काळजी करू नका	– डोंट वरी
कृपया	– कृपा करून	– प्लीज

क्षम्यताम् / क्षमस्व	- क्षमा करा		- सॉरी
पुनः मिलामः	- पुन्हा भेटू		- सी यू
अस्तु	- ठीक आहे		- ओके
श्रीमन् /बन्धूः	- महोदय		- सर, मिस्टर
मान्ये /भगिनी	- बाई		- मॅडम
साधु / समीचीनम्	- चांगले / योग्य आहे		- गुड, राईट, करेक्ट

परिवारः

संस्कृत	मराठी	संस्कृत	मराठी
पिता, जनकः	- वडील	पौत्रः	- मुलाचा मुलगा (नातू)
माता, जननी	- आई	दौहित्रः	- मुलीचा मुलगा (नातू)
पुत्रः, सुतः	- मुलगा	पौत्रीः	- मुलाची मुलगी (नात)
पुत्री, दुहिता	- मुलगी	दौहित्रीः	- मुलीची मुलगी (नात)
सोदरः, भ्राता	- भाऊ	जामाता	- जावई
भ्रातृजाया	- भाऊजय	स्नुषा	- सून
याता	- जावू	मातृभगिनी	- मावशी
भगिनी	- बहीण	विमाता	- सावत्र आई
आवुत्तः	- बहिणीचा पती (मेहुणा)	ननान्दा	- नणंद
भागिनेयः	- बहिणीचा मुलगा	देवरः	- दीर
पत्नी	- बायको	प्रतिवेशी	- शेजारी
शालः	- पत्नीचा भाऊ	स्वामी	- मालक
पितामहः, मातामहः	- आजोबा	सेवकः	- नोकर
पितामही, मातामही	- आजी	सापत्नः	- सावत्र
पितृव्यः	- काका (वडिलांचा भाऊ)	श्वश्रूः	- सासू
पितृव्या	- काकू	श्वशूरः	- सासरा
मातुलः	- मामा (आईचा भाऊ)	पितृभगिनी	- आत्या
मातुलानी	- मामी	भ्रात्रीयः	- पुतण्या
मित्रम्, वयस्यः	- मित्र	भ्रात्रीया	- पुतणी
सखी	- मैत्रीण	भागिनेयः	- भाचा
		भागिनेयी	- भाची

फलानि

संस्कृत	मराठी	संस्कृत	मराठी
आताफलम्	- सफरचंद	भल्लातफलम्	- काजू
कदलीफलम्	- केळ	बिल्वफलम्	- बेलफळ
बीजपूरफलम्	- पेरू	सीतफलम्	- सीताफळ
द्राक्षाफलम्	- द्राक्ष	रामफलम्	- रामफळ
आम्रफलम्	- आंबा	वाताम्बुः	- बदाम
जम्बूफलम्	- जांभुळ	कलिङ्गः	- कलिंगड
करमर्दकम्	- करवंद	खर्बूजः	- खरबूज
नारंगफलम्	- संत्री	कपित्थफलम्	- कविट
मिष्टनिम्बुकम्	- मोसंबी	वाताफलम्	- बदाम
उदुम्बरम्	- उंबर	नारिकेलः	- नारळ
सेवम् / आताफलम्	- सफरचंद	चीकूफलम्	- चिकू

दाडिमम्	- डाळींब	इक्षूदण्ड:	- ऊस
पनसफलम्	- फणस	नीम्बूफलम्	- लिंबू
बदरीफलम्	- बोर	अननसफलम्	- अननस
मधुकर्कटी	- पपई		

शाकानि

संस्कृत	**मराठी**	**संस्कृत**	**मराठी**
शिम्बी	- घेवडा	हरितम्	- कोबी
कारवेल्लम्	- कारले	गृञ्जनकम्	- गाजर
पुष्पशाकम्	- फ्लॉवर	तुम्ब:	- भोपळा
कन्द:	- बीट	कर्कटी	- काकडी
भिण्डि:	- भेंडी	आलाबू /परवलं	- पडवळ
लशूनम्	- लसूण	गोजिव्हा	- गवारी
कुष्माण्डकम्	- काशिफळ	आर्द्रकम्	- आले
वर्तूलकम्	- वाटाणा	सुण्ठी	- सुंठ
मरिचिका	- मिरची	मूलिका	- मुळा
गोलमूलकम्	- नवलकोल	कस्तुम्बरु:	- कोथिंबीर
पलाण्डु:	- कांदा	कुष्माण्ड:	- दुधीभोपळा
आलुक:	- बटाटा	मधुरालुक:	- रताळे
वार्तकी	- टोमॅटो	महामरीचिका	- ढोबळी मिरची
वृन्ताकम्	- वांगे		

पुष्पाणि

संस्कृत	**मराठी**	**संस्कृत**	**मराठी**
मुद्गर:	- मोगरा	सेवन्तिका	- शेवन्ती
जातिपुष्पम्	- जाई	बकुल:	- बकुळ
युथिका	- जुई	कर्दली	- कर्दळ
करवीरम्	- कण्हेर	कमलम्	- कमळ
पाटल:	- गुलाब	केतकी	- केवडा
चम्पक:	- चाफा	पुष्पम्	- फूल
प्राजक्त:	- पारिजातक	कलिका	- कळी
झंडु:	- झेंडू	लता, वल्लि:	- वेल

खगा:

संस्कृत	**मराठी**	**संस्कृत**	**मराठी**
चटका	- चिमणी	दार्वाघट:	- सुतारपक्षी
काक:	- कावळा	हंस:	- हंस
पिक:	- कोकीळ	बक:	- बगळा
कपोत:	- कबूतर	उष्ट्रपक्षी	- शहामृग
मयूर:	- मोर	कुक्कुटी	- कोंबडी
शुक:	- पोपट	अण्डम्	- अंडे
कुक्कुट:	- कोंबडा	चञ्चु:	- चोच
कलहंस:, कादंब:	- बदक	पक्ष:	- पंख
चित्रपतंग:	- फुलपाखरू	पिच्छम्	- पीस
गृध्र:	- गिधाड	नीडम्	- घरटे
उलुक:	- घुबड	पञ्जरम्	- पिंजरा

पशव:

संस्कृत	मराठी	संस्कृत	मराठी
सिंह:	– सिंह	महिषी	– म्हैस
व्याघ्र:	– वाघ	उष्ट्र:	– उंट
शृगाल:	– कोल्हा	चित्रोष्ट्र:	– जिराफ
गज:	– हत्ती	वृषभ:	– बैल
अश्व:	– घोडा	गौ, धेनु:	– गाय
गर्दभ:	– गाढव	रासभ:	– गाढव
कुक्कुर:, श्वान:	– कुत्रा	चित्ररासभ:	– झेब्रा
मार्जार:	– मांजर	चित्रक:	– चित्ता
अजा	– शेळी	महिष:	– रेडा
वानर:, कपि:	– माकड	वृक: / जम्बूक:	– लांडगा
अज:	– बोकड	चिक्रोड:	– खार
शशक:	– ससा	गोधा	– घोरपड
कच्छप:	– कासव	गोध:	– सरडा
मेष:	– मेंढी	भुजंग:(सर्प:)	– साप
करियाद:	– पाणघोडा	नकुल:	– मुंगूस
मृग:	– हरीण	मकर:	– मगर
भल्लुक:	– अस्वल	शृङ्गम्	– शिंग
खड्गमृग:, खड्गी	– गेंडा	पुच्छम्	– शेपटी
मूषक:	– उंदीर	कर्णम्	– कान
काङ्गारु :	– कांगारू	शुण्डा	– सोंड
मीन:, मत्स्य:	– मासा		

कीटका:

संस्कृत	मराठी	संस्कृत	मराठी
मक्षिका	– माशी	सरट:	– सरडा
मधुमक्षिका	– मधमाशी	वृश्चिक:	– विंचू
मत्कुण:	– ढेकूण	किञ्चुलक:	– गांडूळ
यूक:	– ऊ	शतपदी	– गोम
मशक:	– डास	शम्बूक:	– गोगलगाय
पिपीलिका	– मुंगी	शुक्ति:	– शींप, शिंपला
भ्रमर:	– भुंगा	रक्तपा (जलूक:)	– जळू
चित्रपतंग:	– फुलपाखरू	कुलीर:	– खेकडा
शलभ:	– नाकतोडा	मत्स्य:, मीन:	– मासा
ऊर्णनाभ:	– कातीन	कूर्म:	– कासव
तैलप:	– झुरळ	मण्डूक:	– बेडूक
गृहगोधिका	– पाल	मण्डूकशावक:	– बेडकाचे पिलू

३.२.२ व्यावहारिक शब्दसंचय – २

संस्कृतबद्दलची प्रत्येकाच्या मनात असलेली भीती दूर होण्यासाठी व प्रत्येकाला व्यवहारातील वस्तूंना संस्कृतमधून प्रतिशब्द माहीत होण्यासाठी काही महत्त्वाचे व्यवहारोपयोगी शब्द पुढे दिलेले आहेत.

व्यवहारोपयोगी शब्द

संस्कृत	मराठी	संस्कृत	मराठी
प्रक्षालनम्	- धुणे	फेनकम्	- साबण
प्रातर्विधि:	- प्रातर्विधी	सुफेनकम्	- अंगाचा साबण
शौचालय:	- संडास	कवोष्णजलम्	- कोमट पाणी
नलिका	- नळ	शीतजलम्	- थंड पाणी
द्रोणि:	- बादली	उष्णजलम्	- गरम पाणी
कुम्भी, कुम्भ:	- तपेली	वस्त्रपरिधानम्	- कपडे घालणे
संस्तरणम्	- अंथरुण	वेणीग्रथनम्	- वेणी घालणे
पुटीकरणम्	- घडी घालणे	मुखराग:	- फेस पावडर
दन्त धावनम्	- दात घासणे	तैलम्	- तेल
गण्डूष:	- चूळ	कङ्कतिका	- कंगवा
ष्ठीवनम्	- थुंकणे	तिलक:	- कुंकू / टिकली
दन्तफेनम्	- टूथपेस्ट	तैलमर्दनम्	- तेल लावणे
दन्तमञ्जनम्	- दंतमंजन	लघुशङ्का	- लघुशंका
दन्तकूर्च:	- टूथब्रश	नागदन्त:	- खुंटी
दर्पण:	- आरसा	अवलम्बक:	- हँगर
करवस्त्रम्	- रुमाल	दण्डिका	- दांडी
प्रोञ्छ:	- टॉवेल	सीमन्त:	- भांग
शुष् (शोषयति)	- वाळत घालणे	निष्पीडनम्	- पिळणे
कूप:	- विहीर	केशबन्धनम्	- हेअरबॅण्ड
जलकुण्ड:	- हौद	चाप:, केशसूची	- हेअरपिन
उत्कलक:	- बॉयलर	बालशैली	- बॉयकट
तापक:	- गिझर	प्रसाधनकक्ष:	- ड्रेसिंग रूम
जलोत्सारक:	- पंप (पाण्याचा)	विलेपयति	- तेल इ. लावणे
केशा:	- केस	मुच् (मोचयति)	- नळ इ. सोडणे
घर्षणम्	- घासणे	स्थग् (स्थगयति)	- नळ बंद करणे
घर्षणी	- घासणी	पुट् (पूटयति)	- घडी करणे
माल्यम्	- गजरा		

गृहोपकरणानि

संस्कृत	मराठी	संस्कृत	मराठी
नि:श्रेणिका	- शिडी	समीकरी	- इस्त्री
स्थुली	- स्टूल	स्यूत:	- पिशवी
संमार्जनी	- झाडू	कर्तरी	- कातरी
अवकर:	- केर	सूची	- सुई
अवकरिका	- केराची टोपली	घटी	- घड्याळ

पाकगृहोपकरणानि

संस्कृत	मराठी	संस्कृत	मराठी
चषकः	– कप	वेल्लनी	– लाटणे
आधानी	– बशी	मन्थकः	– रवी
चमसः	– चमचा	पाचनः	– कुकर
स्थाली	– थाळी	उद्बन्धः / शिक्यम्	– शिंके
परिवेषणम्	– वाढणे	कंसः / गलन्तिका	– सुरई
अलं, पर्याप्तम्	– पुरे	अग्निपेटिका	– काडीपेटी
शरावः/कंसः	– वाटी	मिश्रकः	– मिक्सर
पात्रम्	– भांडे	पूगकर्तरी	– अडकित्ता
कलशः	– तांब्या	पिधानी	– झाकणी
चुल्लिका	– चूल	छुरिका	– सुरी
तेलचुल्लिका	– स्टोव्ह	शूर्पः	– सूप
वायुचुल्लिका	– गॅस शेगडी	ईलिः	– विळी
विद्युत् अंगारिका	– शेगडी (इलेक्ट्रिक)	भोजनोत्पीठिका	– डायनिंग टेबल
पीठम्, आसनम्	– पाट	आसन्दिका	– खुर्ची
दर्वी	– पळी	शीतकपाटम्	– फ्रीझ
ज्वालकः	– लायटर	कपाटिका	– कपाट
हस्तदीपः	– बॅटरी	वस्तुधानी	– शेल्फ
पात्रम्	– पातेले	मुसलः	– मुसळ
चषकः	– ग्लास	चालनी	– चाळणी
परित्रम्, पिष्टरः	– परात	तितउ, पावनी	– गाळणी
तप्तकः	– तवा	ओघदः	– ओघराळे
उत्तोलनी	– उलथने	पुष्पाधानी	– फ्लॉवरपॉट
संदंशिका	– चिमटा	सिक्थवर्तिका	– मेणबत्ती
कटाही, कटाहः	– कढई	आकाशवाणी	– रेडिओ
कूपी	– बाटली	दूरदर्शनम्	– टी.व्ही.
करण्डकः	– डबा	दूरभाषः	– टेलिफोन
पुटग्रीवः	– बरणी	व्यजनम्	– पंखा
भक्तवेषी	– भातवाढी	भ्रमणध्वनी	– मोबाईल फोन
पोलीपट्टः	– पोळपाट		

क्रीडणकानि

संस्कृत	मराठी	संस्कृत	मराठी
कन्दुकः	– चेंडू	पाञ्चालिका	– बाहुली
पादकन्दुकः	– फूटबॉल	वाताटः	– पतंग
गञ्जिफा	– पत्ते	पाकक्रीडा	– भातुकली
चौरंगक्रीडा	– सारीपाट	क्रिकेटक्रीडा	– क्रिकेट
शिष्कारः	– शिटी	बुद्धिबलक्रीडा	– बुद्धिबळ
भुशुण्डिः	– बंदूक		

प्रातराश: – भोजनम्

संस्कृत	मराठी	संस्कृत	मराठी
चायम्	– चहा	आम्लकी	– आमटी
बिन्दुपेयम् / कॉफी	– कॉफी	वरान्नम्	– वरण
दुग्धम्	– दूध	घृतम्	– तूप
आम्रपेयम्	– पन्हे	कथिका /तेमनम्	– कढी
तक्रम्	– ताक	कुशम्भरी	– कोशिंबीर
दधि	– दही	जम्बीरम्	– लिंबू
पानकम्	– सरबत	पर्पट:	– पापड
पिष्टकम्	– बिस्कीट	पोलिका	– पोळी
हिमदुग्धम्	– आईस्क्रिम	भर्ज:	– भजी
चिपिट:	– चिवडा	पिष्ठलम्	– पिठले
पृथुक:	– पोहे	कुण्डलिका – जिलेबी	
सुपिष्टकम्	– पाव	रसगोलक:	– गुलाबजामून
वट:	– वडा	संयावह:	– शिरा
घावनम्	– डोसा	कृशरा	– खिचडी
उपदंश: / उपसेचनम्	– चटणी	मरीचिका	– मिरची
भक्तम्, ओदनम्	– भात	कटु:	– तिखट
शाकम्, द्रवशाकम्	– भाजी	अम्ल	– आंबट
अवलेह:	– लोणचे	लवण,क्षार	– खारट
नवनीतम्	– लोणी	मधुर	– गोड
पायसम्	– खीर	तिक्त:	– कडू
कषाय	– तुरट	तेजस्करम्	– ताजे
लवणम्	– मीठ	भक्षणम् (भक्षय)	– खाणे
पर्युषितम्	– शिळे	पानम् (पिब)	– पिणे

वस्त्राणि

संस्कृत	मराठी	संस्कृत	मराठी
युतकम्	– शर्ट /सदरा	अंतर्निचोल:	– पेटिकोट
करवस्त्रम्	– हातरुमाल	पादच्छद:	– पायमोजे
उरुकम्	– पँट	पदांशुकम्	– पायजमा
अर्धोरुकम्	– हाफपँट	स्वेदक:	– स्वेटर
अधरीयम्	– धोतर	कुड्मल:	– बटन
चित्रवेष्टि:	– लुंगी	कोष:	– खिसा
टोपिका	– टोपी	जंघिका	– जांघिया
चोल:	– पोलके (ब्लाऊज)	संसक्तोरुकम्	– सलवार
शाटिका	– साडी	उत्तरीयम्	– दुपट्टा
परिकर:	– परकर	निचोल:	– फ्रॉक
अंगिकम्	– गंजिफ्रॉक /बनियन	गलपट्ट:	– स्कार्फ

वृत्तय:

संस्कृत	मराठी	संस्कृत	मराठी
सुवर्णकार:	– सोनार	शिक्षिका	– शिक्षिका
चर्मकार:	– चांभार	वैद्य:	– डॉक्टर
कुम्भकार:	– कुंभार	न्यायवादी/अधिवक्ता	– वकील
शिल्पकार:	– कारागीर	न्यायाधीश:	– न्यायाधीश
रजक:	– धोबी	अभियन्ता	– इंजिनिअर
सीवक:,सौचिक:	– शिंपी	वास्तुविषारद:	– आर्किटेक्ट
नापित:	– न्हावी	शास्त्रज्ञ:	– शास्त्रज्ञ
रञ्जक:	– पेंटर	विद्युत्तज्ञ:	– इलेक्ट्रीशियन
तक्षक:	– सुतार	नलज्ञ:	– प्लंबर
वणिक्	– व्यापारी	आपणिक:	– दुकानदार
कृषक:, कृषिवल:	– शेतकरी	गायक:	– गायक
लिपिक:	– कारकून	वादक:	– वादक
व्याध:	– शिकारी	नर्तक:	– नर्तक, नट
श्रमिक:	– मजूर	उद्योग:	– नोकरी
कर्मकर:	– कामगार	व्यवसाय:	– धंदा
शिक्षक:	– शिक्षक	मध्यस्थ:	– दलाल

वाहनानि

संस्कृत	मराठी	संस्कृत	मराठी
शकट:	– गाडी	विमानम्	– विमान
अश्वशकट:	– घोडागाडी	आशुगा	– एक्सप्रेस
द्विचक्रिका	– सायकल	मन्दगा	– पॅसेंजर
रिक्षायानम्	– रिक्षा	कारयानम्	– कार / मोटार
स्थानीयम्	– लोकल	भारीन्	– ट्रक
लोकयानम्	– बस	चन्द्रिकायानम्	– मोपेड
रेलयानम्	– रेल्वे	वामनी	– स्कूटर
नगरयानम्	– सिटी बस	ट्रॅक्टरयानम्	– ट्रॅक्टर

पत्राणि

संस्कृत	मराठी	संस्कृत	मराठी
समपत्रम्	– पत्र (कार्ड)	निमन्त्रणपत्रिका	– निमंत्रणपत्रिका
देयपत्रम्	– बिल	भेटपत्रम्	– भेटपत्र (ग्रीटिंगकार्ड)
धनादेश:	– चेक, मनीऑर्डर	संकेत:	– पत्ता
पत्रालय:	– पोस्ट ऑफिस	मुद्रा	– शिक्का
पिहितपत्रम्	– पाकीट	मूल्याम:	– तिकीट
धनपत्रम्	– नोट	विवाहपत्रिका	– लग्नपत्रिका
नाणकम्	– नाणे	पत्रपेटिका	– पत्रपेटी

शालासाहित्यम्

संस्कृत	मराठी	संस्कृत	मराठी
पाठशाला	- शाळा	मसी	- शाई
इयत्ता	- इयत्ता	आधारफलकम्	- पॅड
वर्गः	- तुकडी	संयोजनी	- स्टॅपलर
प्रकोष्ठः	- खोली	निर्यासः	- गोंद (डिंकदानी)
मञ्च	- बाक	रंध्रिका	- पंचिंग मशीन
उत्पीठिका	- टेबल	कपाटिका	- कपाट
आसन्दः	- खुर्ची	शिक्षकः	- शिक्षक
कृष्णफलकम्	- फळा	मापिका	- फूटपट्टी
सुधाखण्डः	- खडू	कटः	- चटई
मार्जकम्	- डस्टर	शिक्षिका	- शिक्षिका
उपस्थितीपत्रकम्	- हजेरीपुस्तक	मुख्याध्यापकः	- मुख्याध्यापक
पुस्तकम्	- पुस्तक	छात्रः	- विद्यार्थी
लेखनपुस्तिका	- वही	क्रीडांगणम्	- खेळाचे मैदान
लेखनी	- पेन	ग्रंथालयः	- ग्रंथालय, वाचनालय
अमनी	- पेन्सिल	प्रयोगशाला	- प्रयोगशाळा
वर्णलेखणी	- स्केचपेन	कार्यालयः	- कार्यालय
भूपटः	- नकाशा	उट्टंकिका	- टायपिंग मशीन
पुनप्पूरणी	- कांडी	सङ्गणकः	- संगणक, कॉम्प्युटर
लेखफलकम्	- पाटी	वृत्तपत्रम्	- वर्तमानपत्र
हस्तघटी	- घड्याळ (मनगटी)	सुविचारः	- सुविचार
भित्तीघटी	- घड्याळ (भिंतीवरचे)	दिनचर्या	- दिनक्रम
गणवेशः	- गणवेश (पोषाख)	दिनदर्शिका	- कॅलेन्डर
स्यूतः	- दप्तर (पिशवी)	घण्टा	- बेल
कंपासपेटिका	- कंपासपेटी	समयपत्रकम्	- वेळापत्रक

धातवः

संस्कृत	मराठी	संस्कृत	मराठी
सुवर्णम्	- सोने	शिसम्	- शिसे
रजतम्	- चांदी	वङ्गः, त्रपुः	- कथील
ताम्रम्	- तांबे	कास्यम्	- कासे
पितलम्	- पितळ	तीक्ष्णायस्	- पोलाद
लोहम्	- लोखंड	काष्ठम् / दारु	- लाकूड
		आकरः	- खाण

पादत्राणानि

संस्कृत	मराठी	संस्कृत	मराठी
पादरक्षा	- चप्पल	युतः	- बूट
पादत्राणम्	- जोडा	संयुतः	- सँडेल
घस्त्रिका	- स्लीपर	पादच्छदः	-पायमोजे (सॉक्स)

स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न संच – १

(१) कोणत्याही पाच प्राण्यांची संस्कृत नावे लिहा.

(२) कोणत्याही पाच पक्ष्यांची संस्कृत नावे लिहा.

(३) कोणत्याही पाच फळांची संस्कृत नावे लिहा.

(४) कोणत्याही पाच भाज्यांची संस्कृत नावे लिहा.

स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न संच – २

योग्य जोड्या जुळवा

	अ स्तंभ (संस्कृत)		ब स्तंभ (मराठी)
(१)	नासिका	(क)	मामा
(२)	स्कंध:	(ख)	चुलता
(३)	मातुल:	(ग)	गाल
(४)	पितृव्य:	(घ)	नाक
(५)	कपोल:	(ङ)	खांदा

३.२.३ सुभाषिते (श्लोक)

भाषासु मुख्या मधुरा दिव्या गीर्वाण भारति । तस्याम् हि काव्यं मधुरं तस्मादपि सुभाषितम् ।।

सुभाषित म्हणजे सुंदर बोलणे. संस्कृत साहित्यात खूप सुभाषिते आहेत. कमी शब्दात महान आशय प्रकट करणे हे सुभाषितांचे वैशिष्ट्य होय. ही सुभाषिते ऐकण्यास गोड, गायन करण्यास सुलभ, व अर्थपूर्ण असतात. सुभाषितांच्या वाचनाने वाणी सुसंस्कृत व निर्दुष्ट होते. वक्तृत्व कलेत नैपुण्य संपादन करण्यासाठी व उत्तम निबंध लिहिण्यासाठी सुभाषिते ही अतिशय उपयोगी आहेत. अशीच काही सुभाषिते येथे दिलेली आहेत.

(०१) येषां न विद्या न तपो न दानं ज्ञानं न शीलं न गुणो न धर्मः ।
ते मर्त्यलोके भुवि भारभूता मनुष्यरुपेण मृगाश्चरन्ति ।।

ज्या व्यक्तीजवळ विद्या, तपश्चर्या, दानशूरपणा, बहुश्रुतपणा, सच्छीलपणा, सद्‌गुण आणि कर्तव्यबुद्धीसुद्धा नसते ते या पृथ्वीस निव्वळ भार होऊन बसतात. जणू ते दोन पायाचे मानवरूप पशूच आहेत.

(०२) न चोरहार्यं न च राजहार्यं न भ्रातृभाज्यं न च भारकारी ।
व्यये कृते वर्धत एव नित्यम् विद्याधनं सर्व धनप्रधानम् ।।

विद्या हे असे धन आहे की जे चोर हरण करू शकत नाही, राजा त्यातून कररूपाने वाटा घेऊ शकत नाही, भाऊबंदात त्याचे वाटे होत नाहीत, त्याचे कुणास ओझे होत नाही, ज्ञान दिल्याने वाढते. अशा प्रकारचे विद्यारूप धन सर्वश्रेष्ठ आहे.

(०३) दातृत्वं प्रियवक्तृत्वं धीरत्वमुचितज्ञता ।
अभ्यासेन न लभ्येयुः चत्वारः सहजा गुणाः ।।

दानशूरपणा, गोड मार्दवाने बोलण्याची कला, संकटास तोंड देण्याचा धाडसी स्वभाव आणि कुठल्या प्रसंगी कसे वागणे योग्य ठरेल याचे ज्ञान हे सर्व चार स्वभावविशेष अंगभूत असावे लागतात ते केवळ प्रयत्न साध्य नाहीत.

(०४) अयं निजः परो वेत्ति गणनालघुचेतसाम् ।
उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम् ।।

क्षुद्र विचाराची माणसे हा आपला, हा परका असा भेदभाव करतात. पण मोठ्या मनाच्या लोकांस सर्व जगच आपलेसे वाटते. त्यांना सगळे जवळचे व आवडते वाटतात.

(०५) यः पठति लिखति परिपृच्छति पंडितानुपाश्रयति ।
तस्य दिवाकर किरणैर्नलिनीदलमिव विकास्यते बुद्धिः ।।

जो माणूस सतत वाचन, लेखन चौकशी करून चिकित्सक वृत्तीने ज्ञान मिळविणे आणि विद्वानांच्या संगतीत राहून त्यांच्या अनुभवाचा व ज्ञानाचा उपयोग करून घेणे, या प्रकारे वागतो, त्याची बुद्धी सूर्यकिरणांनी कमळाचे फूल विकसित होते त्याप्रमाणेच चांगली विकसित होते.

(०६) यौवनं धनसंपत्तिः प्रभुत्त्वम् अविवेकिता ।
एकैकमप्यनर्थाय किमु यत्र चतुष्टयम् ।।

तरुण वय, भरपूर पैसा, सत्ता आणि अविचारी स्वभाव यातील एक गोष्ट असली तरी त्यामुळे नुकसान होते. मग चारी एकत्र आल्यावर काय विचारता? तिथे सर्वनाशच संभवतो.

(०७) अंजलिस्थानि पुष्पाणि वासयन्ति करद्वयम् ।
अहो सुमनसां प्रीतिः वामदक्षिणयोः समा ।।

हाताच्या ओंजळीत फुले ठेवली तर ती दोन्ही हातांना सुगंधित करतात, त्यांना डावे उजवे नसते. असे पहा की ज्यांचे मन चांगले आहे, त्यांच्या प्रेमात डावे उजवे, कमी जास्त नसते. सुमन-फूल, सुमनस् - चांगल्या मनाचा आश्लेष असून वामदक्षिणा = डावा हात उजवा हात डावे उजवे (जवळचा दूरचा असाही श्लेष आहे.)

(०८) परोपकाराय फलन्ति वृक्षा: परोपकाराय वहन्ति नद्य: ।
परोपकाराय दुहन्ति गाव: परोपकारार्थमिदं शरीरम् ।।

परोपकारासाठीच वृक्ष आपली फळे देतात, नद्या ह्या परोपकारासाठीच वाहतात. गायी ह्या परोपकारासाठीच दूध देतात त्याचप्रमाणे आपले मानवी शरीरसुद्धा परोपकारासाठी आहे.

(०९) गुणा: कुर्वन्ति दूतत्त्वं दूरेऽपि वसतां सताम् ।
केतकीगन्धमाघ्रातुं स्वयमायान्ति षट्पदा: ।।

(माणसाच्या ठिकाणी असलेले) गुण (तो) दूर राहत असला तरी त्याचे दूत बनतात (त्याची कीर्ती दूरवर पसरवितात) (दूरवर असलेल्या) केवड्याचा सुवास घेण्यासाठी भुंगे आपणहून येतात.

(१०) उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथै: ।
न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगा: ।।

उद्योग केल्यानेच कामे पार पाडतात, मनोराज्य करून नाही. झोपलेल्या सिंहाच्या तोंडात पशू (आपणहून) शिरत नाहीत.

(११) क्षमा शस्त्रं करे यस्य दुर्जन: किं करिष्यति ।
अतृणे पतितो वह्नि: स्वयमेवोपशाम्यति ।।

ज्याच्या हातात सहनशीलता हे शस्त्र आहे त्याला दुष्ट माणूस काय करू शकणार? गवत नसलेल्या ठिकाणी पडलेला अग्नी आपणहून विझून जातो.

(१२) अपि स्वर्णमयी लङ्का न मे लक्ष्मण रोचते ।
जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ।।

लक्ष्मणा, लंका सोन्याने मढलेली असली तरी मला आवडत नाही. आई आणि ज्या देशात जन्म झाला तो देश स्वर्गाहूनही श्रेष्ठ असतो.

(१३) स्वगृहे पूज्यते मूर्ख: स्वग्रामे पूज्यते प्रभु: ।
स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते ।।

मूर्ख माणसाला त्याच्या घरात मान मिळतो (सांभाळून येतात.) श्रीमंताला त्याच्या गावात मान असतो. राजाला त्याच्या देशात मान मिळतो. विद्वान माणसाला मात्र सगळीकडे मान दिला जातो.

(१४) शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे ।
साधवो न हि सर्वत्र चन्दनं न वने वने ।।

प्रत्येक पर्वतावर माणिक सापडत नाही. प्रत्येक हत्तीच्या गंडस्थळांत मोती नसतात. (तसेच) सज्जन सर्वत्र आढळत नाहीत. चंदनाची झाडे प्रत्येक वनात नसतात.

(१५) अलसस्य कुतो विद्या अविद्यस्य कुतो धनम् ।
अधनस्य कुतो मित्रम् अमित्रस्य कुत: सुखम् ।।

आळशाला ज्ञान कोठून मिळणार? ज्ञान नसलेल्याला संपत्ती कोठून मिळणार? धन नसेल तर मित्र कसे मिळणार? मित्र नसतील तर सुख कसे मिळणार?

(१६) अपूर्व: कोऽपि कोशोऽयं विद्यते तव भारति ।
व्ययतो वृद्धिमायाति क्षयमायाति सञ्चयात् ।।

हे वाग्देवी, तुझा हा खजिना अनोखा आहे. तो खर्च केल्याने वाढतो आणि साठवून ठेवल्याने कमी होतो.

(१७) सुखार्थी चेत् त्यजेत् विद्यां विद्यार्थी चेत् त्यजेत् सुखम् ।
सुखार्थिन: कुतो विद्या कुतो विद्यार्थिन: सुखम् ।।

जर सुख हवे असेल तर विद्या मिळविणे सोडून द्यावे, जर विद्या मिळवायची असेल तर सुख सोडून द्यावे. सुखाची इच्छा करणाऱ्याला विद्या कोठून मिळणार? विद्येची इच्छा करणाऱ्याला सुख कोठून मिळणार?

(१८) तैलाद् रक्षेत् जलाद् रक्षेत् रक्षेच्छिथिलबन्धनात् ।
मूर्खहस्ते न दातव्यं एवं वदति पुस्तकम् ।।

पुस्तक म्हणते, ‘माझे तेलापासून रक्षण करा, जलापासून रक्षण करा तसेच सैलसर बांधणीपासून रक्षण करा (बांधणी सैल न होण्याची काळजी घ्या.) आणि मूर्ख माणसाच्या हातात तर मला कधीही देऊ नका.

(१९) दुर्जनः प्रियवादी च नैतद् विश्वासकारणम् ।
मधु तिष्ठति जिह्वाग्रे हृदये तु हलाहलम् ।।

प्रिय बोलणाऱ्या दुर्जनावर कधीही विश्वास ठेवू नये. कारण त्याच्या जिभेवर मध असले (म्हणजे मधासारखी मधुर वाणी असली) तरी हृदयात मात्र हलाहल विष असते (म्हणजे अंत:करण नेहमी दुष्ट विचारांनी भरलेले असते.)

(२०) यस्य नास्ति स्वयं प्रज्ञा शास्त्रं तस्य करोति किम्?
लोचनाभ्यां विहीनस्य दर्पण: किं करिष्यति?

ज्याला स्वत:ची बुद्धी नाही त्याला शास्त्राचा काय उपयोग? ज्या माणसाला डोळे नाहीत, त्याला आरसा काय करणार? (आरशाचा काय उपयोग?)

स्वयं–अध्ययनासाठी प्रश्नसंच – ३

खालील श्लोकांचे मराठीत भाषांतर करा.

(१) परोपकाराय फलन्ति वृक्षा: परोपकाराय वहन्ति नद्य: ।
परोपकाराय दुहन्ति गाव: परोपकारार्थमिदं शरीरम् ।।

(२) अलसस्य कुतो विद्या अविद्यस्य कुतो धनम् ।
अधनस्य कुतो मित्रम् अमित्रस्य कुत: सुखम् ।।

३.२.४ कथा

संस्कृत भाषेतील साहित्यात हितोपदेश व पंचतंत्र या दोन ग्रंथांमधून कथामाध्यमाने नीतिमूल्यांचा उपदेश केलेला आहे. त्याच धर्तीवर संस्कृतमधून अतिशय सरल व सोप्या भाषेत व्यावहारिक कथांच्या माध्यमातून उपदेश व बोधपर अशा काही संस्कृत कथा पुढे दिलेल्या आहेत. या कथांच्या माध्यमातून संस्कृत भाषा ही समजण्यास अतिशय सोपी आहे असा भाव प्रकट होऊन मनातील संस्कृतबद्दलची भीती दूर होण्यास मदत होईल.

(०१) अतिलोभो न कर्तव्यः ।

अस्ति हेमप्रियः नाम भूपः । सः स्वनगरीम् आगतान् मुनिवरान् समुचितेन आतिथ्येन सर्वदा सन्तोषयति स्म। नृपस्य तस्य एकः एव दोषः । धनलुब्धः सः धनेन विना सर्वं तृणाय मन्यते स्म। एकदा कश्चन मुनिः हेमप्रियस्य प्रासादम् आगच्छति। नृपतिः तस्य मुनेः सत्कारं करोति। तुष्टः मुनिः गदति, ''भूपते तव आतिथ्येन प्रसन्नः अस्मि। अभीष्टं वरं वरयस्व'' इति । लोभाविष्ट नृपतिः भाषते ''मुने, सुवर्णं मम अतीव प्रियम् । यद् यद् हस्तेन स्पृशामि तद् तद् अखिलं सुवर्णमयं भवतु इति मे इच्छा।'' ''तथास्तु'' इति मुनिः वदति निष्क्रामति च ।

मुनेः लब्धेन वरेण हेमप्रिय हर्षोत्फुल्लः भवति। कुतुहलेन स प्रथमं प्रासादस्य वातायनं स्पृशति। अहो आश्चर्यम्। तत्क्षणमेव वातायनं सुवर्णमयं भवति सूर्यस्य रश्मिभिः अधिकं प्रकाशते च । तदनन्तरं सः प्रासादस्य द्वारं स्पृशति, नैकानि पात्राणि स्पृशति। स्पर्शमात्रेण तानि सुवर्णमयानि भवन्ति

अथ सः पिपासाकुलः भवति । काचन दासी जलम् आहरति । जलपानाय यावत् सः हस्तेन जलपात्रं स्पृशति, तावदेव जलसहितं तत् पात्रं सुवर्णमयं भवति। 'हन्त! पिपासितः अपि जलपानाय न प्रभवामि। किं करोमि? ' इति चिन्ताकुलः भवति सः । एवं च बुभूक्षितस्य अपि तस्य कस्यापि पदार्थस्य भक्षणं न शक्यं भवति। सः अतीव निराशः खिन्नः च भवति ।

नृपकन्या जनकं खिन्नं पश्यति पृच्छति च ''तात, किं ते दुःखस्य कारणम् !'' महीपतिः अनवधानेन एव स्वकन्यां स्पृशति, तत्क्षणे एव नृपकन्या सुवर्णमयीं स्वकन्यां नृपः पश्यति। प्राणप्रियां कन्यां प्राणरहितां पश्यति शोकविह्वलः च भवति । 'धिक् मां लोभाविष्टम् । सुवर्णस्य लोभेन मम कन्या अपि नष्टा। न एतद् युक्तम् । मम तनयां विना न जीवामि अहम् ।' इति चिन्तयति सः ।

अकस्मात् एव सः मुनिः प्रासादम् आगच्छति, नृपं च पृच्छति ''भोः नृप, अति तुष्टः त्वम्?'' नृपः तस्य पादयोः पतति, वदति च ''मुनिवर, क्षमस्व माम् । न इच्छामि सुवर्णम् इतः परम् । मम कन्या पुनः जीवतु।'' मुनिः नृपस्य परिवर्तनं पश्यति, वरं प्रत्यावर्तयति च । तेन वरस्य प्रभावः अपि नश्यति । जीवितां कन्यां नृपः पश्यति, अतीव मुदितः च भवति।

सन्धिविग्रह : तथास्तु = तथा + अस्तु, तत्क्षणमेव = तत्क्षणम् + एव, कस्यापि = कस्य + अपि

कठीण शब्दार्थ : मन्यते स्म = मानत होता, निष्क्रामति = निघून जातो, हर्षोत्फुल्ल = आनंदित होतो, रश्मिभिः = किरणांनी, पिपासाकुलः = तहानलेला, महिपतिः = राजा, तनयां विना = मुलीशिवाय

(०२) जातस्य हि ध्रवो मृत्युः ।

प्रयागक्षेत्रे गौतमी नाम कापि नारी वसति स्म। तारुण्ये एव तस्याः पतिः दिवं गतः । तेन च पुत्रः एव तस्याः जीविताधारः। मातृभक्तः सुसंस्कृतः च स पुत्रः नित्यं मातृसुखार्थं प्रयतते स्म ।

किन्तु अकस्मादेव स पुत्रः अपि सर्पदंशेन मृतः । यदा गौतमी पुत्रस्य कलेवरं पश्यति, तदा सा दुःखस्य परां कोटिं गच्छति। शोकविह्वला सा तत्क्षणमेव बुद्धं प्रति गच्छति, वदति च ''भगवन्, मम अभागिन्याः जीविताधारं मम पुत्रमपि मृत्युः अपहरति, दुःखमेतत् सोढुं नाहं प्रभवामि। मम पुत्रस्य प्राणान् एव इच्छामि। कथयतु भवान् तदर्थं कमपि उपायम् ।''

कारुणिकः बुद्धः वदति ''अम्ब,सत्यमेव अपारं खलु तव दुःखम् । तव दुःखापहारार्थमेकः उपायः वर्तते ।'' ''कः उपायः? सत्वरं कथयतु भगवन्।'' इति हर्षेण पृच्छति सा बुद्धम। बुद्धः कथयति। ''अम्ब, मुष्टिमात्रान् तण्डुलान् तस्मात् गृहात आनय, यस्मिन गृहे न अद्यापि कोऽपि मृतः'' इति।

अतीव उत्साहेन सा गृहमेकं गच्छति। गृहस्वामिनीं पृच्छति, ''भवति अपि एतत् गृहम् अद्यापि कालेन अस्पृष्टं वर्तते?'' गृहस्वामिनी तद् आकर्णयति वदति च ''गतसंवत्सरे एव मम पतिः मृतः । कथमपि जीवामि अहम् ।'' तदा गृहमन्यत् गच्छति सा। तत्र गृहस्वामी कथयति ''गतमासे एव मम पत्नी मृता । नाहं स्पृहये जीविताय'' इति।

एवं च गृहात् गृहं सा गच्छति, भृशं भ्रमति, परं मृत्युविरहितमेकमपि गृहं सा न पश्यति, यस्मात् गृहात् तण्डुलान् इच्छति सा। एकस्मिन् गृहे अनाथाः बालकाः आसन्, अन्यस्मिन् गृहे पुत्रविहीनाः वृद्धाः । कस्मिंश्चिद् गृहे भ्रातृवियोगेन दुःखिता भगिनी आसीत्, अन्यत्र भगिनीवियोगेन खिन्नः भ्राता । एवं च प्रियपुत्रस्य जीवितार्थं गौतमी भृशम् अटति, किन्तु मृत्युविरहितं गृहं न लभते सा। निराशा सा सायंकाले बुद्धं प्रत्यागच्छति। भगवान् बुद्धः तां पृच्छति, ''अम्ब, अपि आनीताः त्वया तण्डुलाः ?'' गौतमी तं प्रणमति, अधोमुखी सा बुद्धं वदति ''भगवन्, क्षमस्व माम् । इदानीम् अधिगच्छामि अहम् एतत् शाश्वतं सत्यं यत् ' जातस्य हि ध्रुवो मृत्युः' इति गृहे गृहे मत्सदृशाः जनाः वर्तन्ते, ये प्रियजनानां मरणजं दुःखं सहन्ते । अहमपि अन्येषाम् अनाथानां बालानां माता भवामि।''

ततः प्रभृति गौतमी स्वजीवितम् अन्येषां बालकानां सुखाय अर्पयति ।

सन्धिविग्रह : सत्यमेव = सत्यम् +एव, अद्यापि = अद्य + अपि, कोऽपि = कः+ अपि, गृहमेकं = गृहम् + एकं, मृत्युविरहितमेकमपि = मृत्युविरहितम् + एकम् + अपि

कठीण शब्दार्थ : दुःखापहारार्थमेकः = दुःख दूर करण्यासाठी एक, जीविताधारः = जीवनाचा आधार, प्रयतते स्म = प्रयत्न करीत होता, कलेवरं = प्रेत, सोढुम् = सहन करणे, भृशं = पुष्कळ, खूप.

(०३) सोमदत्तस्य शिल्पकला ।

कश्चिद् ख्यातः शिल्पकारः इन्द्रदत्तः नाम अवन्तिनगर्यां प्रतिवसति स्म। सः शिल्पकलायाम् अतीवः निपुणः । न कोऽपि अन्यः शिल्पकारः तेन तुल्यः आसीत् । सोमदत्तः तस्य पुत्रः । बाल्यात् प्रभृति सः जनकस्य समीपमुपविशति स्म। जनकः पाषाणेभ्यः कथं रमणीयाः मूर्तीः निर्माति इति कुतुहलेन एकाग्रचित्तेन च सः प्रतिदिनं निरीक्षते स्म। तेन च तस्यापि शिल्पकलायां रुचिः अजायत। प्रमुदितः इन्द्रदत्तः स्वपुत्रं शिल्ककलायामशिक्षयत्।

जनकस्य मार्गदर्शनेन सोमदत्तः शिल्पकलायां प्रावीण्यमविन्दत। तेन कृताः मूर्तीः जनाः पश्यन्ति स्म, वदन्ति च, ''अहो रमणीयाः मूर्तयः एताः'' इति। जनकः इन्द्रदत्तः तु एकवारमपि न प्राशंसत्, प्रत्युत तस्य दोषानेवादर्शयत् । तेनाग्निमेऽवसरे दोषरहितां मूर्तिं निर्मातुं सः प्रायतत। किन्तु प्रतिवारं जनकः तस्यां मूर्तौ कामपि न्यूनतामेवादर्शयत् । तं न कदापि प्राशंसत् ।

तदा खिन्नः निराशः सोमदत्तः अचिन्तयत्, सर्वे जनाः मां प्रशंसन्ति, मां श्रेष्ठं शिल्पकारं मन्यन्ते । मम पिता तु मम नैपुण्येन सन्तुष्टः न भवति। इदानीं तादृशमुपायं करोमि अहं, येन मम पिता अपि माम् अवश्यं प्रशंसेत् इति।

एकदा कार्यवशात् इन्द्रदत्तः ग्रामान्तरमगच्छत् । तदा सोमदत्तः कामपि रम्यां मूर्तिम् अकरोत्, स्वमित्राय च अकथयत् ''तातस्य प्रत्यागमने त्वं मूर्तिमेनां ताताय दर्शय। मा कथय तस्मै एषा मूर्तिः मया कृता इति।''

वर्षेणैकेन इन्द्रदत्तः स्वग्रामं प्रत्यागच्छत् । तदा सोमदत्तस्य मित्रम् इन्द्रदत्ताय तां मूर्तिमदर्शयत् । इन्द्रदत्तः तां मूर्तिमपश्यत् तां च प्राशंसत् । न कामपि न्यूनतामदर्शयत् । सः सोमदत्तमवदत्,''वत्स, एषा मूर्तिः दोषरहिता परिपूर्णा च । त्वम् एतादृशीं मूर्तिं निर्मातुं प्रयतस्व'' इति।

तदा सोमदत्तः वदति, ''तात मया एव एषा मूर्तिः निर्मिता। भवान् मां कदापि न प्रशंसति, अत एव न कथयम् अहं पूर्वमेतद्'' इति।

तदा इन्द्रदत्तः अभाषत, ''वत्स, प्रशंसया जनः 'परिपूर्णः अहम् ' इति मन्यते । स्वकलायां पूर्णतासम्पादनार्थं सः नैव प्रयतते । अहं तव दोषानेव सततं अदर्शयम् येन निर्दुष्टां कलाकृतिं कर्तुं त्वं प्रायतथाः । तैः अविरतप्रयत्नैः एव त्वम् एतावत् प्रावीण्यम् अविन्दः शिल्पकलायाम् ।''

तदा व्रीडितः सोमदत्तः जनकस्य पादयोः अपतत्, क्षमां च अयाचत।

सन्धिविग्रह : समीपमुपविशति = समीपम् + उपविशति, शिल्पकलायामशिक्षयत् = शिल्पकलायाम् + अशिक्षयत्, प्रावीण्यमविन्दत = प्रावीण्यम् + अविन्दत्, न्यूनतामेवादर्शयत = न्यूनताम् + एव + अदर्शयत्, मूर्तिमेनाम् = मूर्तिम् + एनाम्, मूर्तिमपश्यत् = मूर्तिम् + अपश्यत्, दोषानेव = दोषान् + एव

कठीण शब्दार्थ : बाल्यात प्रभृति = बालपणापासून, निर्दुष्टां = दोषरहित, व्रीडितः = लज्जितः

(०४) स्वामी विवेकानन्दः ।

शिकागोनगरे विश्वधर्मसम्मेलनस्य सभामण्डपे विविधधर्मीयाः जनाः सम्मिलिताः । विविधानां धर्माचार्याणां भाषणानि भवन्ति। ततः सर्वे काषायवस्त्रधरं कंचन युवकं व्यासपीठे पश्यन्ति। सः उत्तिष्ठति। भाषणारम्भे एव तस्य ‘ मम बान्धवाः भगिन्यःच ’ इति शब्दाः जनानां कर्णेषु अमृतं सिञ्चन्तीव। यतः पाश्चात्याः ‘सभ्याः स्त्रीपुरुषाः’ इति सम्बोधनम् एवावगच्छन्ति। एतेन एव ‘ कः एषः महापुरुषः?’ इति सर्वेषां चित्ते कुतूहलम् उद्भवति ।

एषः भारतीय महापुरुषः स्वामी विवेकानन्दः एव। ‘नरेन्द्रः’ इति तस्य जन्मनाम। वङ्गदेशे दत्तकुले नरेन्द्रः जातः । विश्वनाथः तस्य जनकः, भुवनेश्वरीदेवी च तस्य जननी। अतीव वात्सल्येन पितरौ तं लालयतः पालयतः च । बाल्ये एव नरेन्द्रः कुशाग्रबुद्धिः छात्रः साहसं तस्य विशेषः । बुद्धिप्रामाण्येन सः सत्यं गवेषयति। परमहंसः श्रीरामकृष्णः तस्य आचार्यः भवति। आचार्यस्य उपदेशात् एव नरेन्द्रः भारतयात्रायै निर्गच्छति। कन्याकुमारीतीर्थे सागरसङ्गमे यस्यां शिलायां सः तपः आचरति सा एव श्रीपादशिला।

श्रीविवेकानन्दः मानवधर्मस्य महान् उपदेशकः । अहिंसा एव परमः धर्मः, शान्तिः एव मार्गः, न युद्धम् इति धर्मस्य महत् तत्त्वं सः उपदिशति। अनेके पाश्चात्याः तस्य शिष्याः भवन्ति। तेषु भगिनी निवेदिता तस्य परमा शिष्या। अज्ञेषु, पीडितेषु, दीनेषु च विवेकानन्दः अतीव स्निह्यति। नवयुगे मानवधर्मं घोषयति विश्वेऽस्मिन् भारतं प्रथयति च । सः स्वामी विवेकानन्दः भारतस्य भूषणम् एव ।

सन्धिविग्रह : एवावगच्छन्ति = एव + अवगच्छन्ति, विश्वेऽस्मिन् = विश्वे + अस्मिन्,

कठीण शब्दार्थ : काषायवस्त्रम्धरं = भगवे वस्त्र धारण करणारा (संन्यासी), उत्तिष्ठति = उभा राहतो, गवेषयति = शोध घेतो, कुशाग्र बुद्धि = तीक्ष्ण बुद्धी, स्निह्यति = प्रेम करतो)

(०५) चटका पिपीलिका च ।

एषः तडागः । एतस्य तीरे विशालः वृक्षः अस्ति। वृक्षे एका चटका वसति। सा चटका एकदा वृक्षस्य शाखायाम् उपविशति। तदा एका पिपीलिका वृक्षस्य शाखायाः जलाशये पतति। चटका पिपीलिकां पश्यति। तदा चटकायाः हृदयं करुणया द्रवति । सा चिन्तयति। अकस्मात् सा जले पर्णानि क्षिपति। ततः एकं पर्णं पिपीलिकायाः समीपं पतति। सा तत् पर्णं आश्रयति। जलस्य तरङ्गाः तत् पर्णं जलाशयस्य तीरम् आनयन्ति। मरणात् मुक्ता पिपीलिका चटकायै धन्यवादान् यच्छति।

अथ एकदा सा चटका वृक्षस्य शाखायाम् उपविशति। तदा क्रूरः व्याधः तडागस्य तीरम् आगच्छति चटकां च पश्यति। चटकायाः वधाय सः तूणीरात् बाणम् उद्धरति। यदा सः बाणस्य प्रयोगाय सिद्धः भवति तदा पिपीलिका व्याधं दशति। दंशस्य वेदनया व्याधस्य बाणः लक्ष्यात् भ्रश्यति। ततः चटका शाखायाः उत्पतति अन्यत्र च गच्छति। कृतज्ञा पिपीलिका चटकायाः प्राणान् रक्षति।

कठीण शब्दार्थ : शाखायाम् = झाडाच्या फांदीवर, आश्रयति = आश्रय घेतो, व्याधः = शिकारी, तडागस्य = तळ्याच्या, तूणीरात् = बाण ठेवण्याच्या भात्यातून.

(०६) वानरस्य चातुर्यम् ।

एकस्मिन् नदीतटे जम्बूवृक्षः वर्तते । तस्मिन् कः अपि वानरः वसति। स नित्यं मधुराणि जम्बूफलानि खादति। तस्यां नद्याम् एकः मकरः अपि वसति । सः वानरस्य मित्रं विद्यते । वानरः मकरायापि मधुराणि जम्बूफलानि यच्छति। क्वचित् मकरः अपि कपिं विहारार्थं पृष्ठे उपवेश्य नद्यां तरति स्म।

एकदा मकरः स्वभार्यायै जम्बुफलानि अनयत् । मकरस्य जाया फलानि अखादत् । ततः सा अचिन्तयत् ‘‘यः प्रतिदिनं ईदृश्यानि मधुराणि फलानि भक्षयति तस्य हृदयं कीदृशं मधुरं भवेत्। अहं तत् केन प्रकारेण लभे’’ इति।

सा मकरम् अवदत्, ‘‘अहं तस्य कपेः हृदयम् इच्छामि।’’ ततः मकरः नद्याः तटम् अगच्छत् । कपिः तस्मै फलानि अयच्छत्। तदनन्तरं कपिः मकरस्य पृष्ठे उपाविशत् । यथापूर्वं तौ विहारार्थम् अगच्छताम् । कपिना सह सः नद्याः जले अतरत् । नद्याः मध्ये सः कपिम् अगदत्, ‘‘मम पत्नी तव हृदयम् इच्छति। चतुरः प्लवङ्गमः शीघ्रम् अभाषत, ‘‘मम हृदयं तु अहं वृक्षे एव अमुञ्चम् । तदानेतुं मां पुनरपि नदीतटं नय।’’ मूर्खः मकरः तथा आचरत् ।

तदा शाखामृगः सत्वरं वृक्षस्य विटपम् आरोहत् अभाषत च, ‘‘मूर्ख, अपि हृदयं शरीरात् पृथक् वर्तते। अद्यावयोः मैत्री समाप्तिम् अगच्छत् ।’’

कठीण शब्दार्थ : जम्बूवृक्षः = जांभळाचे झाड, मकरः = मगर, जम्बूफलानि = जांभळे, विहारार्थम् = फिरण्यासाठी, प्लवङ्गमः = वानर, विटपम् = फांदीवर, कपिना = वानराने, शाखामृगः = वानर

(०७) प्रत्युत्पन्नमतिः चतुरकः ।

आसीत् माधवपुरं नाम किंचन नगरम् । कलाप्रियः नाम भूपतिः तत्र शासनं करोति स्म। यद्यपि सर्वाः कलाः तस्य प्रियाः तथापि चित्रकलायां विशेषानुरागः विविधदेशेभ्यः कुशलचित्रकाराः तमागच्छन्ति स्म। राजा तेभ्यः विपुलं घनं यच्छति स्म। राज्ञः गुणज्ञतया उदारतया च ते अतीव सन्तुष्टाः भवन्ति स्म।

धनलुब्धः नाम तस्य राज्ञः कश्चन द्वारपालः अवर्तत। सः मनसि अकरोत् अहमेव चित्रकारानेतान् राजसभायां प्रवेशयामि। तेनैव ते विपुलं धनं विन्दन्ते। तर्हि मयापि तेभ्यः धनं लब्धव्यम् ’ इति । एवं विचिन्त्य स सर्वान् चित्रकारान् पारितोषिकस्यार्धं याचितुं प्रारभत। केचन स्वेच्छया, केचन अनिच्छया तस्मै धनं यच्छन्ति स्म, यतः तस्य अनुज्ञां विना राजदर्शनमशक्यमेवासीत्।

एकदा चतुरकः नाम कश्चित् अद्वितीयः चित्रकारः तं पार्थिवं द्रष्टुमैच्छत्। धनलुब्धः तमभणत् – ‘ यदि पारितोषिकस्यार्धं मह्यं यच्छेः तर्हि एव त्वां राजानं दर्शयामि’ इति । कंचित्कालं विचार्य चतुरकः तमन्वमन्यत ।

चतुरकस्य अतुलनीयं चित्रं दृष्ट्वा प्रसन्नः भूपः अब्रवीत् – ‘‘अहो नयनानन्दकरं ते चित्रम् । किं पारितोषिकं कामयसे ?’’ इति । चतुरकः अगदत् – ‘‘राजन्, दशकशाघातान् पारितोषिकत्वेन इच्छामि’’ इति । चित्रकारस्य विलक्षणया प्रार्थनया चकिताः सर्वे सभाजना विस्मिताः नृपः अपि । चित्रकारः वारंवारं तदेव पारितोषिकमयाचत। अतः नृपः सेवकं कशामानेतुमादिशत् । अचिरादेव सः सेवकः कशामादाय चित्रकारं ताडयितुं सिद्धः जातः । तदा चतुरकः ‘‘तिष्ठतु अत्रभवान् ’ इत्युक्ता सभातः निर्गतः द्वारपालेन सह प्रत्यागत्य च नृपायाकथयत् ‘‘देव, मम पारितोषिकस्यार्धमेतेन याचितं मया प्रतिश्रुतं च । अतः पञ्च प्रहाराः मह्यं दातव्याः, पञ्च एतस्मै इति।

द्वारपालस्य शाठ्यं ज्ञात्वा राजा तमदण्डयत्, चतुरकाय च प्रभूतं धनमयच्छत् ।

सन्धिविग्रह : मयापि = मया + अपि, द्रष्टुमैच्छत् = द्रष्टुम् + ऐच्छत्, पारितोषिकस्यार्धं = पारितोषिकस्य + अर्धम्, तमन्वमन्यत= तम् +अनु+ अमन्यत, पारितोषिकमयाचत = पारितोषिकम् + अयाचत, कशामानेतुमादिशत् = कशाम् + आनेतुम् + आदिशत्, अचिरादेव = अचिरात् + एव, धनमयच्छत् = धनम् + अयच्छत्, नृपायाकथयत् = नृपाय + अकथयत्

कठीण शब्दार्थ : पारितोषिकस्यार्धं = पारितोषिकाचा अर्धा भाग, द्रष्टुमैच्छत् = भेटण्याची इच्छा करणारा, दृष्ट्वा = पाहून, अचिरादेव = ताबडतोब, इत्युक्त्वा = असे म्हणून

(०८) गतानुगतिको लोकः ।

आसीदेकः भिक्षुकः । सः प्रतिदिनं भिक्षाटनमाचरति स्म। तस्य समीपे केवलमेकं ताम्रभाजनमासीत् । कदाचित् काचित् गृहिणी आगच्छति अन्नं च यच्छति। अन्यस्मात् गृहात् कदाचित् सः वस्त्रमपि लभते। सः अन्नं भक्षयति वस्त्रपरिधानं च करोति। एवमेव यथाकथंचित् गच्छति काले एकदा एका बालिका तस्मै एकं नाणकमयच्छत् । सः तन्नाणकं ताम्रभाजने अस्थापयत् । तदनन्तरं यदा यदा सः नाणकं प्राप्नोत् तदा सः तत् ताम्रपात्रे एव स्थापितवान्। कतिपयैः दिनैः ताम्रभाजनं नाणकैः पूर्णमासीत् । अधुना द्रव्येणानेन काशीयात्रां करोमि इति चिन्तयित्वा भिक्षुकः काशीं गतः।

गङ्गास्नानं कृत्वा विश्वेश्वरदर्शनं कर्तव्यम् इति विचार्यं सः गङ्गातटमयात् । ताम्रभाजनं तटे स्थापयित्वा सः स्नानार्थमगच्छत् । परं सः मनस्यकरोत् ‘कदाचित् चौरः मम ताम्रभाजनं चोरयेत् । अतः वालुकायां गर्तं खनित्वा तत्र ताम्रपात्रं स्थापयामि । ‘‘परं वालुका सर्वत्र समाना वर्तते। ताम्रभाजनं कुत्र वर्तते इति कथमहं जानामि? ’ एवं विचिन्त्य एकं पाषाणखण्डं तत्रास्थापयत् । कोऽपि पथिक आगच्छत् । वालुकामये प्रदेशे किमर्थमिदं व्यवधानम्, कदाचित् कः अपि पतेत् ’ एतादृश्या सुबुद्ध्या सः पाषाणखण्डं सुदूरम् अक्षिपत् । तद्दृष्ट्वा भिक्षुकः तत्र वृक्षशाखामस्थापयत्

। यदृच्छयागता गौ: शाखापत्राणि खादन्ती अन्यत्रागच्छत् । अन्तत: भिक्षुक: गर्तस्योपरि एकं शिवलिङ्गं कृत्वा निश्चिन्ततया नदीजलं प्राविशत्।

विश्वेश्वरदर्शनार्थमागत: कश्चित् भक्त: गङ्गास्थानार्थमागत: गङ्गातटम् । तेन दृष्टं यत् एक: मनुष्य: स्नानमाचरति, तटे च शिवलिङ्गं वर्तते। 'कदाचित् काशीमध्ये शिवलिङ्गं कृत्वा स्नामाचरणीयम् ' एतादृशी प्रथा भवेत्' इति मनसि कृत्वा तेन प्रथमं शिवलिङ्गं कृतम्, अनन्तरं स: स्नानार्थं गत: ।

एवमेव ये जना: आगता: तै: सर्वै: शिवलिङ्गं कृतम् अनन्तरं च स्नानं कृतम् । प्रत्येकं शिवलिङ्गं निर्माति स्म स्नानार्थं च गच्छति स्म।

यदा भिक्षुक: स्नानं कृत्वा प्रत्यागच्छत् तदा तीरे सर्वत्र शिवलिङ्गानि अपश्यत्। स: एकं शिवलिङ्गं भग्नमकरोत् अध: गर्तमकरोत् च । परं तत्र तस्य धनपात्रं नासीत् । द्वित्राणि शिवलिङ्गानि तेन भग्नानि । परं तत्र स धनभाजनं निजं न प्राप्नोत् । अन्ते दु:खित: भिक्षुक: अवदत् -

गतानुगतिको लोको न लोक: पारमार्थिक: ।
गङ्गासैकतलिङ्गेन गतं मे ताम्रभाजनम् ।।

सन्धिविग्रह : आसीदेक: = आसीत् + एक:, भिक्षाटनमाचरति = भिक्षाटनम् + आचरति, ताम्रभाजनमासीत् = ताम्रभाजनम् + आसीत्, वस्त्रमपि = वस्त्रम् + अपि, तन्नाणकम् = तत् + नाणकम्, पूर्णमासीत् = पूर्णम् + आसीत्, गङ्गातटमयात् = गङ्गातटम् +अयात्, स्नानार्थमगच्छत् = स्नानार्थम् + अगच्छत्, मनस्यकरोत् = मनसि + अकरोत्, वृक्षशाखामस्थापयत् = वृक्षशाखाम् + अस्थापयत्, गर्तस्योपरि = गर्तस्य + उपरि, भग्नमकरोत् = भग्नम् + अकरोत्,गर्तमकरोत् = गर्तम् + अकरोत्

कठीण शब्दार्थ : ताम्रभाजनं = तांब्याचे भांडे, मनस्यकरोत् = मनात विचार केला, गर्तस्योपरि = खड्ड्याच्या वर, निर्माति = निर्माण करतो, व्यवधानम् = अडथळा, भग्नमकरोत् = नष्ट केले, गङ्गासैकतलिङ्गेन = गंगेतील वाळूच्या लिंगाने.

(०९) श्रमे लक्ष्मी: प्रतिष्ठिता।

आसीदेको सततोद्यमशील: सुसंपन्नो लब्धशिक्षश्च कृषीवल: तस्य त्रयोऽपि पुत्रा मूढालसा विवेकरहिताश्चासन् । बहुप्रयत्नै: समुपदिष्टा अपि ते पितुर्वचो नैवामन्यन्त। तेन स कृषीवल: सततमेव दु:खितो विषण्णश्चिन्ताकुलश्चासीत्।

अथ गच्छता कालेन स कृषीवल: पञ्चत्वमगच्छत् । ततो दायाद्यलुब्धै: पुत्रै: यावत् पितृलिखिता पुस्तिका उद्घाटिता, तावदेव ते तत्र एकं श्लोकमविन्दन् -

छायायां खलु गन्तव्यमागन्तव्यं तथैव च ।
मिष्टान्नभक्षणं कार्यं ततो लक्ष्मीर्मिलिष्यति।।

तत: पित्राऽतपगमनं निषिद्धमिति मत्वा तै: पुत्रै: क्षेत्रगमनमपि परित्यक्तम् तथैव प्राकृतभोजनं विहाय तै: प्रतिदिनं मिष्टान्नभोजनमारब्धम् । तेषामेभिरुपहसनीयैराचारै: पित्रार्जितं धनं विनष्टं, शीघ्रमेव च दरिद्रता समुपस्थिता। अत एव परमचिन्तातुरा: समभवन् सर्वे पुत्रा: ।

अथ पितुर्वार्षिकश्राद्धावसरे पुत्रा: पुरोहितमपृच्छन् - ''भवानाशीर्वादे कथयति 'लक्ष्मीवान् भव' इति। अस्माकं पित्रापि तथैव लिखितं पुस्तिकायां, किन्तु न दृश्यते लक्ष्मी: । यासीत् सापि गता। किमत्र कारणम्? कृपया कथयत्वत्रभवान्'' इति। पुरोहितोऽब्रवीत् - 'दर्शयत तावत् पितृलिखितां पुस्तिकाम् ' इति। पुत्रा: पुरोहिताय समर्पितवन्त: चीनांशुके परिवेष्टितां गन्धमाल्यादिभिश्च पूजितां तां पुस्तिकाम् ।

तदनुसारं च यद् यद् तैराचरितं तदपि तेऽकथयन्।

पुस्तिकापठनान्तरं पुरोहित: सोपहासमवदत् - 'अयि पुत्रा: पित्रा तु युक्तं लिखितं, किन्तु शब्दमात्रग्राहिभिर्युष्माभिर्विपरीतमेवाचरितम्। अनेन पूजनमात्रेण कथमागच्छेल्लक्ष्मी:?' ' तर्हि कोऽभिप्रायोस्य?' इति सादरमपृच्छन् सर्वे पुत्रा: । पुरोहितेनोक्तम् - 'छायायां खलु गन्तव्यम्' इत्यस्याशय: 'सूर्योदयात्पूर्वं क्षेत्रं प्रति गन्तव्यम् ' इति। 'आगन्तव्यं तथैव च' इत्यस्याशय: 'सूर्येऽस्तमिते प्रत्यागन्तव्यम्' इति। एवं भूरिश्रमै: प्राकृतान्नमपि स्वादयुक्तं मिष्टं च भवेत्। इत्थं च आचरेत् स लक्ष्मीवान् भवेदित्यत्र नैव शङ्कालेश: ' इति।

द्वितीये वर्षे पुरोहितकथनानुसारं सपुत्रकलत्रैः तैः सर्वैः भूरिश्रमाः कृताः क्षेत्रे । चतुर्भिरेव मासैर्लक्ष्मीः समधिगता धान्यरुपेण। ग्रामवासिभिः पृष्टे सति पुत्रैः कथितम् –

दरिद्रता समायाता स्वालस्यस्यैव कारणात्।
श्रीमन्तो हि श्रमाज्जाताः श्रमे लक्ष्मीः प्रतिष्ठिता।।

सन्धिविग्रह : सततोद्यमशीलः = सतत + उद्यमशीलः, नैवामन्यन्त = नैव + अमन्यन्त, पितुर्वचो = पितुः + वचः, पञ्चत्वमगच्छत् = पंचत्वम् + अगच्छत्, पित्राऽतपगमनं = पित्रा + आतपगमनं, पुरोहितोऽब्रवीत् = पुरोहितः + अब्रवीत्, तैराचरितं = तैः + आचरितम्, कथमागच्छेल्लक्ष्मीः = कथम् + आगच्छेत् + लक्ष्मीः, चतुर्भिरेव = चतुर्भिः + एव, स्वालस्यस्यैव = स्व + आलस्यस्य + एव, श्रमाज्जाताः = श्रमात् + जाताः

कठीण शब्दार्थ : पञ्चत्वमगच्छत् = मृत्यू पावला, आतपगमनम् = उन्हामध्ये जाणे, पित्रार्जितम् = वडिलांनी मिळविलेली, पुरोहित = ब्राह्मण, पुस्तिका = वही, चिनांशुकेपरिवेष्टिताम् = रेशमी कपड्यात बांधलेली, सोपहासम् = उपहासाने, चतुर्भिरेव मासैः = चारच महिन्यांनी, ग्रामवासिभिः = गावातील लोकांनी.

(१०) फटाटोपो भयङ्करः।

कस्मिंश्चिन्नगरे कोऽपि दंशशीलः कृष्णसर्पः न्यवसत् । सः अकारणमेव जनान् दशति स्म। एकदा वीथ्यां क्रीडत्सु बालेष्वन्यतमं सोऽकस्मादेवादशत्। कदाचित् कृषीवलस्य कस्यापि पुष्टाङ्गः वृषभः तेन दष्टः हतः च । एवं च देवालयं गच्छन्ती वृद्धा, पण्डितः युवा, गानकलायां रतः गायकः एतादृशाः विविधाः जनाः तेन दृष्टाः। कृष्णसर्पस्य एतादृशेनोपद्रवेण भीताः सर्वे जनाः, किन्तु न कोऽपि तं हन्तुमशक्नोत्।

अथैकदा नारदमुनिस्तस्य नगरस्य समीपतोऽगच्छत् तदा अकस्मात स कृष्णसर्पः नारदं दंष्टुं तत्पुरत उपस्थितः । तदा नारदमुनिस्तमब्रवीत् ,''रे मूढ, किमर्थमयं दंशोद्योगः? जन्मान्तरकृतानां पापकर्मणां फलमेषा सर्पयोनिः । जन्मन्यस्मिन्नपि परपीडादायको भूत्वा कथं लप्स्यसे सद्गतिम् ?'' इति। 'सत्यमेतत् किं करणीयमधुना मया? ' इति विचिन्त्यापृच्छत् सः, ''मुने,परां गतिं प्राप्तुमिच्छामि । केनोपायेनैतद् भवितुमर्हति ?'' इति तस्यैतद् वचो निशम्य मुनिराह 'शृणु, अद्यारभ्य दंशं कृत्वा मा पीडय कमपि। एवं दुष्कर्मणां परित्यागेन सद्गतिं प्राप्स्यसि' इति। 'एवमेवाचरामि' इति सर्पः प्रत्यशृणोत् नारदाय।

वर्षादेकस्मादनन्तरं स्वच्छन्दं भ्रमन् नारदमुनिः पुनः समागतस्तदेव नगरम् । तदादिदुर्बलं किञ्चिदपि चलितुमसमर्थं तं कृष्णसर्पं दृष्ट्वा मुनिर्विस्मितः । तस्य रुधिरक्लिन्नं सर्वाङ्गं विलोक्य सानुक्रोशमदन्मुनिः'कथमीदृशी दुरवस्था जाता तव? ' इति। तदा क्षीणवाचाब्रूत सः ' भगवत उपदेशफलमेतद् 'कस्यापि दंशं मा कुरु' इति भवदाज्ञामनुसृत्य मया दंशः त्यक्तः। दंशत्यागादपगतभया बालका अपि मिय पाषाणखण्डान् क्षिपन्ति। आहारमपि न लभे। तेन अतिदुर्बलोऽहमिमां दुर्दशां वहाम्यधुना'' इति।

एतदाकर्ण्य विहस्य नारदमुनिनोक्तम्, ''मूढोऽसि। केवलं 'दंशोद्योगं परित्यज' इति कथितं मया । ' फूत्कारमपि मा कुरु' इति नोक्तम्। आत्मसंरक्षणार्थं फटाटोप आवश्यक एव । उक्तं च –

निर्विषेणापि सर्पेण, कर्तव्या महती फणा।
विषमस्तु न वाप्यस्तु फटाटोपो भयङ्करः ।।

हिंसा तु त्याज्या एव। किन्तु स्वतेजः प्रकटनं नाम न हिंसा । त्वया तु हिंसया सह तेजःप्रकटनमपि त्यक्तम्। तेजोहीनाऽमर्षशून्यश्च नादरार्हः कदापि। अतः स्वधामप्रकटनमावश्यकमेव सर्वेषाम् । एवं कृते न कोऽपि क्षमेत त्वां पीडयितुम्। तथाहि –

''बलवानपि निस्तेजाः कस्य नाभिभवास्पदम्।
निःशङ्कं दीयते लोके, पश्य भस्मचये पदम् ।।''

तच्छ्रुत्वा तथैवाचरत् कृष्णसर्पः । तेन न कोऽपि तमपीडयत् ।

सन्धिविग्रह : कस्मिंश्चिन्नगरे = कस्मिश्चित् + नगरे, बालेष्वन्यतमं = बालेषु + अन्यतमम्, हन्तुमक्षक्नोत् = हन्तुम् + अशक्नोत्, नारदमुनिस्तस्य = नारदमुनिः + तस्य, जन्मन्यस्मिन्नपि = जन्मनि + अस्मिन् = अपि, मुनिराह = मुनिः + आह, सानुक्रोशमवदन्मुनिः = स+ अनुक्रोशम् + अवदत् + मुनिः, वाप्यस्तु = वा + अपि + अस्तु, नादरार्हः न + आदरार्हः, तथैवाचरत् = तथा+ एव + आचरत

कठीण शब्दार्थ : उपद्रवेन = त्रासाने, भीता: = भयभीत झालेले, मुनिराह = मुनी म्हणाले, सानुक्रोशं - दयेने, क्षीणवाचाब्रूत = अतिशय खोल आवाजाने म्हणाला, निर्विषेन= विषरहित, खटाटोप: = फणा उभारणे,भयङ्कर = भीतिदायक.

स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ४

खालील परिच्छेदांचे मराठीत भाषांतर करा.

(१) अथ स: पिपासाकुल: भवति । काचन दासी जलम् आहरति । जलपानाय यावत् स: हस्तेन जलपात्रं स्पृशति, तावदेव जलसहितं तत् पात्रं सुवर्णमयं भवति। 'हन्त! पिपासित: अपि जलपानाय न प्रभवामि। किं करोमि?' इति चिन्ताकुल: भवति स: ।

(२) यदा स: बाणस्य प्रयोगाय सिद्ध: भवति तदा पिपीलिका व्याधं दशति। दंशस्य वेदनया व्याधस्य बाण: लक्ष्यात् भ्रश्यति। तत: चटका शाखाया: उत्पतति अन्यत्र च गच्छति। कृतज्ञा पिपीलिका चटकाया: प्राणान् रक्षति।

३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

हेमन्	=	सुवर्ण
ध्रुव:	=	निश्चित
व्रीडित:	=	लज्जित
वापी	=	कुप, विहीर
ते कृष्णमुखं भवतु	=	तुझी अपकीर्ती होवो
लघुचेतस	=	कोत्या मनाचा, संकुचित वृत्तीचा
नीतीनिपुण	=	नीतिशास्त्र माहीत असलेला
फटाटोप:	=	फणा उभारणे
शकटान्	=	बैलगाड्या
कंधरा	=	गुहा
सुमंगला	=	मांगल्याचे प्रतीक असलेले
सुमनसाम्	=	चांगल्या मनाचा
उद्यम	=	उद्योग

३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं-अध्ययन प्रश्न - १

(१) पाच प्राणी - व्याघ्र:, सिंह:, गज:, भल्लुक:, उष्ट्र:।

(२) पाच पक्षी - काक:, मयूर: , चटका:, पिक: , बक: ।

(३) पाच फळे - आम्रम्, कदली, जम्बूफलम, मधुकर्कटी, द्राक्षा: ।

(४) पाच भाज्या - वृन्ताकम्, वार्तकि, भिण्डि:, आलुकम्, कारवेल्लम्।

स्वयं-अध्ययन प्रश्न - २

योग्य जोड्या जुळवा

(१) नासिका - नाक

(२) स्कंध: - खांदा

(३) मातुल: - मामा

(४) पितृव्य: - चुलता

(५) कपोल: - गाल

स्वयं-अध्ययन प्रश्न - ३

(१) परोपकारासाठीच वृक्ष आपली फळे देतात. नद्या ह्या परोपकारासाठीच वाहतात. गायी ह्या परोपकारासाठीच दूध देतात त्याचप्रमाणे आपले मानवी शरीरसुद्धा परोपकारासाठी आहे.

(२) आळशाला ज्ञान कोठून मिळणार? ज्ञान नसलेल्याला संपत्ती कोठून मिळणार? धन नसेल तर मित्र कसे मिळणार? मित्र नसतील तर सुख कसे मिळणार?

स्वयं-अध्ययन प्रश्न - ४

(१) नंतर तो (राजा) तहानलेला होतो. कुणी एक दासी पाणी आणून देते. पाणी घेण्यासाठी जेव्हा तो हाताने पाण्याच्या पात्रास स्पर्श करतो, तेवढ्यात पाण्यासह ते पात्र सोन्याचे होते. ओहो! तहानलेला असूनसुद्धा पाणी पिण्यासाठी तो समर्थ होत नाही. काय करावे असा तो चिंताग्रस्त होतो. (हाताचा स्पर्श होताच पाण्याचा ग्लास व त्यातील पाणी सर्व सोन्याचे होऊन जाते.)

(२) जेव्हा तो बाणाचा प्रयोग करण्यास सिद्ध होतो, तेव्हा मुंगी त्या शिकाऱ्याच्या पायाला दंश करते, दंशाच्या वेदनेने शिकाऱ्याचा बाण त्याच्या लक्ष्यापासून चुकतो. त्यानंतर चिमणी त्या फांदीवरून उडून दुसरीकडे जाते. कृतज्ञ अशी मुंगी चिमणीचे प्राण रक्षण करते.

३.५ सारांश

संस्कृत भाषा ही भारतीय संस्कृतीचा पाया आहे. सर्व भारतीय भाषांची ती जननी आहे. तेव्हा इतर भाषांची ज्ञानासाठीही संस्कृतची आवश्यकता आहे. कारण संस्कृतचा शब्दसंग्रह सतर भाषांसाठी अत्यंत उपयोगी आहे. त्यासाठी व्यावहारिक वस्तू व पदार्थांना प्रतिसंस्कृत शब्द काय आहेत ते सांगून त्यांचा उपयोग करून अतिशय सोप्या व सरळ भाषेत कथा व श्लोकांच्या माध्यमातून संस्कृत भाषा अत्यंत सोपी असून ती सर्वांची आहे व ती समजेल अशाप्रकारे या प्रकरणात स्पष्ट करून सांगितली आहे. त्यामुळे प्रत्येकाच्या मनातील संस्कृतबद्दलचे भय निश्चितच दूर होईल.

३.६ सरावासाठी स्वाध्याय

(१) व्यवहारात संस्कृत बोलण्यासाठी आवश्यक अशा मराठी-संस्कृत शब्दांचा संग्रह लिहा

(२) कथांचे मराठीत भाषांतर करा.

(३) श्लोक पाठ करून त्यांचा मराठीत अर्थ लिहा.

(४) प्राणी, पक्षी, फळे, भाज्या यांना संस्कृतमधून प्रतिशब्द लिहा.

(५) शालासाहित्याला संस्कृत शब्द लिहा.

३.७ क्षेत्रीय कार्य

(१) आपल्या परिसरातील संस्कृत संभाषण करणाऱ्यांची मुलाखत घेऊन संस्कृत बोलण्यासाठी काय उपाय केले ते समजून घेऊन स्वत: संस्कृतमधून बोलण्यासाठी काय नियोजन कराल ते लिहा.

(२) व्यवहारातील नित्याच्या उपयोगासाठी मराठीतील ५० वाक्यांचा संस्कृत अनुवाद करण्याचा प्रयत्न करा.

३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) सञ्जीवः, बोधकथा, संस्कृतभारती, नवदेहली

(२) शरत् मित्रः, पुराणकथांमृतम्, संस्कृतभारती, नवदेहली

(३) मोहरीर ल. का., संस्कृत कथा, सुरभी प्रकाशन, औरंगाबाद

(४) भाटे सरोजा, सुभाषितशतकम्, पुणे विद्यापीठ, पुणे

(५) श्रोत्रीय वि.कृ., संस्कृत सुभाषित सरिता, नितीन प्रकाशन, पुणे

घटक ४ : संस्कृत वाङ्मय परिचय

अनुक्रमणिका

४.० उद्दिष्टे
४.१ प्रास्ताविक
४.२ विषय-विवेचन
 ४.२.१ संस्कृत भाषेचे आध्यात्मिक महत्त्व
 ४.२.२ संस्कृत भाषेचे वैज्ञानिक महत्त्व
 ४.२.३ संस्कृत व्याकरणकार व महाकवी यांचा परिचय
 ४.२.४ वेदोपनिषदे, रामायण व महाभारत यांचा परिचय
४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
४.५ सारांश
४.६ सरावासाठी स्वाध्याय
४.७ क्षेत्रीय कार्य
४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

४.० उद्दिष्टे

(१) विद्यार्थी आत्मोद्धाराकरिता आवश्यक अशा तत्त्वज्ञानासाठी संस्कृत ग्रंथांचे महत्त्व जाणून घेईल.
(२) विद्यार्थी प्राचीन संस्कृत ग्रंथांच्या आधारे आजचे विज्ञान स्पष्ट करेल.
(३) विद्यार्थी संस्कृत व्याकरणकार पाणिनींचा परिचय देईल.
(४) विद्यार्थी महाकवींचा व त्यांच्या काव्यकृतींचा परिचय देईल.
(५) विद्यार्थी रामायण व महाभारताविषयी थोडक्यात माहिती देईल.

४.१ प्रास्ताविक

'संस्कृतं संस्कृतेर्मूलम् ' अर्थात संस्कृत भाषा व त्यातील वाङ्मय हे भारतीय संस्कृतीचे मूळ आहे, याबद्दल मतभेद नाहीत. ज्या अभारतीय विद्वानांना भारतीय संस्कृतीचे मौलिक ज्ञान मिळविण्याची इच्छा असते, ते संस्कृत भाषा व संस्कृत विद्या यांचे अध्ययन प्रामुख्याने करीत असतात. उत्तमोत्तम गद्य पद्य काव्ये, नाटके, चम्पू एवढेच संस्कृत वाङ्मय नसून धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थांसंबंधी अनेक शास्त्रे व दर्शने यांचा फार मोठा ग्रंथविस्तार संस्कृत वाङ्मयात आहे. प्राचीन काळातील शेकडो विद्वानांनी संस्कृत भाषेत भरपूर शास्त्रीय वाङ्मय लिहिलेले आहे. जगाच्या वाङ्मयीन इतिहासात त्याचे फार मोठे स्थान आहे. या वाङ्मयात प्रतिपादन केलेल्या काही विषयांची ओझरती ओळख येथे करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या भागाच्या अध्ययनाने संस्कृत

विद्येच्या व्यापकतेची व सखोलतेची किंचित जाणीव होऊन भावी आयुष्यात संस्कृतविषयी अधिकाधिक अध्ययन व संशोधन करण्याची प्रेरणा विद्यार्थिवर्गास मिळेल अशी अपेक्षा आहे. आपण नेहमी माझ्या देशातील समृद्ध व विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे' असे वाक्य उच्चारीत असतो. तेव्हा संस्कृत वाङ्मयामध्ये प्रतिबिंबित झालेल्या सांस्कृतिक वारशासंबंधी जे सामान्य ज्ञान येथे वाङ्मय परिचयाच्या रूपात संक्षेपाने दिलेले आहे. त्याच्या अध्ययनाने विद्यार्थ्यांना आपल्या परंपरांची व वाङ्मयाची ओळख होऊन तिचा सार्थ अभिमान वाटू लागेल अशी अपेक्षा आहे.

४.२ विषय–विवेचन

४.२.१ संस्कृत भाषेचे आध्यात्मिक महत्त्व

मानवी जीवनाचे सार्थक हे प्राप्त केलेल्या आत्मज्ञानात आहे. 'ज्ञानादेवतु कैवल्यम् इति शास्त्रेषु दिण्डिमा'' याचा अर्थ मोराच्या अंगावरील पिसांवर अनेक डोळे असतात पण त्यांनी दिसत नाही. म्हणजे प्रत्यक्ष नेत्रद्वारा जे बाह्य जगाचे ज्ञान मोराला होते ते पिसाऱ्यावरील डोळ्यांनी होत नाही. तसे आत्मज्ञानानेच माणसाला मोक्ष मिळतो. इतर प्रापंचिक बाह्य जगतातील भौतिक ज्ञानाने किंवा पद, प्रतिष्ठा व पैशाने आत्मज्ञान होत नाही तर गुरुकृपेने प्राप्त झालेल्या तत्त्वज्ञानानेच मोक्षप्राप्ती होते व ते तत्त्वज्ञान श्रीगुरू हे गीता, उपनिषद्, ब्रह्मसूत्रादि संस्कृत ग्रंथांच्या माध्यमाने आपल्या शिष्यास देतात व शिष्याला जन्ममृत्यूच्या चक्रव्यूहातून मुक्त करतात. पण अज्ञाननिर्मिती कशी होते व त्यानंतर ज्ञान कसे होते ते पाहू.

ब्रह्मापासून मायेने जड व दु:खरूपजगत् निर्माण होते व मायेमुळेच जिवाच्या ठिकाणी अज्ञान निर्मिती होते. त्यामुळेच या दु:खरूप जगताचा प्रत्यय येतो. या मायावादाचे वर्णन गीता व उपनिषदांतूनसुद्धा आलेले आहे. जगद्गुरू शंकराचार्यांनी तिचा विस्तार केला एवढेच. अमृतानुभवातसुद्धा रज्जुसर्पादि दृष्टांतांनी जगत् हे भ्रम आहे असे ज्ञानपूर्वकालीन अज्ञान मानलेले दिसते.

मोडोनि मायाकुंजरु ।। अमृ. २.३

अविद्येचे आडवे । भुंजीत जीवपणाचे भवे ।। अमृ. २.२

आदि प्रमाणांवरून श्रीज्ञानदेवही श्रीशंकराचार्यांप्रमाणे मायावादी आहेत असे सिद्ध होते, परंतु दृश्यविश्व हे आत्मचैतन्याचेच स्वरूप आहे.

म्हणौनि जग असकी । वस्तुप्रभा ।। अमृ. ७.२८९

असा विचारसुद्धा अमृतानुभवात वेळोवेळी मांडलेला दिसून येतो. दृश्य विश्वाने आत्मतत्त्व झाकलेले नसून उलट ते प्रकटच झालेले आहे. जसे सोन्याच्या अलंकाराने सोने, रत्नाच्या तेजाने रत्न, पाण्याच्या तरंगाने पाणी हे झाकत नसून अधिक शोभून दिसतात. अशाप्रकारे श्रीज्ञानदेवांनी विश्व हे आत्म्याची लीला अर्थात चैतन्याचा विलास आहे असा चिद्‌विलासवाद मांडलेला दिसून येतो. श्रीज्ञानदेवांनी अशी विरोधी विधाने अमृतानुभवात दिलेली आढळतात. या मागचा दृष्टिकोन समजून घेतला असता असे दिसते की अमृतानुभवात ज्ञानोत्तर स्थिती असल्याने त्या भूमिकेत ज्ञानीपुरुषाची वृत्ती ही ज्ञानाज्ञानातीत ब्रह्मरूप होते. त्यावेळेस विश्व हे ब्रह्माचा विलास आहे असा अनुभव येतो. ते नामरूपाने भिन्न भासले तरी मात्र ते तत्त्वत: भिन्न नसते. तेथे बंध मोक्ष ह्या सापेक्ष कल्पनाच उरत नाहीत. अशा या भूमिकेवर आरूढ होऊन अमृतानुभवाची रचना केलेली आहे. म्हणून अमृतानुभवात अज्ञान खंडन केले आहे. ते शांकर मताचे खंडन आहे असे मात्र नाही. कारण अमृतानुभवात अंतिम तत्त्वाकडे जाण्यासाठी मायावादाचे अज्ञान खंडन हा महत्त्वाचा पहिला भाग असून त्यावर आधारलेला चिद्‌विलास सिद्धांत हा दुसरा भाग आहे.

श्रीज्ञानदेवांनी अज्ञान खंडनामध्ये शबलब्रह्म अक्षरपुरुषाची मर्यादा ओलांडण्यासाठी केलेले स्थूल अज्ञान खंडन व ज्ञानाच्या जाणिवेलाही अज्ञान गणणाऱ्या सूक्ष्म पातळीचे म्हणजेच ब्रह्मज्ञानाच्या जाणीवेचेही खंडन केलेले आहे. यावरून अमृतानुभवातील अज्ञान खंडन हे ब्रह्मानुभवाच्या उच्चतम शिखरावरून केलेले आहे.

ईश्वरसाक्षात्कारापूर्वी ईश्वराचे अज्ञान असेपर्यंत जीवात्म्याची संसारदशा कायम राहते. या बद्धावस्थेतून बाहेर पडण्यासाठी मुमुक्षु प्रयत्न करतो. त्याला मदत म्हणून मायावादाची तार्किक उपपत्ती श्रीज्ञानदेवांनी स्वीकारलेली आहे. परंतु श्रवण, मनन, निदिध्यासाने आत्मनिष्ठा दृढ होईपर्यंत दृश्य विश्व हे मायिक आहे. या दृढ भावनेने साक्षात्काराची तयारी होते. अशा मुमुक्षूला महावाक्याचा उपदेश करून श्रीगुरुकृपेने जेव्हा ज्ञान दृष्टीचा लाभ होतो. तेव्हा साक्षात्कारानंतर विश्व हे परमेश्वराचेच स्वरूप आहे असा अनुभव येऊन विश्वात्मक देव दिसू लागतो. म्हणजे चिद्‌विलासवाद हा साक्षात्कारानंतरचा अनुभव आहे. तर मायावाद ही साक्षात्कार होईपर्यंतची मुमुक्षुची विचारसरणी आहे. अर्थात ही तार्किक उपपत्ती आहे अनुभव नाही, एकंदरीत मायावाद हा मुमुक्षु अवस्थेपर्यंतचा विचार आहे, तर चिद्‌विलासवाद हा मोक्षदशेतला अनुभव आहे.

वास्तविक पहाता मायावाद व चिद्‌विलासवाद हे दोन स्वतंत्र मार्ग नसून ब्रह्मतत्त्वापर्यंत जाणाऱ्या साधकाच्या त्या दोन भिन्न पायऱ्या आहेत. यावरून जिवाच्या ज्ञानपूर्वकालीन अज्ञानी भूमिका व ज्ञानोत्तर ज्ञानभूमिका अशा दोन भूमिका मानणे अपरिहार्य ठरते. अज्ञानी अवस्थेतून जगाचा विचार केला असता जगत् हे जड, विनाशी, दु:खरूप व मिथ्या जाणवते व परब्रह्म हे निरूपाधिक सच्चिदानंदरूप वाटते, परंतु एकदा ब्रह्माचे आत्मरूपाने ज्ञान झाले की तेच जगत् ***म्हणौनि जग असकी । वस्तुप्रभा ।।*** अमृ.७.२८९ या रूपाने प्रत्ययाला येते. यालाच खराखुरा चिद्‌विलासवाद असे म्हणतात व हे उत्तम प्रकारचे तत्त्वज्ञान समजण्यासाठी गीता व उपनिषदांचा व त्यावरील आचार्य भाष्यांच्या संस्कृत ग्रंथांचा अभ्यास अनिवार्य आहे. म्हणूनच संस्कृतला अनन्यसाधारण महत्त्व आहे ते नाकारता येत नाही. कारण त्या तत्त्वज्ञानाविना आत्मविकास होणे शक्य नाही.

स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - १

(१) श्री ज्ञानदेवांनी कशाला अज्ञान समजून त्याचे खंडन केले आहे?

(२) श्री ज्ञानदेवांनी चिद्‌विलास कशाला म्हटले आहे.

(३) जीवात्म्याची संसारदशा कोठपर्यंत कायम राहते?

(४) विश्वात्मक देव केव्हा दिसू लागतो?

(५) जीवाच्या दोन भूमिका कोणत्या?

४.२.२ संस्कृत भाषेचे वैज्ञानिक महत्त्व

भारतात प्राचीन काळामध्ये मानवीय संस्कृतीचे लौकिक व तात्त्विक क्षेत्रात विशेष विकासाचे चिंतन आपल्या भारतीय ऋषिमुनींनी संस्कृत ग्रंथांत केलेले आहे. बहुतेक तसे विश्वात इतरत्र कोठेही आढळत नाही. अशा ह्या मौलिक संस्कृतीला अनुसरूनच स्वजीवन उदात्त, सार्थक व परिपूर्ण कसे बनवता येईल असे चिंतन ऋषींनी वेगवेगळ्या संस्कृत ग्रंथांत लिहून ठेवले होते. दुर्दैवाने हे सर्व ग्रंथ आज उपलब्ध नाहीत व उपलब्ध असलेल्या ग्रंथांपैकी विज्ञानविषयक ग्रंथ अत्यल्पच आणि प्राप्त असलेलेसुद्धा प्रचाराच्या अभावाने लोकांना हे अज्ञातच राहिले. इ.स.च्या पहिल्या शतकातच भारतातील संस्कृतमधील-भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणितशास्त्र, शरीरशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, धातुशास्त्र, स्थापत्यशास्त्र, वास्तुशास्त्र, वनस्पतीशास्त्र, विमानशास्त्र, खगोलशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, ज्योतिषशास्त्र अशा अनेक शाखा केवळ विकसितच नाहीत तर प्रगतीच्या अत्युच्च शिखरावर पोहोचलेल्या होत्या. या सर्व क्षेत्रात आपले ऋषी संपूर्ण विश्वाला मार्गदर्शन करीत होते. तरीही दुर्दैवाने असेच ऐकायला येते की विज्ञानाचा आरंभ व विकास पाश्चात्त्य देशांमध्येच झाला, ओहो! काय ही विसंगती? परंतु लोक खोट्या वचनांवरच विश्वास ठेवतात, याचे कारण केवळ त्यांचे संस्कृतचे अज्ञान. कारण प्राचीन ग्रंथांची भाषा संस्कृत आहे. जर त्या ज्ञानाचा उपयोग करून आपला गुणात्मक विकास करायचा असल्यास, आजच्या वैज्ञानिकांनी संस्कृतचे अध्ययन करून त्यांच्या शाखेच्या संस्कृत ग्रंथांचे अवलोकन केले तर वैज्ञानिक क्षेत्रात आजचे झालेले बरेचसे संशोधन भारतात प्राचीन काळातच होऊन गेलेले आहे हे जगापुढे येईल. प्राचीन संस्कृतातील विज्ञानाचा थोडासा परिचय पुढीलप्रमाणे सांगता येईल.

(०१) **गणित :** वैदिक काळातील गणितज्ज्ञांनी संपूर्ण विश्वाला सर्वांत मोठे योगदान दिले. उदा. संख्या, शून्य, दशांशपद्धती, पाय pची किंमत इत्यादी अनेक गोष्टी भारतीयांच्या कारणानेच गणित क्षेत्रात प्रविष्ट झाल्या. शून्याचा आविष्कार इ.पु. २०० मध्ये ऋषी गृत्समद यांनी केला.

(०२) **क्रमचय व संयोजन :** या सूत्राला प्रकट करण्याचे श्रेय फक्त महावीराचार्यांनाच आहे.

उदा. एकोहोकोत्तरत: पदमूर्ध्वाधर्यत क्रमोत्क्रमश: ।

स्थाप्य प्रतिलोमध्नं प्रतिलामधेन भाजितं सारम् ।।

(०३) **अपरिमित समीकरण :** हे समीकरण फारमेट व फ्रान्सियल यांनी १७३२ मध्ये सोडविले, पण हे समीकरण आर्यभट्ट, ब्रह्मगुप्त, भास्कर द्वितीय यांनी चक्रवाल पद्धतीने शोधून १० व्या शतकातच सोडविलेले आहे.

(०४) **$ax^2 + bx+c=0$:** अशी वर्ग समीकरणे आज ज्या पद्धतीने सोडविली जातात ती १० व्या शतकातच श्रीधराचार्यांनी सांगून ठेवलेली आहेत.

उदा. चतुराहतवर्गसमै: रूपै: पक्षद्वयं गुणयेत्।

अव्यक्तवर्गरूपै: उक्तौ पक्षौ ततोमूलम् ।।

(०५) **वर्गमूळ / घनमूळ :** अपेक्षित संख्येने वर्गमूळ व घनमुळाच्या प्राप्तीसाठी आधुनिक गणितात एक पद्धती स्वीकारली आहे. परंतु तिचा शोध इ.स. ४९९ मध्ये आर्यभट्ट यांनीच सर्वप्रथम लावलेला आहे.

उदा. भागं हरद्वर्गानित्यं द्विगुणेन वर्गमूलेन ।

वर्गोद्वर्गे शुद्धे लब्धं द्विगुणेन वर्गमूलेन।।

ही आर्यभट्टांची पद्धती युरोपियनांना १६१३ पर्यंत अज्ञात होती.

(०६) **पाइथागोरस थियोरम :** पाइथागोरस यांनी जे प्रमेय मांडले तेच प्रमेय त्यांच्या एक हजार वर्षांपूर्वीच भारतीय बोधायन व कात्यायन ऋषींनी प्रमाणपूर्वक मांडले आहे.

उदा. दीर्घचतुरस्त्रस्याक्ष्णया रज्जु: पार्श्वमानी तिर्यक्मानी।

यत्पृथग्भूते कुरुतस्तदुभयं करोति।

(०७) **पाय (p) चे मान :** वृत्ताचे वर्गीकरण आपल्या जामिती शास्त्रीय ग्रंथ लीलावतीत पाय (p) चे मान भास्कराचार्यांनी दिलेले आहे.

उदा. व्यासे भनन्दाग्निहते विभक्ते खबाणभूर्यै: परिधिस्तु सूक्ष्म:।

द्वाविंशतिघ्ने विघतेऽथ शैले स्थूलोऽथवा स्याद् व्यवहारयोग्य:।। (लीलावती ९८)

(०८) **त्रिकोणाचे क्षेत्रफळ :** आर्यभट्ट यांनी इ.स.४७६ मध्ये त्रिकोणाचे क्षेत्रफळ काढण्याचे एक सूत्र सांगितले आहे.

उदा. त्रिभूजस्य फलशरीरं समदलकोटिभूजार्ध संवर्ग:

(०९) **प्रकाशगती :** गेल्या २० व्या शतकात प्रकाशाची गती प्रतिसेकंदाला १८६३०० मैल आहे असे मो. सर विलिम्स मानतात, परंतु ५ व्या शतकातच सायनाचार्यांनी ऋग्वेद भाष्यात १ सेकंदात प्रकाशाचा वेग १८६४१३.२२ मैल असा निश्चित केलेला आहे की जो समानतेला येतो.

(१०) **पृथ्वीची गतिशीलता :** पृथ्वी स्थिर नसून नित्य आपल्याभोवती फिरते हा शोध १५व्या शतकात कोपर्निकस यांनी लावला असे म्हटले जाते, परंतु त्यांच्या एक हजार वर्षा पूर्वी आर्यभट्टांनी आर्यभटीय या ग्रंथात लिहिलेला आहे.

(११) **गुरुत्वाकर्षण :** गुरुत्वाकर्षणशक्तीचा शोध १६व्या शतकात न्यूटनने लावला असे म्हणतात, परंतु त्या शक्तीचा उल्लेख नारदीय सुक्त, प्रश्नोपनिषद व ८व्या शतकातील शंकराचार्यांच्या शांकरभाष्यातही आहे. तसेच ११व्या शतकातील भास्कराचार्यांनी तर त्यांच्या सिद्धांत शिरोमणी या ग्रंथात सविस्तर चर्चा केलेली आहे.

(१२) **कालगणना :** सर्वांत अगोदर गॅलिलिओ यांनी १६व्या शतकात काळाचे विभाजन सेकंदात केले, परंतु भारतीयांनी त्या अगोदर सेकंदाचेसुद्धा विभाजन महाभारत काळातच केलेले आहे.

उदा. काष्टा निमेशा दशपञ्च चैव त्रिंशत् काष्टा गणयेत कलां ताम् ।

त्रिंशत्कलाश्चापि भवेन्मुहूर्तो भाग: कलाया: दशमश्चय: स्यात् ।।

त्रिंशन्मुहुर्तन्तु भवेदहश्च रात्रिश्चे संख्या मुनिर्भि: प्रणीता ।

मास: स्मृतो राज्यहनीय त्रिंशत् संवत्सरो द्वादशमास उक्त: ।

संवत्सरे द्वेत्वचने वदन्ति संख्याविदो दक्षिणमुत्तरश्च । (महाभारत)

(१३) **भूकम्पमापन :** गेल्या २०व्या शतकात भूकंपमापन यंत्राचा शोध रशियातील स्टोबेल्टसिन व पानाजूक यांनी लावला, परंतु भूकंप कोठे, कधी व का होतो ते सर्व गर्गाचार्यांनी हजारो वर्षांपूर्वी गर्गसंहितेत लिहून ठेवले आहे. त्यांची सत्यता पडताळून या शास्त्रज्ञांनी ते मान्य केलेले आहे.

(१४) **विमानशास्त्र :** पूर्वी विमान कसे बनवावे याचे संकेत अनेक ग्रंथांत आढळतात. त्यासाठी भारद्वाज ऋषींचे यंत्र सर्वस्वम्, अगस्ती ऋषींचे शक्तीसूत्रम्, शाकटायनांचे वायूतत्वप्रकरणम् व नारदांचे धूमप्रकरण असे अनेक ग्रंथ आहेत.

(१५) **चिकित्साशास्त्र :** आजची प्लास्टिक सर्जरी पूर्वी कशी केली जात होती. शल्यचिकित्सा, रोगनिदान त्यावरील उपाय शस्त्रक्रिया व औषधनिर्माण यासाठी आयुर्वेद चरक, सुश्रुतादिंचे जगप्रसिद्ध ग्रंथ आहेत. तसेच योगशास्त्रसुद्धा.

(१६) **वृक्षायुर्वेद :** वृक्ष कोठे वाढतो, त्याचे रोग, लक्षणे व उपाय, तसेच त्यांचे औषधी गुणधर्म यांचे अंशतः वर्गीकरण इ.स. ३०० मध्ये थिओफ्रेस्टस् यांनी केले, पण हे सर्व सूक्ष्मातिसूक्ष्म वर्णन ६००० वर्षांपूर्वी पराशर ऋषींनी वृक्षायुर्वेद या ग्रंथात केलेले आहे. त्यातच त्यांनी वनस्पती जलग्रहण करतात हा सिद्धांत लिहिलेला आहे. तोच सिद्धांत अमेरिकन शास्त्रज्ञ डिक्सन व जॉली यांनी १८९४ साली लावला.

(१७) **धातुशास्त्र :** धातुनिर्माण व उपयोग पद्धती भारतात प्राचीन काळीच विकसित झालेली होती. हे रसरत्नसमुच्चय, रसरत्नाकर, रससार, रसप्रदीप आदी ग्रंथांमध्ये वाग्भट, नागार्जुन व गोविंदाचार्य आदींनी सिद्ध केले आहे.

(१८) **वास्तुविद्या :** वास्तू कोठे व कशी उभारावी याविषयी वैज्ञानिक दृष्ट्या वर्णन मयमतम् व मयसार वास्तुरत्नावली या ग्रंथात विस्तृत वर्णन केलेले आहे.

(१९) **संगीत :** संस्कृतमधील संगीत चिकित्सारत्नाकर नावाचा ग्रंथ आहे. त्यात संगीताने ३४८० रोगांवर प्रभावी चिकित्सा आहे की त्याचा आजही उपयोग होऊ शकतो.

(२०) **अवसन प्रक्रिया :** अशुद्ध जस्तापासून शुद्ध जस्त बनविण्याची प्रक्रिया इ.स. पूर्व ४०० पूर्वीच राजस्थानमध्ये या प्रक्रियेचा परिचय करून इंग्लंडमध्ये पेटंट मिळविले. आपल्या दुर्लक्षामुळे अनेक पेटंट पाश्चात्त्य आपल्याकडून नेतात.

(२१) **संगणक :** संस्कृत भाषा प्रत्ययघटित व वैज्ञानिक दृष्ट्या नियमबद्ध असल्याकारणाने संगणकाला अत्यंत उपयोगी आहे, असे पाश्चात्त्य संशोधकांनी सप्रमाण पटवून दिले आहे. म्हणून आता संगणकात प्रभुत्व प्राप्त करण्यासाठी संस्कृतचे अध्ययन करणे अत्यावश्यक झाले आहे.

अशा प्रकारे अनेक उदाहरणे देता येतील. यामागचा उद्देश एकच आहे की, प्राचीन काळातील संस्कृतातील शेकडो ग्रंथ उपलब्ध आहेत. परंतु त्यांच्यातील विज्ञान हस्तगत करण्यासाठी संस्कृत अध्ययन हाच एकमेव उपाय आहे. कारण तीच त्या ज्ञानभांडाराला लावलेल्या कुलूपाची एकमेव चावी आहे. असे म्हणतात की लहानपणापासून सिंह मेंढ्यांच्या कळपात राहिल्याने 'स्वयमेवमृगेंद्रता' हा आत्मभाव विसरतो. तसे आपण पाश्चात्त्यांच्या सहवासाने आपला आत्मभाव हरवून बसलो आहोत. तेव्हा हे संस्कृतमधील असलेले विज्ञान संस्कृत शिकून, प्राचीन ग्रंथांचे चिंतन करून म्हणजेच आपला आत्मभाव जागृत करून भारतभूचे गेलेले गतवैभव प्राप्त करून भारतमाता पूर्ववत विश्वगुरू पदावर विराजमान व्हावी हीच यामागील मनोकामना. मात्र ही मनोकामना पूर्ण होण्यासाठी संस्कृतच्या अभ्यासाशिवाय अन्य पर्याय नाही.

स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - २

(१) शून्याचा आविष्कार कोणी केला?

(२) अपरिमित समीकरण आर्यभट्टांनी कधी सोडविले?

(३) भास्कराचार्यांनी पायचे मान कोणत्या ग्रंथात लिहिले आहे?

(४) आर्यभट्टांनी कशाचे क्षेत्रफळ काढण्याचे सूत्र सांगितले आहे?

(५) वास्तू कोठे व कशी उभारावी याची वैज्ञानिक दृष्ट्या वर्णन कोणत्या भारतीय ग्रंथात आहे?

४.२.३ संस्कृत व्याकरणकार व महाकवी यांचा परिचय

(अ) भारतीय संस्कृत व्याकरणकार

संस्कृत भाषा ही प्राचीन भारतीय संस्कृतीच्या आकलनाचे सर्वश्रेष्ठ माध्यम आहे. कारण ह्या भाषेतील वाङ्मयात प्राचीन भारतीय संस्कृतीचे सर्वंकष व विकसित स्वरूप पहावयास मिळते. या संस्कृत भाषेचा विकास अनेक शतकांपूर्वी झाला. त्यापूर्वीचे तिचे स्वरूप वेदवाङ्मयात दिसते. वेदांचा निश्चित असा अर्थ जाणून घेण्याच्या प्रयत्नातून भारतात व्याकरणशास्त्राचा उदय व विकास झाला असे मानण्यात येते. म्हणून प्राचीन काळी वेदांचा अर्थ जाणण्यासाठी व्याकरणाच्या अध्ययनाला अत्यंत महत्त्व होते. व्याकरण हे वेदांचे अत्यंत महत्त्वाचे अंग मानण्यात येते. ऐतिहासिक दृष्ट्या इसवीसनापूर्वी आठव्या शतकात झालेले यास्काचार्य हे पहिले वैयाकरणीय होते. यास्काचार्यांच्या निरुक्त ग्रंथात शब्दांचे अर्थ वेदांच्या आधारे व्युत्पत्ती सांगून सिद्ध करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यानंतर शाकल्य, शाकटायन, स्फोटायन, गार्ग्य, गालव, भारद्वाज, काश्यप, अपिशली, चाक्रवर्मन् आणि सेनक असे अनेक व्याकरणशास्त्रज्ञ होऊन गेले, परंतु त्यांचे ग्रंथ आज उपलब्ध नाहीत. त्यांच्यानंतर व्याकरणशास्त्राच्या विकासात प्रामुख्याने पाणिनी, कात्यायन आणि पतंजली या तीन शास्त्रज्ञांचे फार महत्त्वाचे स्थान आहे. या तिघांनाही मुनीत्रय असे म्हणतात.

(१) पाणिनी

पाणिनी हे संस्कृत भाषेचे फार मोठे शिक्षक होऊन गेले. त्यांचा जन्मकाळ निश्चित माहिती नाही. परंतु इ.स.पूर्वी पाचव्या शतकात ते जन्मले असावेत असे विद्वान मानतात. त्यांच्या आईचे नाव दाक्षी असल्याने त्यांना दाक्षीपुत्र असेही म्हणतात. ते शालातूर गावामध्ये जन्मले. देश, काळ, आईवडील, इ.विषयी त्यांच्याबद्दलची माहिती आज उपलब्ध नाही. म्हणून अनेक आख्यायिका त्यांच्याविषयी प्रचलित आहेत. उपवर्ष आचार्य हे पाणिनींचे गुरू होते. आचार्य उपवर्षांचे पाणिनी आणि कात्यायन असे दोन शिष्य होते. त्या दोघांमध्ये कात्यायन तीव्र बुद्धीचे होते, तर पाणिनी हे मंद बुद्धीचे होते. म्हणून इतर सहाध्यायी पाणिनींना हसत असत. त्या अपमानाने दु:खी झालेले पाणिनी गुरुंच्या घराचा त्याग करून हिमालयात गेले. तेथे त्यांनी शंकराची आराधना केली. त्यांच्या तपश्चर्येने प्रसन्न झालेल्या शंकराने त्यांना तीव्र बुद्धी व प्रतिभा दिली. त्यानंतर शंकराने स्वत:च्या हातात असलेला डमरू १४ वेळा वाजवला. पाणिनींनी १४ वेळा डमरुचा आवाज ऐकून १४ सूत्रांची रचना केली. त्या सूत्रांना शिवसूत्रे असे म्हणतात. ही सूत्रे पाणिनींच्या व्याकरणाची सुरुवातीची सूत्रे होत. मानवी आयुष्य हे कमी असून व्याकरणशास्त्राचा विस्तार मात्र अधिक असल्यामुळे पाणिनींनी सूत्ररूपाने अष्टाध्यायी नावाचा ग्रंथ रचला. व्याकरणाच्या या ग्रंथाची रचना करण्यासाठी पाणिनी भारतभर ठिकठिकाणी फिरले व विविध कार्यशाळांमध्ये जाऊन त्यांनी प्रचलित संस्कृत शब्दांचा संग्रह केला. शिवाय नवीन वाक्प्रचार पाहिले. त्यानंतरच स्वत:च्या ग्रंथाची त्यांनी रचना केली असे दिसून येते. या ग्रंथात व्याकरण सूत्ररूपाने रचलेले आहे. या व्याकरणसूत्रांनी संस्कृत भाषा नियमांनी बांधलेली आहे म्हणूनच पाणिनी हे संस्कृत भाषेचे मोठे आचार्य ठरले. काशिकाकार पाणिनींचा गौरव करताना म्हणतात की,

येन धौता गिर: पुंसां विमलै: शब्दवारिभि: ।
तमश्चाज्ञानजं भिन्नं तस्मै पाणिनये नम: ।।

पाणिनींनी अष्टाध्यायी ग्रंथात वैदिक व लौकिक संस्कृत भाषेचे नियम सूत्रबद्ध करून सांगितले आहेत. अष्टाध्यायीच्या आठ अध्यायांमध्ये प्रत्येक अध्यायात चार पाद असून त्यात सुमारे चार हजार सूत्रे आहेत. अष्टाध्यायीच्या अध्ययनास सहायक असे धातुपाठ व गणपाठही पाणिनी यांनी लिहिलेले आहेत. पाणिनींच्या सूत्रांतील उणिवा भरून काढण्यासाठी वार्तिकांची रचना करण्यात आली. त्यांचा गुरुबंधू कात्यायन यांनी ही प्रमुख वार्तिके लिहून काढली. त्या वार्तिकांची संख्यासुद्धा जवळपास चार हजार इतकी आहे. या वार्तिकांमुळे मूळ पाणिनींचे सूत्र समजण्यास अधिकच उपयोग झाला. त्यानंतर पतंजलीचे 'महाभाष्य' हा प्रख्यात ग्रंथ प्रकाशात आला. पतंजलीने वार्तिककारांच्या मतांचे परीक्षण करून सूत्रकार पाणिनींचे समर्थन करण्याचा प्रयत्न या पातंजल महाभाष्याद्वारे केला आहे. 'पातंजल महाभाष्य' हा ग्रंथ फारच महत्त्वाचा आहे. पतंजलींच्या सूत्रांवर टीका करण्याचे दोन वेगवेगळे प्रकार आहेत.

(१) काशिका नामक टीकेमध्ये पाणिनींचे सूत्रे ज्या क्रमाने आहेत, त्याच क्रमाने त्यावर टीका लिहिण्यात आली. या टीका इ.स. ७ व्या शतकात करण्यात आल्या.

(२) १७ व्या शतकाच्या अगोदरपासून पाणिनींच्या सूत्राचे वर्गीकरण विषयानुसार करण्यात आले व त्यावर काही टीका करण्यात आली. या पद्धतीमुळे पाणिनींच्या काही सूत्रांवर भाष्यही लिहिलेले नाही असे लक्षात येते. इस. ७ व्या शतकात भर्तृहरी यांनी व्याकरणशास्त्राचे तत्त्वज्ञान वाक्पदीय नावाचा ग्रंथ लिहून विशद करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतरच्या काळात त्यावर संस्कृत टीका लिहिण्यात करण्यात आली. अशा प्रकारे पाणिनी यांनी संस्कृत साहित्यात मोठे योगदान दिले आहे. थोडक्यात, व्याकरणाच्या अध्ययनाशिवाय वेदोपनिषद व महाकाव्ये यातील साहित्य व तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणे अशक्यच आहे.

(ब) संस्कृतचे महाकवी

(१) **कालिदास :** कालिदास यांना जयदेव कवींनी कविताकामिनीचा शृंगार म्हटले आहे. कवी कुलगुरू या बहुमानाने सर्वश्रुत असणारे कालिदास हे नक्की केव्हा होऊन गेले याबद्दल विद्वानांमध्ये मतभेद दिसून येतात.

(२) कालिदास हे इ.स.पूर्व १ पहिल्या शतकात विक्रमादित्याच्या दरबारात होते. त्यांच्या नवरत्नात कालिदासांचा समावेश होता, असे एक मत आहे.

(३) कालिदास इ.स. चौथ्या शतकाच्या उत्तरार्थात द्वितीय चंद्रगुप्तांच्या काळात होऊन गेले असे काही विद्वानांचे मत आहे.

(४) कादंबरीकार बाणभट्ट यांनी त्यांचा उल्लेख केलेला असल्यामुळे ते इ.स. ६०० च्या अगोदर केव्हातरी होऊन गेले यात संशय नाही.

महाकवी कालिदासांचे नाव भारतीय साहित्यात नाही तर संपूर्ण विश्व साहित्यात अभिनंदनीय असे आहे. कालिदासांना 'भारताचा शेक्सपियर' असे म्हटले जाते. प्रसिद्ध लोककथा अशी की, कालिदास बालपणी अतिशय मूर्ख होते, तेव्हा इतर विद्वानांनी एका गर्विष्ठ पण विदुषी राजकुमारीबरोबर त्यांचा विवाह घडवून आणला. विवाहानंतर पत्नीने केलेल्या अपमानामुळे त्यांनी भगवती कालीची उपासना करून विद्वत्ता प्राप्त केली. एका महाकवीला लोकांनी महामूर्ख दाखवून केवळ मनोरंजनासाठी अनेक कपोलकल्पित कथा त्यांच्या जीवनाशी जोडल्या. कालिदासांच्या जीवनाचा अनेक विद्वानांनी घेतलेल्या बाह्य व अंतर्गत पुराव्यांवरून कालिदासांचा काळ हा ३८० ते ४१३ असावा असे मान्य केले. चंद्रगुप्त द्वितीयालाच शकराती असे म्हटले आहे. या शकराती चंद्रगुप्त द्वितीयाने आपली प्रांतीय राजधानी उज्जैन मानली होती. ती कालिदासांची अतिशय प्रिय नगरी होती. चंद्रगुप्त द्वितीय हे अतिशय विद्वान व कवींचे आश्रयदाते होते. कालिदास त्यांचा महाकवी व प्रिय सल्लागारही होते. चंद्रगुप्ता यांनी आपल्या मुलीचा सल्लागार म्हणून त्यांना पाठविले होते. तिचे वाकाटक वंशाचे राज्य विदर्भात रामटेकजवळ होते. तेथे रामटेकडीवर बसूनच कालिदासांनी मेघदूत लिहिले. म्हणूनच तेथे त्यांचे स्मारक बनविले आहे. चंद्रगुप्तांचा काळ हा भारताचे सुवर्णयुग मानले जाते. म्हणूनच कालिदासांच्या काव्यात सर्वत्र वैभवविलासाचे चित्रण दिसून येते.

कालिदास हे जातीने ब्राह्मण होते. त्यांच्या काव्यात यज्ञ, मंदिर, तपश्चर्या व ऋषिजीवन यांचे सुंदर वर्णन आढळते. ते शिवभक्त होते. त्यांच्या काळात शिवभक्ती सर्वत्र ओसंडून दिसते. त्यांचा राज्यसभा व राजपरिवाराशी घनिष्ट संबंध होता. कालिदासांनी संपूर्ण भारतभ्रमण केलेले दिसते. त्यांचे शास्त्रज्ञान व पांडित्य अगाध होते. दर्शनशास्त्र, पुराण, ज्योतिष, कामशास्त्र व नाट्यशास्त्र या सर्वांचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. त्यांनी एकूण ७ ग्रंथ लिहिले आहेत.

महाकाव्य - (१) कुमारसंभवम्
(२) रघुवंशम्
खण्डकाव्य - (१) ऋतुसंहारम्
(२) मेघदूतम्
नाटक - (१) मालविकाग्निमित्रम्
(२) विक्रमोर्वशीयम्
(३) अभिज्ञानशाकुन्तलम्

अशा प्रकारे सात कलाकृतींची निर्मिती करून कालिदासांनी साहित्याच्या शिखरावर एक सप्तरंगी इंद्रधनुष्यच निर्माण केले आहे.

वाङ्मय परिचय

कालिदासांनी केलेल्या काव्यकृतींचा थोडक्यात परिचय खालीलप्रमाणे -

(१) **कुमारसंभवम् :** हे एक महाकाव्य कालिदासांच्या उत्कृष्ट काव्यशैलीचा परिचय करून देते. हिमालयाची मुलगी पार्वती कठोर तपश्चर्या करून शिवाला पती रूपात प्राप्त करते. या नायक व नायिकेच्या मिलनातून कार्तिकेयाचा जन्म होतो. तो देवतांचा सेनापती बनून तारकासुराचा वध करतो व संपूर्ण विश्वाला संकटातून सोडवतो. ही छोटीशी कुमारसंभवाची कथा आहे. या महाकाव्यात एकूण १७ सर्ग आहेत. त्यापैकी आठच सर्ग कालिदासांची कृती मानली जाते. उरलेले सर्ग इतर अन्य कवींचे असावेत असे विद्वानांचे मत आहे. भाषा, भाव, छंदयोजना व निसर्गवर्णन या सर्व बाबतीत ९ सर्ग पहिल्या आठ सर्गांहून अगदी भिन्न वाटतात. म्हणूनच मल्लीनाथांनीसुद्धा पहिल्या आठ सर्गांवरच टीका केली आहे.

या महाकाव्याचा आरंभ हिमालयाच्या वर्णनाने झाला आहे. हिमालयाचे अतिशय आकर्षक वर्णन यामध्ये दिसून येते. कलापक्ष व भावपक्ष यांचा सुंदर समन्वय त्यात साधलेला आहे.

शंकराची समाधी, कामदेवाचे आगमन, वसंताचा बहार, रतीचा विलाप, पार्वतीची तपश्चर्या व शिवउमा विवाह ही वर्णने अतिशय सूक्ष्म असून त्याद्वारे सुंदर भावांची अभिव्यक्ती साधली आहे. या संपूर्ण महाकाव्यात शृंगार रसाला प्राधान्य दिलेले आहे.

(२) **रघुवंशम् :** संस्कृत पंचमहाकाव्यात रघुवंशम् हे उत्कृष्ट महाकाव्य आहे. यात १९ सर्ग आहेत. या महाकाव्यात दिलीपापासून अग्निमित्रापर्यंतच्या सूर्यवंशातील १९ राजांचे वर्णन आहे. त्यापैकी पहिले ६ राजांचे वर्णन विस्तृत आहे. त्यानंतर सर्व राजांचे चित्रण हे संक्षिप्त आहे. रामानंतरच्या सर्व राजांचा परिचय शेवटच्या अवघ्या चार सर्गांत केला आहे. कवी ज्या रघुवंशाच्या वर्णनाकरिता उत्सुक होते त्याची वैशिष्ट्ये त्यांनी प्रारंभीच सांगितली आहेत. दिलीपाने नंदिनीला अशा पुत्राची मागणी केली की जो वंशाला घडवू शकेल व त्या प्रार्थनेनुसार प्राप्त झालेला पुत्र रघु हा होय. त्यापासून पुढील वंश रामापर्यंत उत्कर्षाला गेलेला दिसतो. म्हणून त्याला 'रघुवंशम्' हे नाव दिले. कालिदासांनी ही कथा वाल्मीकी रामायणापासून घेतली. मात्र त्यात अनेक परिवर्तने घडवून आणली. रामकथेतील अनेक प्रसंगही कालिदासांनी वर्णन केलेले आहेत. कालिदासांची काव्यकला या महाकाव्यात पूर्णत्वाला पोहोचलेली दिसते.

आकर्षक चरित्रचित्रण, सुंदर प्रभावी वर्णन, रसाभिव्यक्ती, अलंकृत भाषाशैली यामुळे हे काव्य सर्वोत्कृष्ट ठरले आहे. दिलीपाची नंदिनी सेवा, कौत्साला रघूने दिलेले दान, इंदुमतीचे स्वयंवर, अजविलाप, निर्वासित सीतेचा संदेश हे प्रसंग अतिशय प्रभावशाली आहेत.

(३) **मालविकाग्निमित्रम् :** महाकाव्याइतकेच कालिदासांचे नाटकातही श्रेष्ठत्व दिसून येते. मालविकाग्निमित्र हे त्यांचे प्रारंभीचे नाटक आहे. ते शुंगवंशीय राजा अग्निमित्र यांच्या जीवनावर आधारित आहे. त्यात एकूण पाच अंक आहेत. नाट्यरचनेच्या क्रमाने **मालविकाग्निमित्रम्** कालिदासांची प्रथम रचना आहे. त्यामुळे त्यांच्या नाट्यप्रतिभेचा ह्यात पुरेपूर विकास झालेला दिसून येत नाही. कथा ऐतिहासिक नसली तरी पात्र हे ऐतिहासिक आहेत. या नाटकात विदुषकाने अनेक टीकांनी हास्यरसाचे कारंजे उडविले आहेत. त्यामुळे नायकात अधिक रमणीयता आलेली आहे. पहिल्या नायकात कालिदासांची संवादपटूता दिसून येते. मालविकाग्निमित्रामध्ये राजवाड्यातील प्रणयासंबंधी चालत असलेल्या कारस्थानांची वर्णने सजीव ठरलेली आहेत. राण्यांची परस्पर ईर्षा व राजाची कामुक वृत्ती या सर्वांचे चित्रण कालिदासांनी उत्तम प्रकारे केलेले आहे.

(४) **विक्रमोर्वशीय :** कालिदासांच्या या रचनेत पाच अंक असून यात अप्सरा, उर्वशी व राजा पुरुरवाच्या पारस्परिक प्रणयाची कथा आहे. या कथेचे मूल रूप वैदिक आख्यान आहे. ऋग्वेदात व शतपथ ब्राह्मणात ही कथा आलेली आहे. कालिदासांनी सुंदर भाव, भाषा व वैदिक आख्यानाला सुंदर नाटकीय रूप दिले आहे.

(५) **अभिज्ञानशाकुन्तलम् :** ही कालिदासांची सर्वश्रेष्ठ कलाकृती आहे. 'कालिदासस्य सर्वस्वम् अभिज्ञानशाकुन्तलम्' तसेच 'काव्येषु नाटकम् रम्यम, तत्र रम्या शकुन्तला' आदी सूक्तींनी नाटकांतच प्रसिद्धी लक्षात येते. विद्वानांनी एकमुखाने या नाटकाला संस्कृत नायकातच नाही तर विश्वसाहित्यात सर्वश्रेष्ठ मानले आहे. या नाटकात एकूण सात अंक आहेत. यामध्ये चंद्रवंशातील राजा दुष्यंत व कण्वमुनींची मानसकन्या शकुंतला यांच्या मुग्ध प्रणयाचे, वियोगाचे व त्यांच्या पुनर्मिलनाच्या अत्यंत मार्मिक कथेला नाटकीय स्वरूपात वर्णन केले आहे. तीनही नाटकांतील कथानक प्रसिद्ध स्वरूपाचे आहेत. तीनही नाटकांच्या कथानकाला कालिदासांनी आपल्या कल्पनेचे संमिश्रण करून सुंदर बनविले आहे. प्रकृतिवर्णन, संधी, आर्थोपक्षेपक यांचा सुंदर प्रयोग केला आहे. कथावस्तूला गतिशील व रोचक बनविले आहे.

कालिदासांचा आवडता रसशृंगार असा आहे. मालविकाग्निमित्र नाटकातील विवाहपूर्व अयोगशृंगातील व्याकुळता, विक्रमोर्वशीयात संयोगशृंगातील सुखदरमणीयता व अभिज्ञानशाकुन्तलातील वियोग शृंगारातील कारुण्य हे हृदयस्पर्शी ठरले आहे. शाकुंतलाचा चौथा अंक वात्सल्य रसाने भरलेला आहे. पिता कण्वाची व सख्यांचीच नाही तर सर्व पशुपक्षी, लतावेली, शकुंतलेच्या वियोगाने व्यथित होताना दिसतात. या तीनही नाटकांत रौद्र, बीभत्स रसाला थारा दिलेला नाही. परंतु वीर, अद्‌भुत व हास्य या रसांना योग्य प्रसंगी प्रयुक्त केलेले आहे. कालिदासांच्या तीनही नाटकांची पार्श्वभूमी प्रेमतत्त्वावरच अवलंबलेली आहे. प्रणयवर्णन व निसर्गवर्णन या दोन्हींच्या बाबतीत कालिदास सिद्धहस्त आहे. शृंगाररस, मदन, वसंतऋतू व सुंदर स्त्री यांचा अपूर्व संगम म्हणजे कालिदासांची कविता. प्रणयवर्णनाबरोबरच कालिदास यांनी सौंदर्यवर्णनातही असामान्य प्रतिभा दाखविली आहे. कालिदासांचे चरित्रचित्रण स्वाभाविक सजीव व आदर्श आहे. कालिदासांची सर्व स्त्रीपात्रे अविस्मरणीय आहेत. कालिदासांनी आपल्या काव्यात उपमा अलंकाराचा प्रयोग केलेला आहे. म्हणूनच *'उपमा कालिदासस्य'* ही म्हण रूढ झाली. भाव आणि विचार यांचा सुंदर संगम कालिदासांच्या साहित्यात आढळून येतो व भावनांना जेथे विचारांची बैठक मिळते तेच वाङ्‌मय अमर होते. म्हणून कालिदासांचे काव्य अमर झाले आहे.

आज काळ बदलला, परिस्थिती बदलली. आज कण्वमुनी आढळत नाही, तपोवनातील शकुंतलाही दिसत नाही. पण कण्वमुनींनी पाठवणीच्या वेळी शकुंतलेला दिलेला संदेश चिरस्थायी व अमर आहे. म्हणूनच पौर्वात्य कवींनी त्याला ***'कविताकामिनीचा विलास,'*** तर काहींनी ***'कविकुलगुरु'*** असे संबोधले आहे. पाश्चात्त्य कवींपैकी फ्रेंच कवी शेझी तर अभिज्ञानशाकुन्तलाचे इंग्रजी भाषांतर वाचून झालेल्या आनंदाच्या भरात पुस्तकाची प्रत डोक्यावर घेऊन नाचला. जर्मन कवी गटे याने भाषांतरित शाकुंतल वाचून '' स्वर्ग व पृथ्वीचा एकत्र संगम झालेला पहावयाचा असेल तर त्यासाठी अभिज्ञानशाकुन्तल पहा'' असे धन्यतेचे उद्‌गार काढले आहेत. तेव्हा महाकवी कालिदासांच्या प्रतिभेवरून व त्याच्या प्रतिभेतून अवतरलेल्या काव्यकृतींवरून कालिदासांची थोरवी किती महान होती ते दिसून येते.

(२) **भारवि :** जगन्मान्य असणाऱ्या पंचमहाकाव्यांपैकी तिसरे महाकाव्य 'किरातार्जुनीयम्' हे आहे. आपल्या एकुलत्या एक कलाकृतीने महान कीर्ती संपादन करणारा व आपल्या प्रकांड पांडित्याने रसिकांची मने आकर्षित करणारा आणि काव्यक्षितिजावर तेजस्वी ताऱ्याप्रमाणे चमकणारा महाकवी म्हणजे भारवि होय.

महाकवी कालिदासांनंतर महाकाव्याची परंपरा प्रवाहित करण्याचे श्रेय भारवि यांना आहे. काळाच्या दृष्टीनेही कालिदासांनंतर भारवींचेच नाव घेतले जाते. मात्र कालिदासांप्रमाणेच भारवि यांनीसुद्धा आपला काळ जीवनवृत्तांत ह्यापैकी काहीही माहिती दिलेली नाही. परंतु बाह्यपुराव्यावरून भारविंचा काळ हा विद्वानांनी सातव्या शतकाचा पूर्वार्ध असावा असे मानले आहे. भारविंचा एकमेव ग्रंथ म्हणजे 'किरातार्जुनीयम्' नावाचे महाकाव्य.

किरातार्जुनीयम् या महाकाव्यात एकूण १८ सर्ग आहेत. महाभारताच्या वनपर्वातून ही कथा घेतलेली आहे. युद्धात हरल्यानंतर युधिष्ठिर भावंडांसह द्वैतवनात राहण्याकरिता जातो आणि एका गुप्तहेराला दुर्योधनाचा कारभार कसा चालू आहे हे पाहण्याकरिता पाठवितो. हा गुप्तहेर येऊन दुर्योधनाच्या राज्यकारभाराची स्तुती करतो. येथूनच या काव्याला प्रारंभ होतो. शत्रूचा उत्कर्ष ऐकून द्रौपदी व भीम अतिशय संतप्त होतात आणि राजा युधिष्ठिराला युद्धासाठी प्रवृत्त करतात, पण युधिष्ठिर अत्यंत संयमाने त्यांना शांत करतो. त्याचवेळी महर्षी व्यास तेथे येऊन अर्जुनाला शंकरापासून पाशुपतास्त्र प्राप्त करण्यासाठी उपदेश करतात. त्या उपदेशानुसार इंद्रनिल पर्वतावर कठोर तपश्चर्या करण्यासाठी जातो. त्याच्या तपश्चर्येने भयभीत झालेला इंद्र अर्जुनाच्या तपश्चर्येत विघ्न निर्माण करण्याकरिता अनेक अप्सरा पाठवितो, परंतु त्यांच्या क्रीडाविलासांनी अर्जुन तपश्चर्येपासून विचलित होत नाही. तेव्हा मुनिरुपात स्वत: इंद्र येतो व अर्जुनाला शिवाची आराधना करण्यास सांगतो. अर्जुन पुन्हा कठोर तप करतो. अर्जुनाच्या तपश्चर्येने प्रसन्न होऊन स्वत: शंकर अर्जुनाच्या पराक्रमाची परीक्षा घेतात. शंकर स्वत: किराताचे रूप धारण करतात. एका मायावी डुकरावर सोडलेल्या बाणावरून किरात व अर्जुनाचे भांडण सुरू होते व शेवटी घनघोर युद्ध होते. अर्जुनाच्या पराक्रमाने शिव प्रसन्न होतात व स्वत:चे रूप प्रकट करून अर्जुनाला पाशुपतास्त्र प्रदान करतात. इंद्रादी देवसुद्धा प्रकट होऊन अर्जुनाला अनेक प्रकारचे अस्त्र देतात आणि नंतर आपले मनोरथ सफल झालेला अर्जुन युधिष्ठिराकडे येतो.

अशाप्रकारे भारवि यांनी महाभारताच्या संक्षिप्त कथानकाला महाकाव्याच्या दृष्टीने अतिशय विस्तृत केले आहे. त्यात ऋतुवर्णन, रैवतक पर्वताचे वर्णन, अप्सरांचे विलास, सूर्यास्त, इ. वर्णन भारवि यांनी सुंदर रितीने प्रस्तुत केले आहे. कथानकात मात्र कोठेही व्यत्यय निर्माण झालेला नाही. या महाकाव्याचा नायक नारायणाचा

अंश असलेला अर्जुन आहे व त्याचे चरित्र उदात्त दाखविण्याकरिता शिवाने किराताचे रूप धारण केले व पराक्रमात अर्जुनाचे श्रेष्ठत्व प्रतिपादन केले. अर्जुनाला दिव्य अस्त्राची प्राप्ती हेच या महाकाव्याचे फल आहे.

रस : या महाकाव्यात वीररसाला प्राधान्य असून शृंगाराला गौणत्व दिलेले आहे. भीम, अर्जुन व द्रौपदी यांच्या संवादातून वीररसाची अभिव्यक्ती होतेच, पण वीररसाचा परिपाठ किरात व अर्जुन यांच्या युद्धात झाला आहे. सहाव्या व आठव्या सर्गात शृंगाररसाची अभिव्यक्तीसुद्धा भारवि यांनी उत्कृष्ट केली आहे.

पात्रचित्रण : महाकवी भारवि यांनी पात्रांचे चित्रण उत्कृष्ट केले आहे. प्रत्येक पात्राचे स्वभाववैशिष्ट्ये चटकन नजरेत भरेल असे केले आहे. अपमानाच्या अग्नीत होरपळलेली द्रौपदी, सहनशील व शांत प्रवृत्तीचे युधिष्ठिर आणि वीर पण संयमी एकाग्रचित्त अर्जुन तर अपमानाने अस्वस्थ झालेला पराक्रमी भीम या सर्व पात्रांचे चरित्रचित्रण उत्कृष्ट असे केलेले दिसते.

निसर्गवर्णन : या महाकाव्यात निसर्गाच्या रमणीय दृश्यातून भारविंनी सुंदर वर्णन केले आहे. ऋतू, जलविहार, चंद्रोदय, शरदऋतूचे वर्णन, इंद्रधनुष्य आदी वर्णने बहारदारीची ठरलेली आहेत.

भाषा : भारविंची भाषा अतिशय प्रौढ व विद्वत्तापूर्ण आहे. त्यांनी वैदर्भीरितीचा अवलंब केलेला आहे. माधुर्य व ओज या दोन्ही गुणांनी युक्त अशी प्रभावी शैली दिसून येते. भारविंच्या भाषेत स्पष्टता असली तरी विद्वता आहे. व्याकरणाचे उत्कृष्ट ज्ञान असल्यामुळे अनेक शब्दचमत्कृती त्यांनी निर्माण केल्या आहेत. त्यांच्या काव्यात हृदयपक्षापेक्षा कलापक्षच अधिक वरचढ दिसतो. त्यांनी वंशस्थ छंदाचा उत्कृष्ट प्रयोग केलेला आहे. जसा कालिदास हा उपमेसाठी प्रसिद्ध आहे तसा भारवि हा अर्थगौरवासाठी प्रसिद्ध आहे. कमी शब्दांत फार मोठा अर्थ देण्याचे सामर्थ्य त्यांच्या शब्दांत आहे. म्हणूनच ''भारवेरर्थगौरवम्'' असे म्हटले जाते.

(३) **माघ :** महाकवी माघ यांनी 'शिशुपालवध' नावाचे महाकाव्य रचले आहे. माघांच्या जीवनाची माहिती 'भोजप्रबंध' व 'प्रबंधचिन्तामणी' या दोन ग्रंथांत उपलब्ध आहे. त्यावरून माघ व त्यांची पत्नी हे अतिशय दानशूर होते असे आढळून येते. माघांचे आजोबा सुप्रभदेव हे वर्मलान्त राजाचे प्रधानमंत्री होते. माघांच्या वडिलांचे दत्तक असून ते अतिशय दानी होते. ते सर्वांना आश्रय देत होते. म्हणून त्यांना सर्वाश्रय ही उपाधी दिली आहे.

राजा वर्मलान्त यांचा काळ इ.स. ६२५ मानला जातो. त्यावरून माघांचा काळ हा इ.स.६०० ते ७०० असावा असे मानले जाते.

कथानक : या महाकाव्याचे कथानक महाभारताच्या सभापर्वातून घेतले आहे. शिशुपालवध महाकाव्यात एकूण २० सर्ग आहेत. जेव्हा युधिष्ठिर राजसूय यज्ञ करतात, त्याप्रसंगी श्रीकृष्णद्वारा उद्धत शिशुपालाचा वध केला जातो. ही प्रमुख घटना आहे. महर्षी नारदांच्या आगमनाने काव्याचा आरंभ होतो. ते श्रीकृष्णाजवळ येऊन शिशुपालाच्या अत्याचाराचे वर्णन करतात व शिशुपालाच्या वधाकरिता प्रेरित करणारा इंद्राचा निरोप सांगतात. बलराम ताबडतोब आक्रमक होऊन शिशुपालाला जिंकण्याचा सल्ला देतात. परंतु उद्धव श्रीकृष्णाला युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञाचे निमंत्रण स्वीकार करण्याचा उपदेश करतात त्यामुळे श्रीकृष्ण सेनेसह पांडवाची राजधानी इंद्रप्रस्थ येथे जाण्यास सिद्ध होतात. या प्रवासात रैवतक पर्वताचे वर्णन, यादवांच्या जलक्रीडेचे वर्णन, सैन्याचे वर्णन, तसेच रात्रीचे वर्णनही आहे. श्रीकृष्ण संपूर्ण सेनेसह नदी पार करून इंद्रप्रस्थाला पोहोचतो तेव्हा युधिष्ठिर श्रीकृष्णाला अग्रपूजेचा मान देतो, परंतु शिशुपाल त्याला विरोध करतो आणि श्रीकृष्णाला युद्धाचे आव्हान देतो. दोन्ही सैन्यांत भयंकर युद्ध होते व शेवटी श्रीकृष्ण आपल्या सुदर्शन चक्राने शिशुपालाचे शीर उडवतो आणि त्याचे तेज आपल्यामध्ये समाविष्ट करून घेतो.

महाभारतापासून घेतलेल्या या संक्षिप्त कथानकाला माघांनी महाकाव्याला उपयुक्त असे विस्तृत रूप दिले आहे. संस्कृत महाकाव्यात शिशुपालवध या महाकाव्याचे स्थान अतिशय श्रेष्ठ असून या महाकाव्याला बृहतत्रयीत स्थान मिळालेले आहे.

रस : शिशुपालवध महाकाव्यात अतिशय उत्कृष्ट अशी रसपुष्टी झालेली आहे. या काव्यात प्रमुख रस हा वीररस आहे. या काव्यात माघांनी सर्वोत्तम पाण्डित्य प्रकट केले आहे. तसेच वेद, वेदशास्त्र, राजनीती, पुराणे, संगीत, नाट्यशास्त्र व चित्रकला यांचे सखोल ज्ञान आहे. महाकाव्याचे सर्व उत्कृष्ट गुण शिशुपालवधात दिसून येतात.

म्हणूनच 'उपमा कालिदासस्य भारवेरर्थगौरवम् ।
दण्डिनः पदलालित्यम् माघे सन्ति त्रयो गुणाः ।।

अर्थात कालिदासांची उपमा, भारविंचा अर्थगौरव व दण्डिचे पदलालित्य हे तीनही गुण माघांच्या महाकाव्यात आढळून येतात.

निसर्गवर्णन : 'शिशुपालवध' या महाकाव्यात समुद्र, नद्या, वने, पर्वत, मेघ, सूर्योदय, ऋतु, इ. निसर्गाचे दृश्य स्वाभाविक व सुंदर वर्णन केले आहे. निसर्गाकडे पाहण्याची माघांची दृष्टी अद्भुत आहे. माघांनी निसर्गाचे जे वर्णन केले आहे, ते आपल्या डोळ्यासमोर जणुकाही निसर्गसौंदर्याचे चित्रच उभे करते.

भाषा : माघांची अलंकारप्रियता अर्थालंकाराप्रमाणे शब्दालंकारातही सर्वत्र दिसून येते. अनुप्रास, यमक हे त्यांचे आवडते शब्दालंकार आहेत. माघांनी आपल्या भाषाशैलीत पूर्ण १९ सर्गांत सर्वत्र चित्रालंकाराचा प्रयोग केला आहे. एकाक्षरी असलेला श्लोक, दोनअक्षरी श्लोक, द्व्यर्थी श्लोक, तीन अर्थ असलेले श्लोक अशा विभिन्न चित्रालंकारात रचलेले आहेत. माघांच्या शास्त्रज्ञानाप्रमाणे त्याचे शब्दभांडारही विपुल आहे. काव्यात त्यांनी अनेक नवीन शब्दांचा प्रयोगसुद्धा केला आहे. अर्थगौरवाच्या बाबतीत त्यांनी भारविंवर मात केलेली दिसून येते. या काव्यात एकूण २२ छंदांचा प्रयोग करून त्यांनी आपले पांडित्य प्रकट केले आहे.

माघांनी भारविंचे अनुकरण हुबेहूब केलेले आहे. पण तरीही स्वतःचे श्रेष्ठत्व भारविंपेक्षा अधिक दाखविले आहे. म्हणूनच पुढील काही कवींनी माघाचे विद्वत्व पाहून म्हटले आहे की, 'तोपर्यंतच भारविंची प्रतिभा चमकली की जोपर्यंत माघाचा उदय झाला नाही.' (तावद् भारवेर्भा भाति यावत् माघस्य नोदयः) यावरून महाकवी माघांचे श्रेष्ठत्व सिद्ध होते.

(४) **श्रीहर्ष :** पंचमहाकवींपैकी महाकवी पंडित श्रीहर्ष यांनी 'नैषधीयचरितम्' नावाच्या महाकाव्याची रचना केली आहे. कालिदास, भारवि व माघ यांच्यानंतर सर्वोत्कृष्ट काव्यरचना करण्याचे कार्य श्रीहर्षानींच केले आहे.

जीवनकाल : श्रीहर्षांचे जीवनवृत्त किंवा काल याबाबत विद्वानांमध्ये मतभेद नाहीत. कारण त्यांनी आपल्या महाकाव्यात प्रत्येक सर्गाच्या शेवटी आपल्या मातापित्यांचा उल्लेख केलेला आहे. त्यांच्या वडिलांचे नाव हीर व आईचे नाव मामल्यदेवी असे होते. श्रीहर्ष हे कान्यकुब्ज देशाचा राजा विजयचंद्र व त्याचा पुत्र जयचंद्र या दोघांचेही सभाकवी होते. राजा विजयचंद्राविषयी त्यांनी 'श्रीविजयप्रशस्ति' नामक ग्रंथ लिहिला होता. या दोन्ही राजांचा काल इ.स.११५४ ते इ.स. ११९५ असा मानला जातो. म्हणून श्रीहर्षांचा काळसुद्धा बाराव्या शतकाचा उत्तरार्ध मानला जातो.

नैषधीयचरितम् : या महाकाव्यात एकूण २२ सर्ग आहेत. त्यापैकी १३ व १७ सर्ग सोडून इतर सर्व सर्गांमध्ये १०० हून अधिक श्लोक आहेत. या महाकाव्याच्या कथावस्तूचा आधार महाभारतातील नलोपाख्यान आहे.

कथानक : नलराजा शिकार करीत करीत एक दिवस एका सरोवराजवळ येतो. सरोवरात सुंदर हंस पाहून राजा नल त्याला पकडतो व त्याच्या विनंतीवरून त्याला सोडूनही देतो. त्यावेळी तो राजाजवळ अपूर्वसुंदर दमयंतीचे वर्णन करतो. तेव्हा त्या वर्णनाने आसक्त झालेल्या नलाच्या सांगण्यावरून हंस दमयंतीकडे जातो व दमयंतीसमोर नलाच्या सौंदर्याचे वर्णन करतो. त्यामुळे दमयंतीच्या हृदयात नलाबद्दल प्रेम जागे होते व वियोगाच्या व्यथेने ती त्रस्त होते. दमयंतीचे वडील दमयंतीचे स्वयंवर आयोजित करतात. तेव्हा दमयंतीच्या रूपवैभवाने आकर्षित झालेले इंद्र, वरुण, अग्नी, यम व राजा नलाला आपला दूत बनवून दमयंतीकडे पाठवितात. नल दमयंतीकडे जाऊन त्या देवांची स्तुती करून त्यांचा संदेश देतो, पण ती आपला नलाशी विवाह करण्याचा निश्चय स्पष्टपणे बोलून दाखविते. तेव्हा चारही देव नलाचेच रूप धारण करून स्वयंवराला जातात. दमयंती पाच नलांना पाहून घाबरून जाते. तेव्हा तिचा दृढनिश्चय पाहून देवता आपले चिह्न प्रकट करतात व त्यावरून ती मानवी नलाला ओळखते व स्वयंवराची माळ घालते. त्यानंतर त्या दोघांचा विवाह होतो. शेवटी १७ व्या सर्गात कलिदेवतेचे व नलाचे वाक्युद्ध दाखवून श्रीहर्षांनी नास्तिकतावादाचे खंडन केले आहे.

श्रीहर्षांनी आपल्या महाकाव्यात अल्पसे कथानक अतिशय वृद्धिंगत करून आपली प्रतिभा व पांडित्य या दोन्हींनी त्या कथानकाला उत्कृष्ट महाकाव्याचे रूप दिले.

रस : शृंगार हा काव्याचा प्रमुख रस आहे. प्रथम अयोग शृंगार व नंतर संयोग शृंगाराचे शास्त्रीय रूपात वर्णन केले आहे. दमयंतीच्या सौंदर्याचे वर्णन करण्याकरिता श्रीहर्षांनी कोणतीही संधी घालविली नाही. शृंगाराच्या विविध

विलासांचे वर्णनही अतिशय पांडित्यपूर्ण रितीने केले आहे. त्यांनी विरहशृंगाराचे वर्णन केले, पण त्यात भावपक्षापेक्षा कलापक्षावर अधिक भर दिला आहे.

चरित्रचित्रण : कलिचा व नलाचा संवाद कृत्रिम रितीने निर्माण करून केवळ नास्तिकवादाचे खंडन व अद्वैतवादाचे मंडन त्यांनी केलेले आहे. वास्तविक पाहता चरित्रचित्रणाची कथानकाची विशेष अशी वैशिष्ट्ये दिसत नसली तरी पण दार्शनिकता हे त्याने आपले वेगळेपण प्रकट केले आहे.

भाषा : श्रीहर्ष यांनी माघ, भारविंप्रमाणे चित्रालंकाराचे प्रदर्शन केलेले नाही, पण अर्थालंकाराचा भरपूर उपयोग केला आहे. उपमा, अतिशयोक्ती व श्लेष हे त्यांचे आवडते अलंकार आहेत, पण त्याचबरोबर रूपक, उत्प्रेक्षा, यमक व व्यतिरेक या अलंकारांचाही त्यांनी प्रयोग केलेला आहे. मात्र शास्त्रज्ञान नसलेला सहृदय वाचक त्यांच्या काव्यातील आनंद मिळवू शकत नाहीत. म्हणूनच ' नैषधं विद्वदौषधम् ।' असे म्हटले जाते.

श्रीहर्षांच्या संपूर्ण महाकाव्यातील वर्णनात पांडित्याचे प्रदर्शन आहे. तरीपण कालिदास, भारवि व माघ या सर्वांचा प्रभाव श्रीहर्षांवर दिसून येतो.

श्रीहर्षांची विद्वत्ता, समासबहुल रचना व श्लेषाचा अलौकिक प्रयोग पाहून श्रीहर्षांना भारवि व माघांपेक्षाही श्रेष्ठ स्थान दिले आहे.'उदिते नैषधेचरिते क्व माघः क्व च भारविः।' असे म्हटले जाते.

स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ३

(१) यास्काचार्यांनी कोणत्या ग्रंथात शब्दांचे अर्थ वेदांच्या आधारे व्युत्पत्ती सांगून सिद्ध केले आहेत?

(२) पाणिनींचा कालावधी कोणत्या शतकातील आहे, असे मानले जाते?

(३) पाणिनींच्या गुरुंचे नाव काय?

(४) कालिदासांच्या वाङ्मय कृतींची नावे लिहा.

(५) श्रीहर्षांनी कोणते महाकाव्य लिहिले? त्यातील एकूण सर्गसंख्या किती?

४.२.४ वेदोपनिषदे, रामायण व महाभारत यांचा परिचय

प्रस्तावना

भारतीय संस्कृती ज्याच्यावर आधारित आहे ते हिंदू धर्मशास्त्र संस्कृत भाषेत लिहिले आहे. हिंदूंच्या चालीरिती, सण-समारंभ, परंपरा, शुभाशुभ शकून, मानवी मनाची व शरीराची जडणघडण, मानवी जीवनातील मूल्ये व तत्त्वे, १६ संस्कार, कौटुंबिक जीवन हे सर्व काही संस्कृतमध्ये आहे. या सर्वांचे प्राचीन काळापासून आजपर्यंत सर्व प्रकारची मानवी जीवनमूल्ये, त्यातील बदल हे सर्व काही आरशातील मानवी प्रतिबिंबाप्रमाणे संस्कृत वाङ्मयात हुबेहूब आढळते. म्हणूनच भारतीय संस्कृती जाणण्यासाठी तिच्यातील वैदिक वाङ्मयाचा मुळातूनच परिचय करून घेण्याचा प्रयत्न येथे संस्कृत वाङ्मयाच्या आधारे करूया.

(१) **वेदवाङ्मय :** वेदवाङ्मय हे जगातील सर्वांत प्राचीन वाङ्मय असल्यामुळे जगाच्या आणि भारताच्या प्राचीन इतिहासाचे ते एक वाङ्मयीन साधन आहे. या वाङ्मयामध्ये संहिता, ब्राह्मणे, आरण्यके आणि उपनिषदे यांचा समावेश होतो. इ.स. पूर्व २००० पासून आजपर्यंत यातील बहुतांश वाङ्मयाचे मौखिक परंपरेने रक्षण केले आहे. वेद हे जगातील प्राचीनतम ग्रंथांपैकी प्रमुख ग्रंथ आहेत. वेदाच्या काळासंबंधी आजही बरेच मतभेद आहेत. सनातनी विचारसरणीचे विद्वान वेद हे अनादि आणि अपौरुषेय आहेत असे प्रतिपादन करतात.

(अ) **संहिता :** संहिता म्हणजे मंत्रांचे एकत्रीकरण. ऐहिक आणि पारलौकिक कामनापूर्तींसाठी देवतांना प्रसन्न करून घेण्यासाठी हे मंत्र म्हटले जात असत. हे मंत्र चार संहितांमध्ये विभागलेले आहेत. ही विभागणी व्यासांनी केलेली आहे. असे म्हणतात की फार वर्षांपूर्वी एकच प्रचंड वेदराशी होती, परंतु या संपूर्ण वेदराशीचे एका अत्यंत अल्प कालखंड असलेल्या मनुष्यजन्मात व सीमित बुद्धिसामर्थ्याच्या जोरावर अध्ययन अध्यापन करणे हे केवळ अशक्यच गोष्ट होती. तेव्हा अध्ययन, अध्यापनाअभावी वेदराशी नामशेष होण्याची भीती निर्माण झाली. या अडचणीवर मात करण्यासाठी श्री. व्यासांनी वेद समूहाचे चार वेदांमध्ये विभागणी केली ती अशी...

(१) **ऋग्वेद संहिता :** ऋग्वेद म्हणजे अशा ऋचांचा समूह की ज्या काव्याने स्तुती केली जाते, त्यास ऋचा किंवा छंदोबद्ध मंत्र म्हणून ऋक् असे नाव प्राप्त झाले आहे. ''ऋच्यते, स्तूयते प्रतिपाद्योऽर्थो यथा सा ऋक् ।'' या ऋग्वेदामध्ये एकूण दहा मंडळे, ६४ अध्याय आहेत. १०२८ सूक्ते व एकूण १०५८० ऋचा आहेत. त्यामध्ये इंद्र, अग्नी, वरुण, सविता, मरुत्, उषा, नदी, वायू, सोम, अश्विनीकुमार, उशनस्, मित्र, सरस्वती, इ. देवांची व काही नैसर्गिक शक्तींची देवता स्वरूपात स्तुती केली आहे. ऋग्वेदाचे सूक्त व मंडल रूपात विभाजन करण्याचे कार्य शाकल नावाच्या ऋषींनी केले. सूक्त म्हणजे ज्यात ऋषींची इच्छा पूर्ण व्यक्त झाली आहे, असे मंत्रयुक्त ऋषिसूक्त. उदा. ऋग्वेदाच्या तिसऱ्या मंडळातील सर्व ऋचा विश्वामित्रांच्या आहेत, म्हणून ते विश्वामित्र सूक्त. एखादे सूक्त एखाद्या ऋषींच्या नावाने असले तरी त्यांनी एकट्यानेच त्या सर्व सूक्तांची रचना केली असा अर्थ होत नाही. ऋग्वेदाच्या शाकल व बाष्कल अशा दोन प्रमुख शाखा असून ऐतरेय ब्राह्मण, ऐतरेय आरण्यके व ऐतरेय उपनिषद् हे त्याचे महत्त्वाचे ग्रंथ आहेत.

जसे हे एकाच ऋषींचे म्हणून ऋषिसूक्त. त्याचप्रमाणे एकाच देवतेची स्तुती करणारे ते देवतासूक्त. विशिष्ट अर्थ संपेपर्यंतच्या सूक्तांचा समूह तो अर्थसूक्त आणि समान छंदांच्या मंत्रांचा समूह तो मंत्रसूक्त. अशाप्रकारे नैसर्गिक शक्तींची काव्यमय भाषेत स्तुती ऋग्वेदामध्ये केलेली दिसून येते.

(२) **यजुर्वेद संहिता :** वेदकालीन देवतांचे आवाहन मंत्र म्हणून (मंत्रांचे उच्चारण करून) करीत असत. यज्ञ करताना बहुतांश क्रिया समंत्रक असत. अशा क्रियांसाठी लहान मंत्रांची आवश्यकता होती. त्याकरीता रचलेल्या गद्यमंत्रांना यजुस् असे म्हणतात. यजुर्वेद संहितेमध्ये असे यजुर्मंत्र यागानुक्रमे एकत्रित केलेले आहेत. यजुर्वेदाच्या कृष्ण यजुर्वेद व शुक्ल यजुर्वेद या नावाच्या दोन स्वतंत्र शाखा आहेत. तैतरेय, मैत्रायणी, कपिष्ठलकठ आणि काठक अशा चार शाखा कृष्णयजुर्वेदाच्या आहेत. शुक्ल यजुर्वेदाच्या वाजसनेयी संहितेच्या काण्व आणि माध्यांदिन या प्रसिद्ध शाखा आहेत. शतपथ ब्राह्मण व बृहदारण्यक उपनिषद् हे दोन ग्रंथ यजुर्वेदाशी संबंधित असून ते अतिशय महत्त्वाचे आहेत. या वेदातील मंत्र प्रामुख्याने गद्यरूप आहेत. ज्या मंत्रांच्या ओळीतील अक्षरांची संख्या निश्चित असते, त्यास यजू असे म्हणतात. ज्याप्रमाणे ऋग्वेदाच्या ऋचांनी देवतांची स्तुती केली जाते, त्याचप्रमाणे यजुर्वेदाच्या यजूंनी यजन अर्थात यज्ञ केले जातात. सुप्रसिद्ध ईशावास्योपनिषद् शुक्ल यजुर्वेदाचा शेवटचा अध्याय असून बृहदारण्यक उपनिषद् हे शुक्ल यजुर्वेदाच्या माध्यंदिन शाखेच्या शतपथ ब्राह्मणाचा शेवटचा भाग आहे. कृष्णयजुर्वेदाच्या तैतिरीय आरण्यकामध्ये तैतिरिय उपनिषद असून श्वेताश्वतर शाखेशी संबंधित श्वेताश्वेतर उपनिषद् आहे.

(३) **सामवेद संहिता :** ऋग्वेदातल्या ऋचा दोन प्रकारे म्हणत असत. छंदानुसार साधे पठन करून किंवा गाण्यासारखी आलापयुक्त चाल लावून. त्यापैकी आलापयुक्त चालींना साम असे म्हणतात. सामवेद म्हणजे यज्ञप्रसंगी म्हटल्या जाणाऱ्या चालींचा सामांचा संग्रह. सामवेदाच्या जैमिनीय, कौमुथ आणि रामायणीय अशा तीन शाखा आहेत. सामवेद म्हणजेच भारतीय संगीताचा मूल स्रोत आहे. यात ऋग्वेदातील जास्तीतजास्त मंत्रांचा समावेश असून वेद मंत्रांची स्वरांसह गायन हे सामवेदाचे वैशिष्ट्य आहे. मंत्र गाणे (गायन करून म्हणणे) यालाच साम असे म्हणतात.

ताड्य महाब्राह्मण व छांदोग्य, केन या नावाची उपनिषदे हे सामवेदाशी संबंधित ग्रंथ आहेत. सर्वप्रथम स्वर, याविषयी सामवेदातच गायनाद्वारा प्रयोग केलेला असल्यामुळे सामवेद एकप्रकारे गाण्याचा आधारभूत ग्रंथ आहे, असे म्हणता येईल.

(४) **अथर्ववेद संहिता :** ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद हे तीनही वेद वैदिक आचार्यांच्या पारलौकिक श्रेयाची दखल घेणाऱ्या यज्ञांचा विचार करतात, तर याउलट सर्वसामान्य मानवाच्या ऐहिक कामनापूर्तीचे मंत्र अथर्ववेदात एकत्रित केलेले आहेत. सामान्य माणसाच्या मनात प्रसंगानुरूप प्रेम, द्वेष, मत्सर, वात्सल्य व भीती, इ. भावना उफाळून येतात. अथर्ववेदातील सूक्तांमध्ये या भावनांचा आविष्कार दिसून येतात. सामान्य माणसांच्या संतानप्राप्ती, घरातील एकोपा, अविवाहित कन्या विवाह, गर्भसंस्कार, व्याधींचे निवारण, शत्रूला नेस्तनाबूत करणे, इ. विवंचना दूर करणाऱ्या प्रार्थना अथर्ववेदात आहेत.

पूर्वी लोक मंत्र-तंत्र, जारण-मारण, जादू-टोणा यावर विश्वास ठेवत असत. त्यामुळे सुरक्षिततेसाठी व इतरांनी आपल्यावर जर प्रयोग केले तर ते काढून टाकण्यासाठी लोक या मंत्रतंत्राचा वापर करीत. या मंत्रांचा समावेश अथर्ववेदात केलेला आढळतो. या वेदाची २० कांडे व ७३१ सूक्ते व सुमारे ६००० ऋचा असून पिप्पलाद व शौनक ह्या प्रमुख शाखा आहेत. प्रश्न, मुण्डक व माण्डूक्य ही अथर्ववेदाची उपनिषदे असून अथर्ववेदाचा काही भाग गद्यात्मक तर काही भाग पद्यात्मक आहे. अथर्ववेदाचे मूळ नाव अथर्वांगिरस असून अथर्वा व अंगिरस नावाच्या दोन ऋषींवरून हे नाव पडले आहे. जादूटोणा करणाऱ्या मंत्रांच्या प्रमुख ग्रंथ हे अथर्ववेदाचे वैशिष्ट्य आहे. भारतीय वैदिक शास्त्रात आयुर्वेद हा अथर्ववेदाचा उपवेद मानलेला आहे.

(ब) **ब्राह्मण :** ब्राह्मण म्हणजे प्रार्थना. यज्ञप्रसंगी जमलेल्या पुरोहितांमध्ये मंत्रांसंबंधी किंवा यज्ञविधींसंबंधी विषयांच्या अनुषंगाने चर्चा होत असत. अशा प्रकारच्या चर्चांचे एकत्रीकरण ब्राह्मण ग्रंथांमध्ये केले आहे. या ग्रंथांचे स्वरूप चर्चायुक्त असल्यामुळे यामध्ये अनेक मनोरंजक कथांचा समावेश केलेला आहे. त्या वर्णनावरून तत्कालीन समाजमन, चालीरिती, धार्मिक समजुती यांचे दर्शन ब्राह्मण ग्रंथातून दिसून येते. मंत्रोच्चारासह यज्ञ करणे हे एक शास्त्र आहे. म्हणून यज्ञामध्ये कोणी कसा व कुठे विशिष्ट मंत्राचा उपयोग करावा याबाबतची माहिती या ग्रंथात दिसून येते. मूळ ग्रंथात मंत्र दिलेले असून त्यांचा उपयोग करण्याची पद्धत ज्या ग्रंथात दिलेली असते तो ब्राह्मण ग्रंथ व दोन्ही मिळून जो तयार होतो तो वेद.

''मंत्रब्राह्मणयोर्वेदनामधेयम् ।''

(क) **आरण्यक :** ब्राह्मणकाळापर्यंत यज्ञसंस्कार पूर्णपणे विकसित झाले होते. त्याचवेळी नागर संस्कृतीही विकसित होत होती. यज्ञीय कर्मकांड आणि ऐहिक समृद्धीत गुंतलेली नागरी संस्कृती समाजातील सर्वांना भावणारी नव्हती म्हणून त्यापासून दूर अरण्यात जाऊन यज्ञसंस्थेचा तात्त्विक अर्थ सांगण्याचा प्रयत्न काही तत्त्वचिंतकांनी केला. ते तत्त्वचिंतन आरण्यक ग्रंथात एकत्र केलेले आहेत. म्हणजेच यज्ञ करताना करण्याच्या ज्या आवश्यक गोष्टी आहेत, त्या कर्मकांडाबरोबर वैदिक ऋषींनी सुरुवातीचे जे आध्यात्मिक ज्ञान सांगितले आहे ते सर्व एकत्रितरित्या ज्या ग्रंथात आढळते त्याला आरण्यक ग्रंथ असे म्हणतात.

(ड) **उपनिषदे :** उप + नि + सद् या धातूचा अर्थ जवळ बसणे. म्हणजे गुरुजवळ जाऊन सृष्टीचे गुह्य ज्ञान ग्रहण करणे होय. यज्ञीय कर्मकांडाच्या पलीकडे जाऊन सृष्टीचे अंतिम तत्त्व शोधण्याचे प्रयत्न उपनिषदांनी केले. सृष्टी उत्पन्न कशी होते? सृष्टीचे कार्य कसे चालते? सृष्टीचक्रामध्ये मनुष्याचे नेमके स्थान कोणते? जन्ममृत्यू म्हणजे काय? मृत्यूनंतर माणसाची गती कोणती होते? इ. अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न उपनिषदांनी केला. उपनिषदांमध्ये कधी गुरुशिष्य संवादाद्वारे, तर कधी स्वतंत्रपणे पुढील दर्शनांची आध्यात्मिक बैठक भक्कम केलेली दिसून येते.

कर्मकांड आणि ज्ञानकांड असे वैदिक धर्माचे दोन भाग आहेत. कर्मकांड म्हणजे यागादि कर्मे करून ऐहिक व पारलौकिक सुख कसे मिळविता येते ते सांगणारा वैदिक धर्माचा भाग आणि ज्ञानकांड म्हणजे आत्मतत्त्वाच्या ज्ञानाने संसारापासून म्हणजेच जन्ममरणापासून मोक्ष कसा मिळविता येतो हे विशद करणारा वैदिक धर्माचा भाग होय. उपनिषदात वैदिक धर्माचे ज्ञानकांड आढळते. भारतीय तत्त्वज्ञानाचा उगम उपनिषदातूनच झाला आहे. उपनिषद या शब्दाचा अर्थ अज्ञानाचा नाश करणारी, दु:खाचे निवारण करणारी व मोक्ष देणारी विद्या असा आहे. उपनिषदांनाच वेदांत असेही म्हणतात.

'वेदांतोनाम उपनिषद् प्रमाणम् ।'

उपनिषदे, गीता आणि ब्रह्मसूत्रे हे वैदिक तत्त्वज्ञानाचे तीन आधारभूत ग्रंथ आहेत. त्यांना प्रस्थानत्रयी असे म्हणतात. जगत्, जीवात्मा व परमात्मा यांचे स्वरूप व त्यांचा परस्परसंबंध प्रतिपादन करणे हा उपनिषदांचा मुख्य विषय आहे. उपनिषदांची तत्त्वमसि, अहं ब्रह्मास्मि, प्रज्ञानंब्रह्म, अयमात्माब्रह्म अशी ही चार महावाक्ये आहेत. त्यांचा अर्थ समजून घेऊन अनुभवणे हे उपनिषद् अध्ययनाचे ध्येय आहे.

एकूण उपनिषदे ३५० आहेत. त्यापैकी १०८ ही महत्त्वाची मानली गेली आहेत. त्यातही श्रीमदाद्य शंकराचार्यांनी प्रमुख १० उपनिषदांवरच आपले भाष्य केलेले आहे. तेथे दशोपनिषदे खालीलप्रमाणे आहेत.

ईशकेनकठकप्रश्नमुण्डमाण्डूक्यतित्तिरि: ।
छांदोग्यम् ऐतरेयं च बृहदारण्यकं तथा ।।

आर्ष महाकाव्ये

ऋषींनी लिहिलेल्या महाकाव्यांना आर्ष महाकाव्य असे म्हणतात. यात प्रामुख्याने आदिकवी वाल्मीकी ऋषींचे रामायण व महर्षी व्यासांचे महाभारत यांचा समावेश होतो.

(१) रामायण

प्राचीन भारतीय वाङ्मयाच्या इतिहासात रामायणास फार महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. रामायणानेच भारतीय संस्कृती आपणापर्यंत पोहोचविली. रामायणाचे महत्त्व सांगताना ब्रह्मदेवाने वाल्मीकींना असे म्हटले आहे की,

'यावत् स्थास्यन्ति गिरय: सरितश्च महीतले ।
तावद्रामायणकथा लोकेषु प्रचरिष्यति ।।'

जोपर्यंत भूतलावर पर्वत आणि नद्या राहतील तोपर्यंत रामायणाची कथा सर्व लोकांत राहील. रामायणाचा गौरव करण्यासाठी म्हणून रचला गेलेला अर्थवादात्मक भाग समजला तरी तो इतक्या असंख्य वर्षांनीही असत्य ठरला नाही. रामायण हे आर्ष महाकाव्य व आदिकाव्य आहे. याचा कर्ता वाल्मीकी ऋषी आहे. त्यांना आदिकवी म्हणून ओळखले जाते. रामायणाने जी कीर्ती व लोकश्रद्धा मिळविली, तशी जगात अन्य ग्रंथाने क्वचितच मिळविली असेल.

रामायणाची रचना

रामायणाला 'चतुर्विंशतिसाहस्री संहिता' असे म्हटले जाते. कारण रामायणाची मूळ श्लोकसंख्या ही २४००० आहे. रामायणाचे विभागणी सात कांडांत केलेली आहे.

(१) बालकांड (२) अयोध्याकांड (३) अरण्यकांड (४) किष्किन्धाकांड (५) सुंदरकांड (६) युद्धकांड (७) उत्तरकांड

महाकाव्याचा विषय हा भव्य व उदात्त असावा लागतो. त्यात क्रियांची संतुलता असते. त्यातील प्रधान व्यक्ती उच्चपदस्थ व अभिजात असाव्या लागतात. त्यातील तत्त्वे श्रेष्ठ व अनुकरणीय असावीत. कथावस्तू वर्णन करण्यात योग्य छंद असावा. या महाकाव्यांची लक्षणे रामायणास तंतोतंत लागू पडतात. रामायणातील रामाची कथा आपल्या देशात सर्वच लहानथोर स्त्रीपुरुषांना सुपरिचित आहे. बालकांडात रामचंद्रांचा जन्म, अयोध्याकांडात विद्याध्ययन, यज्ञरक्षण व विवाह, नंतर वनात जाण्याची तयारी व प्रस्थान. अरण्यकांडात वनवास व रावणाकडून सीताहरण, किष्किन्धाकांडात सीतेच्या शोधाचा प्रयत्न, सुग्रीवाशी मैत्री व हनुमंतांचे सीतेच्या शोधात दक्षिणसमुद्रतीरावर आगमन, सुंदरकांडात हनुमंतांचे लंकेत गमन व सीतेचा शोध, युद्ध कांडात रामरावणांचे युद्ध, राक्षसांचा व लंकेचा नायनाट, सीतेची अग्निशुद्धी, रामाचे अयोद्धेस परत जाणे व राज्याभिषेक आणि उत्तर कांडात सीतेचा त्याग व अश्वमेध यज्ञ, अशाप्रकारे रामायणाची रचना दिसून येते.

भारतीय संस्कृतीचा आदर्श : रामायणाचा अभ्यास अनेक दृष्टीने करण्यात आलेला आहे. प्राचीन भारतीय संस्कृतीचे प्रतिबिंब रामायणात पडलेले दिसून येते. त्याकाळी समाज, राजकारण व लोकस्थिती कशी होती याचे ज्ञान करून घेण्यास रामायण हे विश्वासार्ह साधन आहे. रामायणामध्ये रामास गंगेपासून दक्षिणेस पायी प्रवास करावा लागला. या प्रवासवर्णनाच्या निमित्ताने वाल्मीकीने तत्कालीन भौगोलिक माहिती अतिशय सुंदर पद्धतीने रेखाटलेली आहे. मनुष्याने संसारात कोणते ध्येय बाळगून कसे वागावे याचे स्पष्टीकरण रामायणात दाखवून दिलेले आहे. उदा. आदर्श पुत्र राम, आदर्श पत्नी सीता, आदर्श भाऊ लक्ष्मण, भरत, आदर्श मित्र सुग्रीव, बिभीषण व आदर्श सेवक हनुमान असा आदर्शवाद रामायणामध्ये प्रस्थापित केलेला आहे.

रामायणाची भाषा : भाषादृष्ट्या रामायणात अलंकृत पण रमणीय भाषा पहावयास मिळते. संस्कृत भाषेचे नैसर्गिक व सहजसौंदर्य वाल्मीकींनी आपल्या निदर्शनास आणून दिलेले आहे. आदिकवींनी सरळ, सुबोध, मधुर व सोपी भाषा वापरून स्पष्ट विचारांना अनुसरले आहे. मधूनमधून अलंकार व उपमा येतात, परंतु मुद्दाम त्यांचा प्रयोग केलेला नाही. रामायणामधील षड्ऋतूंची वर्णने अतिशय बहारदार आहेत.

रामायणाचा काळ : रामायण महाभारतापेक्षा प्राचीन आहे, असे अनेक गोष्टींवरून दिसून येते. महाभारतातील प्रमुख व्यक्तींचा रामायणात उल्लेख नाही, परंतु रामकथा महाभारताच्या वनपर्वात येते व ती रामायणावरून घेतली गेली आहे. त्याचप्रमाणे रामायणाच्या युद्धकांडातील दोन श्लोक महाभारताच्या द्रोण पर्वात जसेच्या तसेच आलेले आहेत. प्राध्यापक रहमान याकुब यांच्या मते भाषादृष्ट्या रामायण हे बुद्धपूर्वकालीन आहे. रामायणाच्या भाषेवर पाणिनींचा प्रभाव पडलेला दिसत नाही. यावरून पाणिनींपूर्वी म्हणजे इ.स. ५०० पूर्वी तयार झाले असे म्हणता येईल. तात्पर्य रामायण हे इ.स. पूर्व ५०० पूर्वीचे आहे या विधानाला पुष्टी मिळते.

सामाजिक व्यवस्था : समाजाच्या सर्व थरातील व्यक्तींनी आपली कर्तव्ये नीट पाळली तरच समाजधारणा व्यवस्थितरितीने होईल. धर्माची अशीच कल्पना रामायणकाळी होती. धर्मरक्षणाचे काम राजावर सोपविलेले होते आणि राजे ते चांगल्या पद्धतीने पार पाडीत. थोडक्यात, समाजाची घडी व्यवस्थित बसलेली होती वर्णव्यवस्था

आणि आश्रमव्यवस्था यांना अनुरूप अशी कर्तव्ये प्रत्येक व्यक्ती पार पाडत होती. चारही वर्णांच्या व्यक्ती एकमेकांशी मिळून मिसळून राहत.

स्त्रियांची सामाजिक परिस्थिती : रामायणकालीन स्त्रियांना आवश्यक म्हणून ओळखली गेलेली खूण म्हणजे पतीनिष्ठा व शुद्ध चारित्र्य. सीता ही तर भारतीय स्त्रीचा आदर्शच होऊन गेली. दुसरी मनावर छाप पाडणारी स्त्री म्हणजे सुमित्रा, की जी स्वसंतोषाने आपल्या पुत्राच्या वनगमनाला प्रोत्साहन देते. रामायणकाळात स्त्रिया गुरुगृही जाऊन विद्याप्राप्ती करून घेत असत, असा उल्लेख रामायणात नसला तरी त्या बहुश्रुत होत्या. रामायणातील उल्लेखावरून असे दिसते की स्त्रिया साधारणत: पुरुषांच्या सभांमध्ये समोर जात नसत. स्त्रियांनी जनसामान्यांबरोबर नेहमी जाण्याची प्रथा जरी नसली तरी मर्यादित परिचित मंडळीबरोबर येण्याचे स्वातंत्र्य त्यांना होते असे दिसते. स्त्रियांची सर्वसाधारण परिस्थिती ही इतरांवर अवलंबून होती असे दिसून येते. तरीपण स्त्री ही पतीची अर्धांगिणी असल्याने ती राज्यकारभार सांभाळू शकते, असा विश्वास रामायणात दिसून येतो. अयोध्याकांडामध्ये वशिष्ठ कैकेयीला म्हणतात की, सीतेने वनात जाण्याची आवश्यकता नाही. ती अयोध्येत राहून राज्यकारभार पाहीन, असा उल्लेख आढळतो. राजांच्या बाबतीत बहुपत्नीकत्व हा जवळजवळ नियम झालेला होता. दशरथालासुद्धा अनेक राण्या होत्या.

आहार : रामायणामध्ये पूर्ण शाकाहारी लोक जवळपास सापडत नाहीत. अयोध्याकांड व किष्किन्धाकांडात समाजातील अनेक लोक मांसाहारी असल्याचे प्रमाण मिळते. यावरून तत्कालीन समाज हा मांसाहारी होता असे दिसून येते.

समाजजीवन : रामायणकालीन समाजजीवन भौतिक दृष्ट्या सुखसंपन्न होते. सुवर्णालंकारांच्या निरनिराळ्या उल्लेखांवरून त्यावेळी असलेली सुबत्ता लक्षात येते. निरनिराळे उद्योगधंदे वंशपरंपरागत चालत आलेले होते. कर्मचारी, शिल्पकार, सुतार, ज्योतिषी, वाद्य वाजविणारे, गायक, व्यापारी, वास्तुविद्या जाणणारे गवंडी, जवाहिरी, कोष्टी, भाट, सारथी, धोबी, न्हावी, नावाडी, वैद्य, इ. अनेकविध प्रकारच्या माणसांचा रामायणामध्ये उल्लेख येतो. हस्तीविद्या, अश्वविद्या, रथविद्या, धनुर्विद्या, शिल्पकला, चित्रकला, ज्योतिष, इ. सर्व कला तसेच युद्धाच्या संदर्भात शस्त्र, शास्त्रविद्यांबरोबरच मंत्रविद्येचाही उल्लेख येतो. अशाप्रकारे रामायणावरून तत्कालीन समाजजीवन कसे होते याचा अंदाज येतो.

(२) **महाभारत :** महर्षी व्यासनारायणांनी महाभारताची रचना केलेली आहे. रामायणाप्रमाणेच महाभारताला संपूर्ण विश्वात गौरव प्राप्त झालेला दिसून येतो. असे म्हणतात की, 'व्यासोच्छिष्टंजगत्सर्वं' ही उक्ती सार्थ आहे. महाभारताच्या वनपर्वातील 'भगवद्गीता' हा भाग हिंदूंचा धर्मग्रंथ समजला जातो.

महाभारताचे स्वरूप : महाभारत ग्रंथ हा मुळात इतिहास किंवा पुराणस्वरूपात होता. विष्णूभक्ती व तिची तत्त्वे यावर आधारभूत ग्रंथ म्हणून महाभारतास वैष्णवांची स्मृती असेही म्हणतात. महाभारतात कौरव पांडवांच्या कुरुक्षेत्रावरील महायुद्धाचा इतिहास आलेला आहे. यावरून आपणांस महाभारतकालीन समाजाचे स्पष्ट ज्ञान होते. त्यावेळी भारताची राजकीय स्थिती कशी होती? आर्यसंस्कृतीचा प्रसार कितपत झाला होता? युद्ध व शांतता यांचे तुलनात्मक फायदे-तोटे कोणते? इ. ज्ञान आपणांस होते. हा ग्रंथ म्हणजे उपदेशप्रधान ज्ञानाचा साठा आहे. महाभारतास पाचवा वेद असेही म्हटलेले आहे.

महाभारताची रचना : महाभारताची कथा अठरा पर्वात आलेली आहे. आदिपर्व, सभापर्व, वनपर्व, विराटपर्व, उद्योगपर्व, भीष्मपर्व, द्रोणपर्व, कर्णपर्व, शल्यपर्व, सौक्तिकपर्व, स्त्रीपर्व, शांतीपर्व, अनुशासनपर्व, अश्वमेधीपर्व, आश्रमवासीपर्व, मौसलपर्व, महाप्रस्थानिक पर्व, स्वर्गारोहण पर्व अशा एकूण अठरा पर्वांचा समावेश आहे. महाभारतामध्ये जवळपास सव्वालक्ष श्लोक संग्रहित केलेले आहेत. महाभारतामध्ये रामायणापेक्षा अधिक उपकथानके आहेत.

साहित्यविचार : रामायणाप्रमाणेच महाभारतसुद्धा प्राचीन इतिहास, पुराण व आख्यान वाङ्मयाचा नमुना आहे. महाभारतातील सर्व श्लोक अनुष्टुप् वृत्तात आहेत. मधूनमधून उपजाती व वंशस्थ हे छंदही वापरलेले आहेत. एकंदरीत महाभारताची भाषा सोपी, सरळ, स्पष्ट व सुबोध आहे.

टीका : महाभारतावर अनेक टीका उपलब्ध आहेत. त्या सर्वांत प्रसिद्ध सर्वज्ञनारायणाची टीका इ.स.च्या १४व्या शतकातील आहे. इ.स.च्या १६ व्या शतकात नीलकंठांची महाराष्ट्रीय टीका सर्वांत प्रसिद्ध आहे.

महाभारताचा काळ : सर्व महाभारताचा काळ निश्चित करता येत नाही. महाभारताची उत्क्रांती तीन अवस्थांतून दिसून येते. मूळ महाभारत, हल्लीचे महाभारत यांचा काळ पृथक असणार. इ.स. पूर्व ५ ते ६ शतकात अश्वलायन

गृह्यक सूत्रात महाभारत असा उल्लेख आढळतो, तर इ.स. पूर्व ४ थ्या शतकातील बोधायन धर्मसूत्रात सुद्धा महाभारताचा उल्लेख आढळतो.

मूळ महाभारताचे नाव 'जय' असे होते. रामायणापेक्षाही महाभारतात तत्कालीन विश्वासांचे, चालीरितींचे व त्यातील समाजाचे चित्रण अधिक प्रमाणात आढळते. महाभारतामध्ये राजनीतीचे शिक्षण ठिकठिकाणी दिले गेलेले आहे.

महाभारतातील व्यक्तिचित्रण : महाभारतातील कथासूत्रांचा विचार केला असता त्यातील पात्रचित्रणाचा विचार करण्याजोगा आहे. युधिष्ठिर, भीम, अर्जुन, कर्ण द्रौपदी, द्रोण, पितामह भीष्म आणि स्वत: श्रीकृष्ण या सर्वांची चित्रणे इतकी प्रभावी ठरली आहेत की, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा जनमाणसातून अजूनही पुसला गेलेला नाही. धर्मराजाची संयमशीलता व शांतता, भीमाचा क्रोध, अर्जुनाचे धनुर्विद्येवरील नैपुण्य, कर्णाची उदारता व शौर्य, द्रोणाचार्यांचे ब्राह्मतेज, भीष्म पितामहांची वयोवृद्धता व ज्ञानाची परिपक्वता, या स्वभावविशेषांनी त्या-त्या पात्रांमध्ये इतके अचूक रंग भरले आहेत की, त्या गुणांची ती आजही प्रतीके ठरली आहेत. स्त्रीपात्रांविषयी विचार केल्यास अग्नीप्रमाणे भासणारी द्रौपदी सर्वप्रथम दृष्टीसमोर येते. दुसरे महत्त्वाचे पात्र म्हणजे कुंती. तिने पांडवांच्या स्वभावांची योग्य जडणघडण करणाऱ्या या यशस्वी मातेने साऱ्या महाभारत कथेवर आपली अदृश्य छाया टाकलेली आहे.

महाभारताची वर्णनशैली : महाभारताची वर्णनशैली ही अतिशय साधी, सरळ व सोपी आहे. तसेच तिच्यामध्ये ओजस्विता आहे. महाभारतातील वर्णने ऐकली असता मन:चक्षूंसमोर शब्दचित्रे उभी करण्याचे सामर्थ्य त्यात दिसून येते. रामायणासारखे निसर्गदृश्यांची वर्णने येथे आढळत नाहीत. वनपर्वात मात्र हिमालयाचे वर्णन आलेले आहे. महाभारतकाराची वर्णनशैली तसेच संवाद रचण्याचे कौशल्य या गोष्टी लक्षात राहण्याजोग्या आहेत. आदिपर्व, सभापर्व, वनपर्व यामध्ये सुंदर संवादरचना घडून आलेली आहे.

भाषा : महाभारताची भाषा एखाद्या मोठ्या महाकाव्याला साजेशी अशी गंभीर आहे. ती सोपी असली तरी अर्थगर्भित आहे. तसेच व्याकरण दृष्ट्याही शुद्ध आहे. भगवद्गीता या ग्रंथरचनेवरून महाभारताची व्याकरण दृष्ट्या निर्दुष्ट भाषा लक्षात येते. महाकाव्याला अनुरूप अशा विषयाबरोबरच महाभारताचे भाषासौंदर्यही विचारात घेण्याजोगे आहे.

स्वयं-अध्ययनासाठी प्रश्नसंच - ४

(१) एकूण मुख्य वेद किती व कोणते?

(२) उपनिषद् शब्दाचा अर्थ लिहा.

(३) एकूण उपनिषदे किती व त्यापैकी किती उपनिषदांची शंकराचार्यांनी भाष्य लिहिले?

(४) रामायणाची रचना कोणी केली? त्यात एकूण किती खंड आहेत?

(५) महाभारताचे रचनाकार कोण?

(६) महाभारतात एकूण किती पर्व आहेत?